CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

।। आपले बाबाजी ।।

सौ. उज्वल कुंटे



Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

५.२

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ॐ राम

आपले बाबाजी

लेखिका

सौ. उज्वल कुंटे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रकाशक :
पुस्तक मिळण्याचे ठिकाण :
श्री. कौस्तुभ शशीकान्त कुंटे
बी-११०३, रौनक टॉवर,
बाजीप्रभु देशपांडे रोड, नौपाडा,
ठाणे (प.) ४००६०२, फोन नं. : ९१ २२ २५४० ५६ ३७

© सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन
फक्त खाजगी वितरणासाठी

लेखिका :
सौ. उज्वल शशीकान्त कुंटे
बी-११०३, रौनक टॉवर,
बाजीप्रभु देशपांडे रोड, नौपाडा,
ठाणे (प.) ४००६०२, फोन नं. : ९१ २२ २५४०५६३७
सौ. प्रिया कौस्तुभ कुंटे ९१ ९६१९००९८८२
(सकाळी : १० ते १२)

मुद्रक :
महाराष्ट्र प्रिंटर्स अॅन्ड अॅडव्हटाईझर्स
नौपाडा, ठाणे.

समर्पण दिन :
प्रथम आवृत्ती
२९ डिसेंबर २००१
द्वितीय आवृत्ती
२९ डिसेंबर २००७
तृतीय आवृत्ती
३० नोव्हेंबर २०१०
चतुर्थ आवृत्ती
१८ सप्टेबर २०१७

प. पू. दयानंद
शाळिग्राम स्वामींच्या
कार्यासाठी देणगी रु. १५०/-

आपले बाबाजी - दोन

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

समर्पण

महायोगावतारी बाबाजींनी
माझ्या अध्यात्मिक प्रगतीसाठी
मला शाळिग्राम स्वामींच्या केशवकडे
पाठवलं त्या केशवच्या करकमली
"आपले बाबाजी"
ही कृतज्ञ-शब्द-भावांजली
चि.कौस्तुभच्या हस्ते
सादर सप्रेम समर्पण

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ॐ राम

चतुर्थ आवृत्तीच्या निमित्ताने

'आपले बाबाजी' हे पुस्तक वाचल्यानंतर साधना करत असताना, काही साधकांना परम पूज्य बाबाजींची अनुभूती आली. हे साधकांनीच केलेल्या फोनवरून समजलं. तेव्हा महायोगावतारी बाबाजींच्या समोर मी नतमस्तक झाले.

शरणभावाने अंतरातून साद घालणाऱ्या माझ्या प्रिय वाचकांना अशाच अनुभूती देऊन साधनेसाठी उत्साहित करावे. हीच परम पूज्य बाबाजींच्या चरणी सविनय प्रार्थना.

चिरतरुण, त्रिकालज्ञ, सर्वसंचारेश्वर, महायोगावतारी बाबाजींच्या पदकमली आपल्या सर्वांचेच शत कोटी प्रणाम ! शत कोटी प्रणाम !

- सौ. उज्वल श. कुंटे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रस्तावना

बाबाजी हे नाव घरोघरी प्रसिध्द आहे. परंतु 'आपले बाबाजी' या चरित्राच्या निमित्ताने बाबाजी खरोखरच आपले होणार आहेत. त्यांचे महायोगावतारी हे नाव योगक्षेत्रातील साधकांना माहीत आहे. पण ते आता सर्वांना परिचयाचं होणार आहे. ब्राह्ममुहूर्तावरील भावावस्थेत खुद्द बाबाजींनीच सौ. उज्वल कुंटे यांना मार्गदर्शन केलं. प्रकाशरूपानं त्यांचं सान्निध्य लेखिकेला लाभलं. त्यांच्या हातून हे चरित्र मराठी भाषेत लिहून व्हावं ही श्रींचीच इच्छा आहे. त्यामुळे लेखिकेला चरित्र लिहिण्याकरता संदर्भग्रंथांचा ढीग वापरावा लागला नाही. माझ्या माहितीप्रमाणे मराठी भाषेतील हे पहिलंच चरित्र आहे.

अवतारी पुरुषांची कल्पना केवळ आपल्या बुध्दीच्या सामर्थ्यानं करता येत नाही. ते दिसायला सर्वसाधारण माणसांसारखे दिसतील. त्यांचा वेष सुध्दा साधाच असेल. त्यांच्याकडे वरवर पाहता काहीही विलक्षण दिसणार नाही. ते दिसायला साधे परंतु विशेष अधिकार असलेले असतात. ते देहाने तसंच विदेहाने पण संचार करतात. त्यांची स्वत:ची इच्छा असल्यास ते साधकांना दर्शन देतात. एकाच वेळी ते दोन देह धारण करू शकतात. बाबाजींनी आपल्या भक्तांना व साधकांना अनेक वेळा दर्शन दिलं आहे आणि आजही ते देतात. त्यांच्या अलौकिक, अविनाशी देहाला लौकिकातील अन्नपाण्याची आवश्यकताच नसते.

बाबाजी चिरतरुण, चिरंजीव, तेज:पुंज, प्रेममूर्ती आणि मंदस्मित करणारे आहेत. ते कोणत्याही भाषेत संभाषण करू शकतात. त्यांची वाणी मृदू तसंच मुलायम आहे. ते करुणासागर आहेत. ''प्रेम द्या, प्रेम घ्या आणि सर्वत्र प्रेम पहा'' अशी त्यांची शिकवण आहे.

प्रत्येक गोष्टीची वेळ यायला लागते. त्याप्रमाणे लेखिकेला २१ वर्षांपूर्वी दिलेला शब्द बाबाजींनी आता पुरा केला आहे. गीतेच्या १५व्या अध्यायात वर्णिलेल्या अश्वत्थ वृक्षाच्या पलीकडे त्यांना नेलं आणि शरीरातील अश्वत्थ वृक्षाचंही

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ज्ञान त्यांना दिलं. गीतेतील अश्वत्थ वृक्षाचं मूळ वरच्या बाजूला आणि फांद्या खालच्या बाजूला आहेत.त्याप्रमाणे शरीरातील अश्वत्थ वृक्षाचं मूळ मस्तकाच्या वरच्या भागात म्हणजे सहस्रार चक्रात आहे आणि खाली सर्व शरीरभर त्या वृक्षाचा विस्तार आहे. बाबाजींनी त्यांना सर्व काही सांगितलं आहे. लेखिकेनं क्रियायोगाची दीक्षा घेतलेली नाही. त्यांची पूर्वजन्मात ही साधना झालेली असावी.

या चरित्रात लेखिकेनं स्वत:च्या काही अनुभूती सांगितल्या आहेत. भगवान नित्यानंद आणि दयानंद शाळिग्राम स्वामी यांचा हृद्य उपदेश आहे. नित्यानंदांचं दर्शन घेण्यासाठी आणि त्यांची कृपा होण्यासाठी विशेष दिवस सांगितले आहेत. लेखिकेनं श्री. केशवराव आपटे यांचं ऋण पदोपदी कृतज्ञतापूर्वक व्यक्त केलं आहे. चरित्रातील काही प्रकरणं लेखिकेच्या मुलाला म्हणजे चि. कौस्तुभ याला उद्देशून आहेत. तरी ती सर्व वाचकांसाठी आहेत असं लेखिकेनं स्पष्ट केलं आहे.

लेखिकेचं हे पाचवं पुस्तक. पाच पुस्तकं म्हणजे त्यांचे पंचप्राण आहेत. पण मला वाटतं की हे पुस्तक पाच प्राणांपैकी मुख्य प्राण आहे. नेहमीप्रमाणे त्यांचे पती श्री. शशीकान्त कुंटे यांनी भरपूर मदत केली आहे. श्री. दयानंद शाळिग्राम स्वामींवर पूर्ण श्रध्दा असल्यामुळे प्रत्येक पुस्तक पुरं झाल्यावर सर्वप्रथम शाळिग्राम स्वामी समाधी मंदिरात (गणेशपुरी) त्या पुस्तकाचं वाचन करतात. मगच शाळिग्रामाच्या संकेतानं ते प्रिंटिंगला जातं. ह्या वाचनाचं भाग्य बहुतेक वेळा त्यांची मुलगी सौ. अश्विनी व जावई श्री. अजित करंदीकर यांनाच लाभतं. 'आपले बाबाजी' या पुस्तकाच्या वेळी लेखिकेच्या परिवारात त्यांना साजेशी स्नुषा सौ. प्रिया हिचं आगमन झालं आहे. तिचीही साथ लाभल्यामुळे 'कौस्तुभ', 'प्रिया', 'अजित', 'अश्विनी' यांनी हे वाचन केलं. यांचंही मोलाचं सहकार्य लेखिकेला मिळालं आहे.

लेखिकेचं अध्यात्मिक जीवन नित्य टवटवीत आणि समृध्द राहो हीच सदिच्छा!

- डॉ. श्रीराम महादेव भातखंडे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

॥ श्री ॥

प्रिय कौस्तुभ यास

अनेक उत्तमोत्तम शुभाशीर्वाद

आपल्या आईनं तुझ्यासाठी लिहिलेलं 'आपले बाबाजी' हे पुस्तक वाचलं आणि आईच्या सार्थ अभिमानानं, अत्यंतिक प्रेमानं हृदय भरून आलं. बाबाजींच्या फोटोसमोर हात जोडून मी उभा राहिलो. गहिवरून आल्यामुळे एकही शब्द मुखातून निघाला नाही. डोळ्यातून आनंदाश्रूंच्या धारा लागल्यामुळे फोटोही नीट दिसेना. अत्यंत महान आणि थोर विभूती असलेल्या त्यांच्यासमोर मनानं मी अक्षरशः लोटांगण घातलं.

'महायोगावतारी' या विशेषणातच त्यांच्या महत्तेची पूर्ण कल्पना येते. आद्य शंकराचार्यांसारख्या सर्वमान्य श्रेष्ठ संन्याशांना सन ७८८ ते ८२० या काळात क्रियायोगाची दीक्षा दिलेले बाबाजी आजही त्यांचं कार्य करत आहेत, याचा प्रत्यक्ष अनुभव आपली आई घेत आहे. बाबाजींचं आपल्या आईवर किती प्रेम आहे ह्याची कल्पनाही आपल्याला करता येणार नाही हे जरी खरं असलं ना, तरी अरे बाळा, त्यासाठी आपल्या आईनं किती जन्म मेहनत घेतली असेल याची कल्पना कर.

विशुध्द अंतःकरण व शरणभाव धारण करून, आपली आई बाबाजींना जशी प्रिय झाली तसाच तूही त्यांना प्रिय होण्यासाठी प्रयत्न कर. तुला हे नक्की प्राप्त होईल. अरे ! तुलाच काय, प्रयत्न करणाऱ्या कोणालाही हे प्राप्त होणारच.

तुझ्यासारखा खरा-खरा गुणी मुलगा आईबाबांना मिळाला हे त्यांचंही भाग्यच आहे. 'अजित-अश्विनी' व 'कौस्तुभ-प्रिया' हीच आमची लाख मोलाची धनसंपदा आहे. ती शाळिग्राम स्वामींच्या कृपाप्रसादात वृध्दिंगत होत राहो.

तुझ्याबद्दल व सर्व साधकांविषयी तिच्या अंतरात वात्सल्याचा झरा वाहतो. ती खरी खरी सर्वांचीच आई आहे रे. ती दाखवणार नाही, पण प्रत्येकाच्या श्रेयसासाठी अखंड प्रयत्नशील असलेली आपली आई तिच्या अनेक गुणांमुळे बाबाजींना प्रिय झाली आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तिच्या प्रेमाखातर व सर्व जीवांविषयी माया असणाऱ्या तिच्या मातृहृदयामुळेच, हिमालयाच्या उत्तुंग शिखरावर वास करणारे बाबाजी आज अदृश्य रूपानं आपल्या सर्वांच्यात वास करून आहेत. 'महायोगावतारी बाबाजी' न म्हणता त्यांना 'आपले बाबाजी' म्हणून आईनं सर्वांनाच बाबाजींच्या जवळ नेलं.

अनेक जन्मांच्या पुण्याईनं प्राप्त होणारे हे 'बाबाजी' आज आपल्या आईच्या या पुस्तकाच्या आधारे सहज साध्य होतील याचा मला पूर्ण विश्वास आहे.

कसून प्रयत्न व शुध्द अंतःकरण यांच्या साहाय्यानं सर्वांनाच बाबाजींच्या कृपाप्रसादाचा लाभ व्हावा अशी मी त्यांच्याच चरणी प्रार्थना करत आहे.

तुझ्यासह सर्व वाचकांना माझे आशीर्वाद आहेत. सर्वांचेच लाडके व्हा, निर्भय व्हा, यशस्वी व्हा. यासाठी तुम्हा सर्वांनाच माझे कल्याणकारी अनेक उत्तमोत्तम शुभाशीर्वाद आहेत.

तुझेच
अप्पा
(कै. श्री. केशवराव आपटे)

नित्यानंद जयंती
३० नोव्हेंबर २००१

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



गणेशपुरीचे भगवान नित्यानंद

व

श्री दयानंद शाळिग्राम स्वामी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



यशस्वी निर्भय जीवन जगण्यास मला शिकवणारे
कै. श्री. केशवराव (अप्पा) आपटे, ठाणे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ॐ राम

अनुक्रमणिका

१)	बाबाजींनी आपला शब्द पुरा केला	१
२)	मी ज्योतिरूप झाले	३
३)	अश्वत्थ वृक्षापलीकडे	६
४)	हा देह म्हणजे मी नाही	८
५)	तुझं आहे तुजपाशी	९
६)	भारत अध्यात्मिक शक्तिकेंद्र	११
७)	बाबाजींचं बालपण	१३
८)	परम पूज्य बाबाजी	१५
९)	आपले बाबाजी	१८
१०)	अमर गुरुदेव बाबाजी	१९
११)	योगिराज शामाचरण लाहिरी महाशय	२०
१२)	ज्ञानावतार स्वामी युक्तेश्वरगिरी	२४
१३)	प्रेमावतार परमहंस योगानंद	२७
१४)	शिवेंद्र कंदाहारी	३०
१५)	उत्पत्ति-स्थिति-लय	३२
१६)	मायातीत हो	३५
१७)	स्मर्तृगामी बाबाजी	३७
१८)	स्वत: मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही	३९
१९)	गंगास्नान	४१
२०)	बाबाजी प्रणीत क्रियायोग	४३
२१)	अतिशुध्द व पवित्र असाच तुला देईन	४६
२२)	शाळिग्रामचा केशव तुझा आहे	४८
२३)	तुला मंजूर ते मला मंजूर	५०
२४)	लाडला बेटा शाळिग्राम स्वामी	५३
२५)	नाना देही देव एक विराजे	५८
२६)	सर्व काही पूर्वनियोजितच	५९

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

२७) भगवान नित्यानंद ६०
२८) प्रसन्नतेचा प्रसाद लुटावा ६३
२९) पुस्तक लिहिण्यास कारण ६४
३०) पुस्तकाचं महत्त्व ६७
३१) कौस्तुभ एवढेच वाचकही प्रिय ६९
३२) इच्छिताती देव स्वर्गीचे सकल ।
मिळो एक वेळ नरदेह ।। ७१
३३) नम्रता ७३
३४) कृतज्ञता आणि मानवता ७३
३५) आपलं कर्माचरण ७४
३६) स्वत:ला ओळखा ७५
३७) आरपार बघा ७५
३८) अंत:करण स्थिर ठेवा ७६
३९) अन्यायाला प्रतिकार केलाच पाहिजे ७७
४०) लक्ष्मीसहित नारायणाची उपासना करावी ७८
४१) बाबाजींचं बोलणं मृदुमुलायम ७९
४२) प्रेम अंगभूत गुण ८०
४३) पूर्णानंद उदया आला ८१
४४) संपूर्ण निष्ठा हवी ८२
४५) माझी दृष्टीच बदलून गेली ८४
४६) परमेश्वराचं स्वरूप ओळखून मृत्यूला समजून घ्या ८५
४७) अंतरातील खाण खणा ८९
४८) आरती सत्‌चित्‌ आनंदाची ९०
४९) बाबाजींच्या कृपाप्रसादासाठी ९२
५०) शत कोटी प्रणाम ९३
५१) जयजयकार ९४
५२) आहेत आपुले बाबाजी ९५

बाबाजी स्तवन - श्रीमती सीमा देशमुख ९८

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वाचकांशी हितगुज !

प्रिय वाचकहो,

आपल्यात वास करणाऱ्या त्या आत्मशक्तीला माझा भावपूर्ण नमस्कार. आज नरकचतुर्दशी. दीपावलीच्या शुभदिनीच हे पुस्तक लिहून पूर्ण झालं हाही एक चांगला योगच. दीपावलीची ही ज्योत भक्तीची ज्योत होऊन आपलं अंत:करण भक्तिप्रकाशानं उजळून जावं हीच सर्व संतचरणी प्रार्थना. 'अनुभूतिमाला' व 'ॐ केशवाय नम:' ह्या दोन पुस्तकांमुळे आपली चांगली ओळख होऊन आपण मित्रत्वाच्या नात्यानं जोडले गेलो आहोतच. आपला ऋणानुबंध अधिक दृढ होत, आपण सर्वजण मला कौस्तुभ एवढेच प्रिय झाला आहात.

आपणा सर्वांना बाबाजींची ओळख व्हावी म्हणून आजचं हे पुस्तक 'आपले बाबाजी' आपल्या हातात देताना मला अत्यानंद होत आहे. त्याचं मुख्य कारण बाबाजींनी हे पुस्तक लिहिण्यास मला सांगितलं, त्यासाठी त्यांनी सर्वतोपरी मदतही केली आणि पुस्तक पूर्ण झालं.

१८०० पेक्षा जास्त वय असलेल्या, सर्वसंचारेश्वर, चिरतरुण बाबाजींची आपल्याला माहिती व्हावी व अध्यात्मातील अंतर्गत साधनेची कल्पना येऊन आपण त्यासाठी प्रयत्न करावा. उत्कृष्ट समृध्द जीवन जगत आपल्यातील जीवाची शिवाशी ओळख व्हावी, जिवाशिवाचं मीलन होऊन आपल्याला पूर्णानंदाचा लाभ व्हावा अशी बाबाजींचीच इच्छा आहे.

माझे बाबाजी आणि तुम्ही यामधला मी एक दुवा आहे. केवळ पोस्टमनप्रमाणे मी हे पुस्तक आपल्यापर्यंत पोहोचवत आहे.

बाबाजींना भेटण्याची ओढ आपल्याला लागावी, त्यासाठी आपल्याकडून काही प्रयत्न झाले तर आपल्याला मदतीचा हात द्यायला बाबाजींना अतिशय आवडेल. कारण 'आपली उन्नत अवस्था' हाच बाबाजींचा खरा आनंद आहे हं आणि त्यासाठी हरघडी, हरक्षणी सर्वांना मदत करण्यासाठी ते पूर्णपणे तत्पर असतात.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

परंतु तत्पूर्वी आपल्याला एक महत्त्वाची गोष्ट सांगायची आहे. आपला एक गैरसमज असतो तो असा - रोज दोन तास पूजा-अर्चा करणारा, पोथी वाचणारा, पुराण सांगणारा किंवा तत्त्वज्ञानावर चर्चा करणारा हा अध्यात्मिक असतो. पण तसं नाही हं ! तसं अजिबात नसतं. अशी व्यक्ती ही केवळ धार्मिक असते. हे सर्व करण्याची गरज आहेच. कारण या सर्वांमुळेच आपले विकार, दोष कमी होत होत आपण सदाचारी होऊ लागतो. या सर्वांमुळे आपला पुण्यसंचय वाढून सत्संगतीचा आपल्याला लाभ होतो. याच्याच आधारे भगवत्-प्रेमाची ओढ लागते. 'बहुत सुकृताची जोडी म्हणुनी विठ्ठल आवडी' असं म्हणतात ना ? या पुण्याच्या आधारे आपण परमार्थाच्या वाटचालीस सुरवात करतो.

आपण जे नाम-ध्यान-भजन-पूजन करतो त्याला उपासनेची सुरवात म्हणू या. पण ती खरी भक्ती नाही, तर त्याच्यामुळे आपली शारीरिक व मानसिक शुध्दी होत असते. रजोगुणातून सत्त्वगुणाकडे आपली वाटचाल सुरू होते. आपल्या वृत्ती शांत होतात. आपलं आत्मिक बल वाढतं. ह्याचीच आवश्यकता असते आणि 'नाम' हेच करत असतं. म्हणून अखंड नामात रहावं असं संत सांगत असतात. ह्या आधारेच आपण परमशक्तीला जाणू लागतो. आपल्या श्रध्दास्थानाविषयी आपल्या मनात जिव्हाळा निर्माण होऊन त्याच्याविषयी अत्यंत आवड निर्माण होते.

जसजसे आपल्या श्रध्दास्थानास आपण ओळखून, समजून घेऊ लागतो, तसतशी त्याची सर्वव्यापकता, त्याच्या सर्व कर्तुम् अकर्तुम् शक्तीची आपल्याला ओळख होते. त्याच्याच कृपेने आपण त्याच्याशी जोडले जातो ना ? तेव्हाच आपण भक्त होतो. कारण त्याच्यापासून जो विभक्त नाही तो भक्त. इथेच भक्तीची सुरवात होते.

"निर्गुण निराकार असे जे अव्यक्त । सगुण साकार तेचि होय व्यक्त ।
नांदे जीवाठायी परमात्मा अंश । प्रत्यगात्मा म्हणती त्यास परब्रह्मवंश ।
अहंकारासवे खेळे तो जीवात्मा । अध्यात्म ते ओळख तू परमात्मा ।
जीवन विकासार्थ घडे जे कर्म । उन्नत करा जीव हाचि गीताधर्म ।"

शाळिग्राम गाथांबुज २२

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जिवाशिवाच्या भेटीसाठी केलेले प्रयत्न ही खरी साधना. आत्म्याला परमात्म्याची ओळख होऊन आत्म्यानं परमात्मा होण्यासाठी केलेले प्रयत्न म्हणजे खरी अध्यात्मिक साधना.

'आपल्या जीवाचा विकास करत जिवाशिवातील अंतर कमी करत उन्नत अवस्था प्राप्त करावी', हेच भगवत्‌गीता आपल्याला शिकवते.

प्रिय वाचकहो, बाबाजींना आपल्याकडून हीच अपेक्षा आहे. पूजापाठ, पोथीवाचन हे आपलं नित्यकर्म आहे. याच्या बरोबरच सद्‌गुरूंनी दिलेलं व आपल्या आवडीचं भरपूर नाम व १५ मिनिटं रोज ध्यान करत जावं म्हणजे खऱ्या साधनेला सुरवात होईल.

ध्यान म्हणजे एका जागी स्वस्थ बसावं म्हणजे आसन व मन स्थिर होईल. हळुवार मंद श्वासाकडे लक्ष ठेवून वृत्ती शांत करायला शिकावं. मनात येणाऱ्या विचारांना आवर घालण्यासाठी मनाला नामाबरोबर जोडून द्यावं आणि काय होतं ते पहावं.

जिवाला लागलेली भगवंताची ओढ, तळमळ, त्यासाठी केलेले कसून प्रयत्न आणि सातत्यानं काही काळ धीर धरला तर आपली साधना सुफल संपूर्ण झाल्याशिवाय रहाणारच नाही याची खात्री आहे. आणि हो ! उद्यापासून नको हं, आजपासूनच खऱ्या प्रयत्नाला सुरवात करावी आणि माझे बाबाजी, तुमचे बाबाजी होऊन ते आपल्या सर्वांचेच 'आपले बाबाजी' होवोत हीच मनापासूनची इच्छा आहे.

''बाबाजी ऽऽ, आपण परमदयाळू, कृपाळू आहातच. पण आज मी एक बालहट्ट करणार आहे. ''खऱ्या आंतरिक ओढीनं तुम्हाला साद घालणाऱ्या माझ्या प्रिय वाचकांना आपण एखादी तरी अनुभूती देऊन साधनेसाठी उत्साहित करावं. हा हट्ट, ही विनंती, ही प्रार्थना.'' आपल्या पवित्र पावन चरणकमलांचा लाभ झालेले आम्ही सर्वजण कृतार्थ आहोत- कृतार्थ आहोत- कृतार्थ आहोत.

- सौ. उज्वल श. कुंटे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रेम देऊ, प्रेम घेऊ

प्रेम देऊ, प्रेम घेऊ
एकच सूर आपण गाऊ ।।धृ.।।
आत्माराम अंतरी पाहुनी
पहिले पाऊल क्षणात उचलू ।।
लेउन सद्‌गुण प्रेम देउनी
बाबाजींचा आशिष घेऊ ।।
बाबाजींना शरण जाउनी
जीवाशिवाची भेट घेऊ ।।
शांती तृप्तीचा हात धरूनी
भक्तिप्रेमे रंगून जाऊ ।।
वरदहस्त हा देता गुरूंनी
आनंदाला घेउन येऊ, घेउन येऊ ।।

\- सौ. उज्वल कुंटे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१. ।। बाबाजींनी आपला शब्द पुरा केला ।।

क्षणभर काय होतंय ते मला कळलंच नाही. दुपारचं आवरून जराशी स्वस्थपणे मी खुर्चीत बसले. टी.व्ही. बंद केला. जरासा वाचून पेपरही ठेवून दिला. कारण दोन्हीतही माझं अजिबात लक्षच नव्हतं. त्याचं जरासं हसू आलं आणि मी अलगद डोळे मिटून घेतले. काही क्षणच गेले असतील. मी अंतर्मुख झाले. आपोआप भ्रूमध्यात दृष्टी स्थिर झाली. तिथे एक लहानशी ज्योत दिसू लागली आणि बघता बघता माझ्या मस्तकातून ती वरच्या दिशेने बाहेर पडली. काही अंतरावरच प्रकाशाचा झोत दिसला. म्हणून दिशा बदलून, त्या प्रकाशाकडे मी जाऊ लागले. मी म्हणजे ती ज्योत हं ! तो प्रकाशही माझ्याच दिशेने येत होता.

त्यावेळी ज्योतीचा प्रकाश व बाजूचा प्रकाश ह्या दोन्हींचा रंग एकच म्हणजे सुखद तेजस्वी पांढरा दिसत होता. मला ज्योतीचा आकार होता. बरोबरचा प्रकाश निराकार होता. त्या प्रकाशातच मी पुढील मार्ग चालू लागले.

मी विचार करत होते. कुठे जातेय मी ? मला तर कुठेच जायचं नव्हतं. मला माझ्या अस्तित्वाची पूर्ण जाणीव होती. त्या प्रकाशाबरोबर अलगद तरंगत मी पुढे वर वर जाऊ लागले. तेव्हा जास्तच प्रसन्न वाटू लागलं. अत्यंत सुखावून मी आपोआप अलगदपणे पुढे पुढे जात होते आणि -

आणि एक वृक्ष दिसला. सुंदर डेरेदार होता तो. माझ्याबरोबरचा प्रकाश चटकन त्या वृक्षापलीकडे गेला. क्षणभर मी स्थिरच राहिले. कसली तरी पूर्वस्मृती जागी झाल्यासारखी वाटली. नीट आठवलं नाही. पण आपल्याला पलीकडे जाता येईल ना ? अशी शंका मात्र आली. तरीही मी पुढे जाऊ लागले. ज्या सहजपणे तो प्रकाश पलीकडे गेला ना तितक्याच सहजपणे मीही त्या वृक्षापलीकडे गेले आणि माझं मलाच नवल वाटलं. काहीतरी विशेष जाणवलं.

लहान बाळाला चालायला यायला लागल्यावर कसा आनंद होतो, त्या आनंदासाठी ते बाळ चालू लागतं - पडतं तरीही हसू लागतं व पुन्हा पुन्हा चालतं ना,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अगदी तशाच आनंदानं त्या वृक्षाच्या आरपार मी चार पाच फेऱ्या मारल्या. तळ्यात मळ्यात खेळल्यासारख्या. थोडा वेळ बागडले, हसले. त्यावेळी तो प्रकाश बाजूलाच होता. थोडंसं खेळून मी पुन्हा त्या प्रकाशात आले.

त्या प्रकाशात येताच, तो माझ्या ज्योतीच्या प्रकाशात पाझरल्यासारखा मिसळून गेला. एकरूप झाला. वेगळीच अनोखी अनुभूती होती ती, अननुभूत अशी. आनंदाच्या पलीकडील स्वानंदात मिसळून गेल्यासारखी. पण -

पण छे, नीट नाही सांगता येत, शब्दच सापडत नाहीयेत मला. ते व्यक्त करायला प्रत्येक शब्द अपुरा पडतोय. खरं सांगू, ही गोष्ट लिहिण्याची नाही, सांगण्याचीही नाही, बोलण्याची तर नाहीच नाही. ही गोष्ट आहे अनुभवण्याची. तिचा मी अनुभव घेत होते, सुखावत होते, फुलत होते. तर -

तर काय? हे मला सांगत होते, 'मी ऑफिसला जातोय. दार लावून घे.' ह्यांच्या ह्या वाक्याबरोबर डोळे उघडून पाहिलं, तर माझे पाय जमिनीवरच होते. आमचे अप्पा व माझी आई अजून झोपले होते. बाई भांडी घासून निघाली होती. वामकुक्षी करून हे ऑफिसला निघाले होते. जाताना दार लावायला सांगत होते. उठून मी दार लावलं.

हो! दार लावलं मी घराचं. पण आठवणींचं दार मात्र सताड उघडलं गेलं. अत्यंत सुखावून त्या आनंदातच विसावण्यासाठी मी जराशी चटईवर आडवी झाले.

हं ! आज तारीख १३ सप्टेंबर २००१. म्हणजे त्या गोष्टीला बरोबर एकवीस वर्षं झाली की ! आता तेव्हा काय घडलं ते सांगते. म्हणजे आज काय घडलं ते कळेल.

माझ्या 'अनुभूतिमाला' या पुस्तकात मी हे सर्व विस्तारानं सांगितलं आहे. त्यातला मुख्य भाग तेवढा परत सांगायला हवाच. कारण आजच्या अनुभूतीचं मूळ एकवीस वर्षांपूर्वीच्या अनुभूतीत घट्ट रुतलेलं आहे. परमपूज्य - महायोगावतारी बाबाजींनी त्यांचा शब्द पुरा केला होता.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

२. ।। मी ज्योतिरूप झाले ।।

अचानक अद्भुत अशी एखादी घटना माझ्या जीवनात घडून मी अंतर्बाह्य बदलून जाईन अशी पुसटशी कल्पना सुध्दा मनाला कधी शिवली नव्हती. गूढ, अगम्य, मनाच्या आणि कल्पनेच्या पलीकडील अशी ही घटना प्रत्यक्षात घडली होती.

अघटित वाटावी अशी एक रात्र माझ्या जीवनात येऊन माझा कायापालट करून गेली. ३ मे १९८० ची ती रात्र. दहा वाजल्यापासून अचानक सुरू झालेला दम्याचा त्रास प्रतिक्षणी वाढू लागला. एक-दीडच्या सुमारास हे डॉक्टरांकडे गेले. डॉक्टर म्हणाले, ' तू पुढे हो मी आलोच.' हे घरी आले. दोन-अडीच वाजले तरी डॉक्टरांचा पत्ता नव्हता. मला श्वासोच्छ्वास करता येत नव्हता. श्वासासाठी जीव कासावीस झाला होता, तळमळत होता. दम्याचा आलेला अॅटॅक सहन करण्यापलीकडचा होता. पुढचा क्षण आपला नाही ह्याची खात्री वाटत होती. त्याचवेळी "योगीकथामृत" पुस्तकातील एक ओळ आठवली. प.पू. लाहिरीमहाशयांनी सांगितलं होतं, "जेव्हा जेव्हा कोणी बाबाजींचं नाव अत्यंत पूज्य बुध्दीनं घेत असतो, तेव्हा तेव्हा त्या भक्तावर अनुग्रह होतो." ह्या वाक्याचं मला स्मरण झालं. प्राण कंठाशी आल्यामुळे अत्यंत अगतिक अशा अवस्थेत मी बाबाजींना पूर्णपणे शरण गेले.

त्याक्षणी तरी जगण्याचा मला मोह नव्हता. ह्या असह्य अवस्थेत माझ्या श्वासावरही माझी सत्ता नाही ह्याची जाणीव झाल्यामुळे असेल कदाचित किंवा अत्यंत शरणभाव धारण झाला असेल म्हणूनही असेल अथवा पूर्वजन्माची पुण्याई होती म्हणूनही असेल कदाचित, पण त्या महायोगावतारी बाबाजींची अपार कृपाच माझ्यावर झाली हेच सत्य.

प.पू. बाबाजींच्या कृपाप्रसादामुळेच शरण भाव धारण होऊन माझ्या हृदयातून एक तेजस्वी ज्योत बाहेर पडली. पिवळसर रंगाची प्रखर तेजाची ती ज्योत वरवर जाऊ लागली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्या अवर्णनीय अवस्थेचं शब्दांत काय वर्णन करू ? ती ज्योत म्हणजेच मी होते. ह्या देहातील, मनातील विचार, संस्कार त्या ज्योतीबरोबर होते. नव्हतं ते फक्त हे जड शरीर. ज्योतिर्मय अशी मी व प्रकाशरूप बाबाजी असे आम्ही दोघंजण खूप वर अलगद तरंगत वर वर गेलो. तिथे एक मोठा वृक्ष होता. बाबाजी चटकन त्या वृक्षापलीकडे गेले. मी मात्र पुढे जाऊ शकत नव्हते. पुन्हा पुन्हा प्रयत्न करत होते तरी मी जिथल्या तिथेच होते. शेवटी न राहवून मी बाबाजींना म्हणाले, ''मला सुध्दा पलीकडे यायचं आहे.'' तर हसण्याच्या मधुर झंकाराबरोबर शब्द निनादले, ' येणार आहेसच, पण अजून वेळ आहे.' त्यांनी असं म्हणताच भूतलावरील माझ्या जडदेहाचं भान येऊन शारीरिक क्लेश पुन्हा जाणवू लागले. अजून वेळ आहे तर मी थांबायला तयार आहे, पण आता काय करू ? असा मनात विचार येताच, 'गूळ मिठाची गोळी घे' असं ते म्हणाले.

रात्रीचे तीन वाजून गेले होते. बसल्या बसल्या ह्यांचा डोळा लागला होता. त्यांना उठवून गोळी करून द्यायला सांगणार कसं ? दम्याच्या त्रासानी मला तर शब्दही बोलता येत नव्हता. ह्यांनी स्वत:च उठून मला विचारलं, ' तुला काही हवय का ?' गूळ-मिठाची गोळी करून देण्यास मी सांगितलं. त्यावर किती घेऊ ? काय करू ? वगैरे काहीही न विचारता ह्यांनी करून दिलेली गोळी मी पाण्याबरोबर घेतली. पाच मिनिटातच मला झोप लागली. ह्यांना मात्र 'मला गोळी करून दिल्याचं' अजिबात स्मरत नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी मला जरा उशीराच जाग आली. त्रास खूपच कमी झाला होता. डॉक्टरांना सकाळी आठवण झाली. म्हणून ते व्हिजिटला आले. मला म्हणाले, ''मी यायला निघालो होतो. पायातही बूट घातले, पण काय सांगू ? मला बसल्या बसल्या झोप लागली. सॉरी हं, तुला खूप त्रास झाला असेल.'' खरं तर त्यांची काहीच चूक नव्हती. ते आले असते तर अशी दिव्य अनुभूती मला आलीच नसती. ही सर्व बाबाजींचीच किमया.

खरं तर अध्यात्म, परमार्थ असं काही असतं असा मला गंधही नव्हता. त्यादृष्टीनी काही वाचणं, ऐकणं, बोलणं - कशाशीही कधी संबंध आला नव्हता.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तरीही मला जाणवत होतं की हे काहीतरी अद्वितीय आहे. परम कोटीतील एक अनुभूती मी अनुभवली होती. गीतेत सांगितलेला ''ऊर्ध्वमूलमध:शाखम्'' असा जो वृक्ष आहे तो तोच होता. त्याच्या पलीकडे गेलेल्या बाबाजींबरोबर मलाही पलीकडे जायचं आहे हे सत्य होतं. हा विचार करत असतानाच एक काव्य स्फुरलं.

भयाण अंधारी रात्र होती
दु:ख द्यावया आली होती
त्या दु:खाने पिचून गेले
तार अथवा मार म्हणाले
देही मारून त्याने मला
आत्म्याला तो तारून गेला
सुटता बंधन देहाचे
ज्योतिरूप झाले आत्म्याचे
शरणांगत मी पुरी जाहले
ज्योत बनुनी उंच गेले
सुंदर बोल तो हळूच वदला
नाद मधुर मी कानी ऐकला
हास्याच्या त्या झंकाराने
जगते मी पुनर्जन्माने

घेतलेल्या अनुभूतीचं तंतोतंत वर्णन म्हणजे हे काव्य मी लिहिलं. ह्या अनुभूती बरोबरच काव्य स्फुरण्याची एक अनमोल अशी दिव्य देणगी पू. बाबाजींनी मला बहाल केली.

ह्याचवेळी माझं नष्टचर्य संपून अध्यात्मिक जीवनात माझं पदार्पण झालं.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

३. ।। अश्वत्थ वृक्षापलीकडे ।।

महायोगावतारी बाबाजींच्या बरोबर त्या वृक्षापलीकडे मला एकवीस वर्षांपूर्वी जाता आलं नव्हतं. पलीकडे जाण्यासाठी अजून वेळ आहे असं बाबाजींनी मला सांगितलं होतं. त्यावेळी मला त्याचा अर्थ समजला नव्हता. एका वृक्षाच्या पलीकडे मला जायचं आहे एवढाच संकेत होता. पण हा वृक्ष साधा नव्हता. गीतेतील पंधराव्या अध्यायात पहिल्या श्लोकात श्री भगवान सांगतात,

ऊर्ध्वमूलमध:शाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् ।
छन्दांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ।।

वरच्या बाजूला मूळ आणि खालच्या बाजूला फांद्या असलेला शाश्वत म्हणजे चिरकाल टिकणारा असा हा वृक्ष आहे.

या संपूर्ण सृष्टीतही हा अश्वत्थ वृक्ष आहे. सर्वश्रेष्ठ परब्रह्म हे ज्याचं मूळ आहे ते वरच्या बाजूला असून मायेच्या रूपाने विस्तारलेल्या फांद्या खाली आहेत. या वृक्षाची पानं म्हणजेच वेदमंत्र. या सर्व पानांनी या वृक्षाचं मूळ पूर्णपणे झाकून गेलेलं आहे. क्षणाक्षणाला स्थित्यंतर होणाऱ्या या सृष्टीचं यथार्थ ज्ञान होऊन या पलीकडे वरच्या बाजूला असलेलं, कधीही न बदलणारं शाश्वत निरंतर तत्त्व जो जाणतो तोच 'वेदवित्' म्हणजे वेद जाणणारा असतो.

तसंच हा वृक्ष आपल्या शरीरातही आहे. आपल्या मस्तकाच्या वरच्या भागात सहस्त्रार चक्र असतं. इथंच आध्यात्मिक शक्तीचं केंद्र असतं. तिथंच परमात्म्याचं मूळ तत्त्व वास करून असतं. ते ऊर्ध्व म्हणजे श्रेष्ठ मूळ वरच्या बाजूला असून खाली हात, पाय, इंद्रियं व आपलं पूर्ण शरीर असतं. हेही अश्वत्थ वृक्षाचं प्रतीकच आहे.

अशाश्वत असलेल्या या शरीरात अनेक सूक्ष्म नाड्या व ज्ञानतंतू वरून खाली व खालून वर पसरलेल्या असतात. हा आपल्या बुध्दीच्या, विचाराच्या टप्प्यात न येणारा, न समजणारा, अनाकलनीय असा संसाररूपी अश्वत्थ वृक्ष वैराग्य शस्त्रानं छाटून, आपल्याला सर्वांनाच परमपदाला जायचं आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सद्गुरूंच्या कृपाप्रसादाने, आपल्या अविरत प्रयत्नाने आणि दृढ श्रध्देने, आपल्याला अधिक उन्नत होत पुढं जायचं आहे.

महायोगावतारी बाबाजींच्या अत्यंतिक कृपाप्रसादामुळेच, ध्यानी, मनी नसताना, आज एकवीस वर्षांनी त्यांनी स्वत:बरोबर मला त्या वृक्षापलीकडे नेलं. कबूल केल्याप्रमाणे आपला शब्द त्यांनी खरंच पुरा केला आणि माझ्या अनंत जन्मांचं सार्थक झालं.

पहिल्याने मी ज्योत बनून हृदयातून बाहेर पडले होते आणि आज माझ्या मस्तकातून ज्योतीरूपाने बाहेर आले होते. आम्ही दोघेही प्रकाशरूपच होतो. तरीही मी ज्योतीच्या आकारात बध्द होते. बाबाजी निराकार मुक्तच होते. या वृक्षापलीकडे गेल्यावर त्यांनी अत्यंत प्रेमानं मला जवळ घेतलं. त्याबरोबर माझ्या पूर्वीच्या अनुभूतींचे विशेष महत्त्वपूर्ण अर्थ आपोआप मला समजू लागले.

त्याचवेळी माझ्या डोक्यावर टपली मारल्यासारखं करून माझ्या हातात बाबाजींनी एक सुंदर, निळसर पेन दिलं. हं ! समजलं म्हणजे माझ्या अनुभूतींच्या आधारे विशेष गोष्टी सांगत बाबाजींवरच काही लिहिण्याची मला स्पष्ट आज्ञा झाली आहे.

बाबाजींनी सोपवलेलं काम करण्यास पूर्णपणे असमर्थ असणारी मी क्षणभर नि:शब्द, अबोल झाले. पण क्षणभरच, कारण ते काम त्यांचं आहे आणि करवून घेणारे स्वत: बाबाजीच असताना मला शंका अशी नाहीच. फक्त दृढ विश्वासानं प्रयत्न करणं एवढंच तर माझं साधंसं काम.

'शुभस्य शीघ्रम्' असं म्हणून लगेचच २७ सप्टेंबर २००१ या दिवशी मी लिखाणास सुरवात केली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

४. ।। हा देह म्हणजे मी नाही ।।

त्या दिवशी ध्यानात मी मलाच पहात होते.

एका विस्तीर्ण माळरानावर मी एकटीच उभी होते. आजुबाजूला कोणीही नव्हतं. इतक्यात एक विमान वरच्या बाजूनं जोरात आलं आणि वेगानं येऊन माझ्या देहाच्या चिंधड्या करत दूर गेलं. कुठलंही रूप नसलेली मी (ज्योत सुध्दा नाही) केवळ जाणीव रूपानं हवेत तरंगत आहे असं जाणवत होतं. खाली छिन्नविच्छिन्न झालेलं, जणू चिंधड्या उडाल्या आहेत अशा अवस्थेतील माझं शरीर मला दिसत होतं, जाणवत होतं की हे शरीर म्हणजे मी नाही, तो देह म्हणजे मी नाही, तर त्या देहात असणारी चेतना म्हणजे मी. आता त्या देहापासून दूर असून अस्तित्व जाणवणारी 'मी' मला जाणवतेय.

म्हणजे हा जो 'मी' आहे ते काय आहे ? तो कोठून आला ? कोठे जाणार ? वगैरे प्रश्नांनी मी परत माझ्या ह्या देहामध्ये जागी झाले.

जन्मजन्मांतरीच्या संस्काराने 'हा देह म्हणजे मी' असा जीवावरचा संस्कार ह्या एकाच अनुभूतीतून पार नाहीसा होऊन मला माझीच नव्यानं ओळख झाली.

मोह संपला ह्या देहाचा
खेद संपला दु:ख पीडेचा
भ्रम निरास झाला अज्ञानाचा
विमानातळी नाश होता ह्या देहाचा
जळून जाऊ दे देहलताही अवघी
खाक होऊ दे बंधने आत्म्याची सारी
मोह तुला का ह्या नश्वर तनुचा
शोध घे तू शाश्वत आत्म्याचा
देह नाश होता जाणीव तुला ग आत्म्याची झाली
मुक्तीची जाणीव तुला ग स्पर्शुनिया गेली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आपण म्हणतो 'माझं घर' म्हणजे ते घर काही आपण स्वत: नसतो. हो ना ! आपण तर फक्त त्या घरात राहतो. त्या घराचा आश्रय घेतो. जुनं घर बदलून नवीन घरात जातो तेव्हा आपण तर 'तेच' असतो. आपण नाही बदलत.

अगदी असंच बरं का, हे 'माझं शरीर'. शरीर म्हणजे 'मी' नसून शरीरात राहणारा मी कोणीतरी वेगळाच आहे. जुनं शरीर बदलून नवीन शरीर धारण केलं तरी आत 'मी' तोच असतो.

हा 'मी' म्हणजेच 'आत्मा' त्या परमेश्वराचा एक अंश असतो. त्याचा वास आपल्या अंतरातच असतो अगदी आधीपासूनच.

आधीपासूनच आपल्या जवळ जे आहे ते जाणून ओळखणं म्हणजेच खरं 'अध्यात्म'. शांतपणे बसून आतला कानोसा घेऊन, जाणून ओळखणं ह्याला खरं महत्त्व. मानव जन्म घेऊन स्वत:तील 'स्व' ओळखणं हेच आपलं आद्य कर्तव्य.

महायोगावतारी बाबाजींच्या परम दयेनेच ' हा देह म्हणजे मी नाही' ह्या सत्य ज्ञानच्या मजबूत पायावरच हृदयातील ज्ञानमंदिराची पायाभरणी झाली.

५. ।। तुझं आहे तुजपाशी ।।

माझ्या चालू जन्मात कुठल्याही प्रयत्नाशिवाय मला मिळालेल्या या दोन अनुभूती अतिशय श्रेष्ठ दर्जाच्या आहेत. आध्यात्मिक जीवनात जीव ठराविक अशा उच्च अवस्थेवर गेल्याशिवाय हे अनुभव मिळणं शक्यच नसतं. पूर्वसुकृत व एखाद्या श्रेष्ठ विभूतीच्या इच्छेशिवाय हे होणं नाही. पूर्व सुकृताची मला कल्पना नाही, पण बाबाजींच्या इच्छेनेच हे सहज शक्य झालं आहे.

या जीवन्मुक्त बाबाजींचा या पुस्तकाद्वारे परिचय करून देणं हे खरं तर अशक्यच आहे. कारण त्यांची अध्यात्मिक अवस्था समजणंच अतिशय अवघड

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आहे. ती जाणायला आपल्याला या बुध्दीचा आणि कल्पनाशक्तीचा कणभरही उपयोग होणार नाही. तरीही या महायुगपुरुषाचा अल्पसा परिचय करून देण्याची मला ओढ लागली आहे. कारण ही सर्व बाबाजींचीच इच्छा आहे.

पुढे योगायोगाने माझ्या आणखी काही आवश्यक अनुभूती मी सांगणार आहेच. पण माझ्या अनुभूती सांगण्याला महत्त्व नाहीये. बाबाजींच्या कर्तुम्-अकर्तुम् शक्तीची ती प्रचीती आहे. एखाद्या अनुभूतीतच जीवाला कुठल्या कुठे उच्च अवस्थेत पोहोचवण्याची त्यांची ताकद आहे.

तुमच्या आमच्यात वावरणाऱ्या माझ्यासारख्या सामान्य स्त्रीला आजच्या घडीला जे शक्य झालं ते दुर्दम्य इच्छेनं, जीवापाड मेहनतीनं व बाबाजीच्या आशीर्वादानं एखाद्या वाचकाला सहजसाध्य होऊ शकेल, परंतु मायापाशानी ब्रध्द झालेला जीव प्रयत्नच करत नाही.

"लाखातील एक करे हा सायास । ऐसे घेता लाख प्राप्त करी एक ।
दारुण प्रयत्ने आणि दैवयोगे । सद्‌गुरु कृपे आत्मज्ञान लाभे ।।"

शाळिग्राम गाथांबुज - ११

लाखातील एखाद्याच जीवाला 'अध्यात्म विद्या' शिकण्याची इच्छा होते. असे लाखभर म्हणजे कोट्यावधीत एखाद्यालाच हे प्राप्त होतं. पण तेही सहज नाही हं !तर दारुण प्रयत्न, आपला दैवयोग व सद्‌गुरुकृपा यांचा त्रिवेणी संगम झाला तरच. पण हे होतं हे नक्की. त्रिवार सत्य.

म्हणूनच अत्यंत प्रेमानी सांगते हा भाग्यवान वाचक (जीव) आपण असलात तर - पेरा म्हणजे उगवेल नक्की. प्रयत्नांती परमेश्वर. शोधा म्हणजे सापडेल. हो सापडणारच. पण अंतरात शोधायला सुरवात करावी. कारण आपल्याला जे हवं आहे ते आपल्या जवळ आहे. हो आपल्या जवळच.

'तुझं आहे तुजपाशी'

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

६. ।। भारत अध्यात्मिक शक्ती केंद्र ।।

भारत देश खरोखरच महान आहे. तो आपला आहे म्हणून नाही हं, तर इथली भूमीच भाग्यवान आहे. सर्व मानवजातीच्या उध्दारासाठी प्रत्यक्ष परमात्म्यानं इथे कित्येक वेळा अवतार घेतला आहे. या भूमीत त्याची मुळं अगदी घट्ट रुजलेली आहेत. त्याच्या अनमोल फलाच्या रूपानं अनेक थोर संत महात्म्यांनी इथे जन्म घेतला. 'आत्म्याने परमात्मा होण्याचं तंत्र' विकसित केलं. ईश्वरी गुणांचा, परमानंदाचा, पूर्णानंदाचा त्यांनी स्वत: अनुभव घेतला. त्या तत्त्वात ते मिसळून गेले. 'आपल्याला मिळालेला हा आनंद प्रत्येक जीवमात्राला मिळावा' या एकाच इच्छेने, या आंतरिक प्रेमभावनेने ते परत परत अवतार घेतात. आत्म्याला त्या परमात्म्यापर्यंत नेऊन अवर्णनीय अशा सत्-चित्-आनंदाचा अनुभवही देतात आणि जिवाशिवाची भेट घडवतात.

यासाठीच भारताला अध्यात्मिक शक्तीचं केंद्रस्थान म्हटलं तर वावगं ठरणार नाही. महाराष्ट्राला तर संतांची भूमीच म्हणतात आणि भारताच्या नकाशावर मुकुटाप्रमाणे शोभणारा हा हिमालय निसर्गसुंदर, टवटवीत, समृध्द प्रदेश आहे. हिमालयाची अचल, उत्तुंग, धूम्रवर्णी हिमशिखरं पाहिली की आपोआपच त्यापुढे आपण नतमस्तक होतो, सृष्टीचं ते ऐश्वर्य व त्याचं विशालत्व पाहिलं की आपल्या तन मनाचा खुजेपणा सोडून त्यात मिसळून जायची ओढच लागते मनाला. संपूर्ण प्रदेश बर्फाच्छादित असल्यामुळे थंड वातावरणात कशी छान शांती भरून राहिली आहे. जणू जीवानं त्यात विरघळून जावं.

मला तर वाटतं, भोवतालच्या परिस्थितीत, संघर्षात अत्यंत स्थिर आणि शांतपणे उभे राहण्यास हा हिमालय पर्वत आपल्याला शिकवत आहे.

म्हणूनच की काय 'हिमालय' ऋषि-मुनि-तपस्वींचं आवडतं पवित्र साधना स्थान आहे. इथे अनेक योगी, तपस्वी हजारो वर्षं आपली साधना अखंडपणे करत आपलं कार्य सहजपणे करत असतात. जनसंपर्कापासून दूर रहाणं त्यांना आवडतं.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अत्यंत अवघड अशा बर्फाच्छादित जागी ते स्वत: गुहा तयार करून तिथे वास्तव्य करतात. त्यांना एकांत अतिशय प्रिय असल्यामुळे ते महायोगी एकटंच रहाणं पसंत करतात. काही जणांबरोबर त्यांचे प्रिय शिष्य असतात. हे शिष्य कठोर साधनेनं अल्पावधीतच आपली उच्च अवस्था प्राप्त करून घेतात. या शिष्यांना त्यांच्या कार्यानुसार योग्य ज्ञान व सामर्थ्य त्यांचे सद्‌गुरू देतात आणि पुढील कार्यासाठी त्यांना ठराविक जागी जनसागरात परतण्याची आज्ञा करतात.

क्वचित् प्रसंगी हे महायोगी काही कारणापुरते आपल्या गुहेतून बाहेर येतात. वेळोवेळी ते आपली वास्तव्यस्थानंही बदलत असतात. खडतर कठोर साधनेमुळे त्यांना अनेक सिध्दी प्राप्त होतात. तसंच साधना व सद्‌गुरुकृपा यामुळे त्यांना विशेष यौगिक सामर्थ्य प्राप्त होतं. वेगवेगळी रूपं घेणं, हवेतून जाणं-येणं यासारख्या गोष्टी त्यांना सहज साध्य झालेल्या असतात.

एक अतिशय महत्त्वाची गोष्ट म्हणजे या महायोग्यांची ही कर्में स्वत:च्या व्यक्तिगत स्वार्थासाठी नसून, लोककल्याणासाठी असतात. लोकांच्या (जीवाच्या) उन्नत अवस्थेत त्यांना साहाय्य करून मार्गदर्शन करणं हे त्यांचं आवडतं काम असतं.

करुणेचे सागर असलेले हे महायोगी अत्यंत तत्परतेनं व प्रेमानं आपल्याला मदतीचा हात देऊन मार्गस्थ करतात. अशाच एका महान योग्याचा मला १९८० साली स्वानुभव आला. त्यांचं नाव 'बाबाजी' म्हणजे पूजनीय पिता. 'बाबा' या संबोधनाला आदरार्थी 'जी' लावून त्यांचा 'बाबाजी' म्हणूनच श्रध्दाभावानं उल्लेख करतात. त्यामुळे आपल्याला ते अगदी आपले जवळचे असल्यासारखे वाटतात.

बाबाजींच्या पवित्र चरणकमलांना वंदन करून आपण पुढे जाऊ या.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

७. ।। बाबाजींचं बालपण ।।

तामिळनाडू राज्यात कावेरीच्या तीरावर परंगीपेटई नावाचं एक छोटंसं गाव आहे. परंगीपेटई हे दक्षिण भारतात चिदंबरम नावाच्या देवस्थानापासून १७ कि.मी. अंतरावर आहे. या देवस्थानात शिवाची सुंदर मूर्ती आहे. दक्षिण भारतात शिवाला 'नटराज' म्हणतात. त्या परंगीपेटई गावात ३० नोव्हेंबर, २०३ रोजी एका शुभ मुहूर्तावर रोहिणी नक्षत्र असताना बाबाजींचा जन्म झाला. त्या दरम्यान तामिळनाडूत 'भगवान मुरुगन' या देवाचा उत्सव साजरा करण्यात येतो.

बाबाजींचं लहानपणीचं नाव होतं 'नागराज'. बाबाजींचे आईवडील हे नंबुद्री ब्राह्मण होते. (नंबुद्री ब्राह्मण हे त्यांच्या उच्च कुलासाठी व विद्वत्तेसाठी प्रसिध्द आहेत.) बाबाजींचे वडील हे गावातील देवळात मुख्य पुरोहित होते. त्यामुळे त्यांच्या कुळात पूजा-अर्चा, वेदपठण व अध्यात्मसाधना नेहमी होत असे.

बाबाजींच्या लहानपणीच्या आयुष्यातील फारशा गोष्टी प्रकाशात आलेल्या नाहीत. परंतु त्यांच्या बालपणातील एक फणसाचा प्रसंग प्रसिध्द आहे. याच घटनेमुळे त्यांच्या जीवनाला एक वेगळं वळण लागलं. अंदाजे सहा-सात वर्षांचे असताना एक दिवस भरपूर खेळून, दमून-भागून संध्याकाळच्या वेळी बाबाजी घरी परत आले. त्यांना खूप भूक लागली होती. घरभर त्यांनी आईला शोधलं. आई दिसली नाही, पण देवघराजवळ कोपऱ्यात एक बेताचा फणस त्यांना दिसला. पिकलेल्या फणसाच्या वासानं त्यांना भुकेची अधिकच जाणीव झाली.

फणस घेऊन बाबाजी सरळ ओटीवर आले आणि फणस फोडून त्यांनी खायला सुरवात केली. बघता-बघता फणस संपून गेला. पोट भरल्यामुळे ते खूष होते. तेवढ्यात बाहेरून आई आली. फणसाच्या साली आणि बाबाजींचा अवतार पाहून, ती खूप रागावली. ब्राह्मणाला दान देण्यासाठी ठेवलेला फणस बाबाजींनी खाल्लेला पाहून तिच्या रागाचा पारा चढला. त्या रागातच आईनी त्यांना शिक्षा दिली.

'ज्या हातानं व तोंडानं तू फणस खाल्लास, तेच बांधून ठेवते.' असं म्हणत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बडबडत रागवत तिनं त्यांचे हात बांधून, फडक्यानं तोंडही करकचून बांधलं. डोळे मोठे करून त्यांच्याकडे रागावून पहात-पहात ती आपली कामं करायला निघून गेली.

तोंड बांधताना फडकं नाकावरही आलं आणि थोड्याच वेळात बाबाजींना श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. हात बांधल्यामुळे नाकावरून फडकं बाजूलाही करता येईना. त्यांचा जीव गुदमरू लागला. पण ओरडताही येत नव्हतं. त्यांची शुध्द हरपली. तेवढ्यात काही कामासाठी आई त्या बाजूला आली. त्यांची अवस्था पाहून घाईघाईनं तिनं तोंडाचं फडकं सोडलं. जिवावर बेतलं होतं. पण ईशकृपेनं ते या प्रसंगातून सहीसलामत वाचले.

केवळ फणस खाल्ल्यामुळे आई इतकी का रागावली? हे लहान वयातील बाबाजींना समजेना. जीव गुदमरल्यामुळे त्यांना खूप वाईट वाटलं. विचार केल्यावर त्यांना एवढंच कळलं की दुसऱ्यांना देण्यासाठी ठेवलेला फणस आपण खाल्ला म्हणून आईचा सात्विक संताप झाला आणि त्या संतापाच्या भरात तिनं आपल्याला शिक्षा केली. त्यांची चूक त्यांना समजल्यामुळे ते आईवर रागावले नाहीत. पण ......

पण या प्रसंगानंतर बाबाजींमध्ये खूप बदल झाला. त्यांच्या जीवनाला संपूर्ण कलाटणी मिळाली. अपेक्षारहित निरपेक्ष प्रेम करायला देवानं शिकवल्याबद्दल त्यांनी देवाचे आभार मानले आणि आपल्या आईवर निरपेक्ष निरासक्त प्रेम केलं.

पुढे बाबाजींचा तोच सहज स्वभाव झाला. त्यांनी सर्व प्राणिमात्रांवर प्रेम करायला सुरवात केली आणि बाबाजींच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

८. ।। परम पूज्य बाबाजी ।।

एकदा गावातील शिवालयात उत्सव सुरू होता. बाहेरगावची बरीच माणसं जमली होती. एका परकीय माणसानी बाबाजींना पकडलं व तो त्यांना खूप दूर घेऊन गेला. तो मनुष्य बलुचिस्तानातून आला होता. त्या माणसानं बाबाजींना कोलकत्त्याला नेलं व एका गृहस्थाला गुलाम म्हणून विकलं. सुदैवानं तो गृहस्थ चांगला होता. त्यानं बाबाजींना लवकरच बंधनातून मुक्त केलं. मुक्त झाल्यानंतर बाबाजी विद्वान संन्यासी लोकांच्या एका संघात शिरले. अनेक ठिकाणी त्यांनी भ्रमण केलं. त्या भ्रमंतीत वेद, उपनिषदं, रामायण, महाभारत, गीता इत्यादी ग्रंथांचाही त्यांचा अभ्यास झाला. अगदी लहान वयात बाबाजी एक विद्वान म्हणून मान्यता पावले. त्यांना ठिकठिकाणी विद्वत्सभेची बोलावणी येऊ लागली. वादाविवादात ते चांगलेच तरबेज झाले. आत्मा, ब्रह्म इत्यादी गूढ विषयांवर ते सहज व सोपं बोलत असत. लहान वयातील त्यांचं हे नैपुण्य एक आश्चर्याचा विषय झाला होता.

बाबाजींनी अगदी लहान वयात म्हणजे अकराव्या वर्षी पुष्कळ ज्ञान मिळवलं होतं. परंतु त्यांना आत्म्यापर्यंत पोहोचायचं होतं. त्यांना असं वाटलं की परंपरागत वैदिक ज्ञान त्यांना मोक्षापर्यंत घेऊन जाऊ शकणार नाही. शब्द हे कितीही तर्कसंगत असले, तरी ते अंतिम सत्यापर्यंत घेऊन जाऊ शकत नाहीत. शब्द फार तर मार्ग दाखवतील. परंतु ध्येय गाठायचं असेल, तर शब्दांच्या पलीकडेच जायला हवं. बाबाजी बनारस येथील संन्याशांबरोबर फिरत फिरत श्रीलंकेला जाऊन पोहोचले. तिथे त्यांनी कातिर्गाम येथील पवित्र क्षेत्रास भेट दिली. भगवान गौतम बुध्द पण तिथे आले होते. तिथे मूर्ती नाही पण सोनेरी पटावर एक यंत्र कोरलेलं आहे. ते मुरुगन या देवतेचं आहे. अजूनही हे यंत्र सुरक्षित आहे. या यंत्राची गूढ शक्ती सिध्द बोगनथर यांनी अनेकांना दिली आहे. कातिर्गामला अनेकांनी तपश्चर्या केली आहे. हे क्षेत्र आध्यात्मिक लहरींनी भरलेलं आहे. 'कार्तिकेयग्राम' या शब्दाचं अपभ्रंश रूप म्हणजे 'कातिर्गाम' होय.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

याच कालिर्गामात बाबाजींची सिध्द बोगनथर यांच्याशी भेट झाली. त्यांचं ज्ञान पाहूनच बाबाजींनी त्यांचं शिष्यत्व पत्करलं. ज्ञानगुरू सिध्द बोगनथर यांनी बाबाजींना ज्ञानयोगाची दीक्षा दिली. पुढे बाबाजींनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपळाच्या झाडाखाली बसून सहा महिने योगसाधना केली. विशेषत: अनेक ध्यानक्रिया केल्या. बाबाजी प्रथम एका वेळी सलग २४ तास, नंतर सतत ४८ तास असे ध्यानासाठी बसत. सिध्द बोगनथर यांनी बाबाजींचं नीट निरीक्षण केलं आणि त्यांना प्रगत क्रिया शिकवल्या. आजपर्यंत बाबाजी जे काही शिकले ते त्यांनी आता प्रत्यक्ष अनुभवलं. त्यांच्या चैतन्याच्या सीमा विस्तारित झाल्या. 'मी' (अहम्) नाहीसा होऊन तिथे 'तू' (त्वम्) ची स्थापना झाली. त्यांचे समाधीचे अनुभव वाढत जाऊन त्यांना कुमारस्वामींचं (मुरुगन) दर्शन झालं. बाबाजींना समजलं की त्यांचं आणि कुमारस्वामींचं चैतन्य एकरूप झालंय. (मुरुगन, कुमारस्वामी आणि कार्तिकेय हे समानार्थी शब्द आहेत.)

बोगनथर यांनी बाबाजींना पोथिगई टेकडीवरील कुट्रॅलम येथील अगस्ती मुनींकडून 'क्रिया कुंडलिनी प्राणायाम' शिकायला सांगितलं. (पोथिगई सध्या तामिळनाडूतील तिन्नवेल जिल्ह्यात आहे.)

बाबाजींनी प्रदीर्घ प्रवास पायी केला आणि ते तामिळनाडू येथील शक्तिपीठात आले. अगस्ती मुनी त्यांना प्रत्यक्ष दीक्षा देईपर्यंत आणि योगरहस्य समजावून सांगेपर्यंत तिथेच रहायचं अशी त्यांनी प्रतिज्ञा केली. बाबाजी एका विशिष्ट आसनात ध्यानस्थ बसले. त्यांनी डोळे मिटून घेतले. शरीरानं व मनानं त्यांनी अगस्तींची करुणा भाकली. ऊन, पाऊस, वारा, थंडी, कीडे, मुंग्या यांच्या त्रासाची तमा न करता त्यांनी आपलं तप चालू ठेवलं. मधून-मधून जेव्हा त्यांना आपल्या विद्वत्तेची आठवण यायची तेव्हा ते विद्वत्तेची तुलना धुळीशी करायचे. बाबाजींना कधीही मृत्यूचं भय वाटलं नाही. कधी कधी नैराश्याचे ढग येत असत. शरीर अगदी सुकून गेल्यामुळे निस्तेज झालं होतं. शरीर हे आपलं नव्हे अशी बाबाजींची भावना झाली. त्यांनी आपलं सर्व जीवन परमेश्वरास अर्पण केलं आणि प्रार्थना केली की एकतर मला अगस्ती मुनींचं दर्शन तरी दे, नाहीतर माझं जीवन तरी संपव.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

४८व्या दिवशी बाबाजी अगदी कोसळण्याच्या अवस्थेत होते. तरीही मुखानं अगस्तींचं नाम घेणं चालूच होतं. एकाएकी अगस्ती तिथे अवतरले. बाबाजींच्या प्रेमामुळे त्यांचं हृदय द्रवलं. अगस्तींनी 'नागराज' अशी हळू हाक मारली आणि आलिंगन दिलं. 'क्रिया कुंडलिनी प्राणायामाची' दीक्षा त्यांना दिली आणि रहस्य समजावून सांगितलं. कुंडलिनी योगाची साधना अत्यंत कठिण नियमांनी करावी लागते. नंतर अगस्तींनी बाबाजींना बदरीनाथला जायला सांगितलं. तिथे त्यांनी कुंडलिनी योगाची १८ महिने साधना केली आणि शेवटी 'सौरभ समाधी' घेतली. त्यावेळी त्यांचं वय फक्त १६ वर्षांचं होतं.

सौरभ समाधी :

सौरभ समाधी म्हणजे दैवी अनुभवाचा सुवर्णक्षण. या अवस्थेत ईश्वर प्रत्यक्ष अवतरित होऊन साधकाचे आध्यात्मिक, बौध्दिक, मानसिक, सूक्ष्म व तसंच स्थूल देह उन्नत करतो. या अवस्थेत साधकाचा देह अविनाशी होतो व तो पूर्णावस्थेचा उपभोग घेतो.

१८ महिन्यांच्या कडक योगसाधनेनंतर बाबाजींनी ही समाधी घेतली. त्यामुळे त्यांचं शरीर अक्षय झालं आणि ते दिव्य सुवर्णतेजानं झळकू लागलं. आजही बाबाजी त्यांच्या या दिव्य स्वरूपात साधकांना दर्शन देतात. अनेक शतकं याचाच अनुभव अनेकांना येत आहे. माझ्यावरही त्यांची परमकृपाच आहे. पावलागणिक त्याचा अनुभव देत ते मला घडवत आहेत.

अशा महान योगावतारी बाबाजींचा कृपाप्रसाद आपणा सर्वांना मिळावा अशी त्यांच्या पदकमली प्रार्थना करून आपण पुढे जाऊ या.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

९. ।। आपले बाबाजी ।।

कोठल्याही देशात वा प्रदेशात बाबाजी प्रगटपणे कधी राहिलेलेच नाहीत. त्यामुळे त्यांची माहिती ही फारच त्रोटक आहे. तसं पाहिलं तर ते जास्त कोणाला माहीतही नाहीत. त्याचं मूळ नाव 'नागराज' आहे. काही हाताच्या बोटावर मोजण्या एवढ्या लोकांनाच ते त्यांच्या इच्छेने भेटले अशी माहिती आहे. 'अमर गुरुदेव', 'शिवबाबा', 'कंदाहारी', 'बाबाजी' अशी नावंही त्यांचीच आहेत.

आपले बाबाजी हे चिरतरुण आहेत. योगसाधनेद्वारा 'सौरभ समाधी' तंत्राचा अवलंब करून त्यांनी आपला देह तरुण ठेवलेला आहे. ते ज्यांना भेटले ते वेगवेगळ्या रूपांत. त्यामुळे एवढंच समजतं की ते आपल्या इच्छेने जरूर तेव्हा प्रकट होतात आणि दर्शन देऊन मार्गदर्शन करतात.

अतिशय तेज:पुंज व भरपूर उंची असलेले बाबाजी गौरवर्णी आहेत. त्यांचे केस लालसर तांबूस लांब आहेत. कधी दाढीमिशा असतात तर कधी नसतात. कधी कमरेला एकच वस्त्र तर कधी संन्याशाच्या वेशात दंड-कमंडलू घेऊन खडावा घातलेले दिसतात. ते प्रेमळ नजरेनं पहातात आणि चेहऱ्यावर प्रसन्न स्मितहास्यही असतं. कधी तर संपूर्ण शांतिदूत असावेत अशा नाना रूपांत त्यांचं वर्णन आहे.

२०३ साली जन्माला आलेले बाबाजी आज जवळजवळ १८०० वर्षांपेक्षा जास्त वर्षांचे आहेत. हेच 'महायोगावतारी बाबाजी'. यांनीच आद्य शंकराचार्यांना क्रियायोगाची दीक्षा दिली. ('आद्य शंकराचार्य '- लेखक: श्री. ज.स.करंदीकर) त्यांना संन्यास दीक्षा गुरू गोविंद यती यांनी दिली आणि वाराणसीमध्ये बाबाजींनी त्यांना क्रियायोगाची दीक्षा दिली. ही घटना स्वत: बाबाजींनीच लाहिरी महाशयांना सांगितली.

'Autobiography of a Yogi' (योगी-कथामृत) - महर्षी योगानंदांनी लिहिलेल्या या पुस्तकात बाबाजींची माहिती वाचायला मिळेल. या योगानंदांनी अनेक सूचना देऊन एका चित्रकाराकडून बाबाजींचं चित्र काढून घेतलं. त्यांचं तेच रूप आज सर्वांना माहीत आहे. बाबाजींचा तोच फोटो परिचित आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

'Babaji' लेखक मार्शल गोविंदन यांनी लिहिलेल्या या पुस्तकातही बाबाजींची व अठरा अन्य सिध्द योग्यांची माहिती जिज्ञासूंना वाचायला मिळेल.

बद्रिनाथजवळ अवघड पहाडी प्रदेशात या बाबाजींचा आश्रम आहे. 'शिव-अगस्त्य-बोगनथर व बाबाजी' ही बाबाजींची गुरुपरंपरा आहे. पुढे त्यांचे शिष्य प.पू.योगिराज शामाचरण लाहिरी, त्यांचे शिष्य स्वामी युक्तेश्वरगिरी, पुढे त्यांचे शिष्य प.पू. महर्षी योगानंदांनी बाबाजी प्रणीत क्रियायोगाचा पौर्वात्य व पाश्चिमात्य देशात प्रसार केला. जिज्ञासू साधकांना दीक्षा देऊन मार्गदर्शन केलं. 'योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया' आणि 'सेल्फ रियलायझेशन फेलोशिप' या दोन संस्था स्थापन केल्या. बाबाजींचं व योगानंदांचं अध्यात्मिक व मानवतावादी कार्य आजही चालूच आहे.

१०. ।। अमर गुरुदेव बाबाजी ।।

एकदा योगिराज लाहिरी महाशयांनी राम गोपाल या आपल्या शिष्यास ताबडतोब घाटावर जाण्याची आज्ञा केली. तो घाटावर पोहोचतो न पोहोचतो तोच एका भुयारातून अलगदपणे माताजी म्हणजे बाबाजींची बहीण बाहेर येऊन म्हणाली, 'आता इथे बाबाजी व लाहिरी महाशय येतील'. तोच हवेतून लखलखीत प्रकाशझोत जवळ आला. त्यातून लाहिरी महाशय प्रगट झाले. लगेचच दुसरा अग्नीसारख्या प्रकाशाचा प्रखर झोत आला आणि त्यातून बाबाजी दृश्य स्वरूपात अवतरले.

यावेळी आपलं जीवनकार्य संपवून बाबाजींची देह सोडण्याची वेळ आली होती. म्हणूनच त्यांच्या बहिणीने बाबाजींना प्रेमळ विनंती केली, 'जर तुम्हाला काही फरक पडत नसेल, तर या देहाचा तुम्ही त्याग करू नका,' असं म्हणून बाबाजींना माताजींनी वंदन केलं.

'तुझ्या मुखातून परमेश्वरानेच आपली इच्छा प्रगट केली आहे. तसंच होईल', असं म्हणून बाबाजींनी त्यांना आशीर्वाद दिला.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अचंबित करणारी ही अघटित घटना प्रत्यक्ष पाहून राम गोपाळ गडबडून गेला, घाबरला. तेव्हा अतिशय मधुर आवाजात बाबाजी म्हणाले, 'राम गोपाळा, घाबरू नकोस. हे अमर वचन मी देत असल्याचा तू साक्षीदार आहेस.' असं म्हणून हात उंचावून त्यालाही त्यांनी आशीर्वाद दिला.

त्यानंतर बाबाजी व लाहिरी महाशय यांचे देह प्रकाशमान होऊन हवेत विरघळून गेले. माताजी तरंगत आपल्या गुहेत निघून गेल्या. दशाश्वमेध घाटाजवळ एका गुप्त भुयारी गुहेत त्यांचं वास्तव्य असतं.

आपल्या बहिणीच्या विनंतीवरूनच बाबाजींनी देहत्याग केला नाही. आज ते १८०० पेक्षा जास्त वर्षांचे आहेत. जरूर तेव्हा प्रगट होऊन, जगाच्या अंतापर्यंत ते कार्य करत रहाणार आहेत. जीवांच्या कल्याणासाठी, जन उध्दारासाठी त्यांनी बहिणीचा शब्द मानला. आजही त्यांचं ते कार्य अव्याहतपणे चालू आहे.

मला याचीच प्रचीती आली ना !

११. ।। योगिराज शामाचरण लाहिरी महाशय ।।

पूर्वीचं माहीत नाही पण २७ नोव्हेंबर १८६८ या दिवशी बाबाजींना लाहिरी महाशयांनी प्रत्यक्ष पाहिलं. पूर्वजन्मातही बाबाजीच त्यांचे गुरू होते.

हिमालयाच्या कुशीत ५९८० फूट उंचीवर राणीखेत गावी श्री शामाचरण लाहिरी यांची हेड क्लार्क म्हणून बदली झाली. एक दिवस आपल्या सशस्त्र शिपायांबरोबर निर्जन पहाडी प्रदेशात फिरत असताना त्यांच्या नावानं त्यांना कुणीतरी हाक मारलेली त्यांनी ऐकली. म्हणून त्यांनी त्या दिशेला पाहिलं. गुडघ्यापर्यंत लांब हात असलेला, सुडौल, पुष्ट शरीराचा, भरपूर उंचीचा, हसऱ्या चेहऱ्याचा, त्यांच्याकडे प्रेमळ नजरेनं पाहणारा एक संन्यासी त्यांना दिसला.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

'हेच आपले बाबाजी.' ते म्हणाले, 'घाबरू नकोस. शामाचरण, मीच तुला बोलावून घेतलं आहे. तुझीच वाट बघत मी इथे उभा आहे. त्या वरच्या पर्णकुटीत ये,' असं सांगून ते निघून गेले. दुसऱ्या दिवशी जावं का न जावं अशा द्विधा मन:स्थितीतच ते बाहेर पडून खूप दूरवर चालत गेले.

'मला ओळखलं नाहीस का?' बाबाजींनी अत्यंत मृदू शब्दात विचारलं असता लाहिरी महाशय म्हणाले, ' नाही, या भागात मी पूर्वी कधीही आलेलो नाही.' तेव्हा जवळच्या गुहेत त्यांनी शामाचरणला नेलं व एक आसन व कमंडलू दाखवून त्याला म्हणाले, ' अरे ! हे सर्व तुझं आहे.' तरीही लाहिरींना काहीच आठवेना.

'शामाचरण, हा सर्व महामायेचा खेळ आहे', असं म्हणून बाबाजींनी शामाचरणच्या कपाळाला हस्तस्पर्श केला. त्या स्पर्शाबरोबर संपूर्ण शरीरातून संवेदना पसरल्या आणि शामाचरणला सर्व स्पष्ट दिसलं आणि स्मरलंही. अरे, हे तर आपले गुरुदेव ! ह्यांच्याबरोबर पूर्वजन्मात आपण खूप साधना केली आहे ! आपलं व्याघ्राजिन त्यांनी बरोबर ओळखलं.

अत्यंत प्रेमानं बाबाजींनी हाक मारली 'गंगाधर'. हे लाहिरींचं पूर्व जन्मातलं नाव. वात्सल्यानं भरलेली हाक ऐकून त्यांचं संपूर्ण शरीर पुलकित झालं. आनंदानं कंठ दाटून आला. 'लहानपणापासून तुला बघतोय मी. तुझ्याकडे माझं बारीक लक्ष आहे. चाळीस वर्षं झाली मी वाट बघतोय."

'या जन्मातील तुझी तयारी होऊन आता सू संदेहरहित झाला आहेस', गुरुदेवांनी असं म्हणताच शामाचरणांनी त्यांच्या चरणांवर स्वत:ला झोकून दिलं.

बाबाजींनी एका मंगल क्षणी शामाचरणला योग दीक्षा प्रदान केली. त्याबरोबर शामाचरण एकदम समाधिस्थ झाले. त्यांनी प्रशांतीचा अनुभव घेतला. आपल्याबरोबर सारी सृष्टीही ध्यानस्थ झाल्यासारखी त्यांना वाटली. ज्योतिरूपात त्यांना अनेक देवदेवतांची दर्शनं झाली. साऱ्या सृष्टीत व आपल्या अंगप्रत्यंगात एकच प्रकाश प्रकाशित होताना त्यांना दिसला. असा किती वेळ गेला कोणास ठाऊक ? 'जय शिव शंभो, हर हर महादेव'. बाबाजींच्या अन्य शिष्यांनी जयजयकार केला आणि त्यांची समाधी उतरली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आपलं ऑफिसचं काम भरभर संपवून ते रोजच येऊन ध्यानधारणा करू लागले. पूर्वजन्मातील संचित योग जुळून आल्यामुळे थोड्याच दिवसात त्यांनी सृष्टीचे गूढार्थ जाणले. स्वानंदात ते मग्न झाले. आपल्या गुरूदेवांविषयी अथांग, सप्रेम जिव्हाळा उत्पन्न होऊन त्यांच्या अंतरात प्रेमाचा झरा वाहू लागला.

थोड्याच दिवसात उच्च अवस्थेला पोहोचलेल्या आपल्या प्रिय शामाचरणला जवळ घेऊन बाबाजी म्हणाले, 'काही दिवसातच आम्ही हे स्थान सोडून जाऊ. कारण आता इथे वस्ती वाढेल. केवळ माझ्याच इच्छेने, प्रेरणेने मी तुला इथं बोलावलं होतं. आता तू परत घरी जा ' हे ऐकून व्यथित झालेल्या शामाचरणला बाबाजी म्हणाले, 'शामाचरण असं नाही रे ! तू गृहस्थाश्रमी आहेस. आपला संसार करत कठोर साधनेनं तुला उज्वल आदर्श स्थापन करायचा आहे.

खूप लोक तुझी वाट बघत आहेत. कित्येक सद्‌गृहस्थांना तुला मुक्तिमार्ग दाखवायचा आहे. संसारी माणसांना अनेक अडीअडचणी असतात. त्यांच्या जवळ जास्त वेळही नसतो. 'सहज, साधा, सरळ असा मार्ग जो थोड्या वेळात फलद्रूप होईल' असा योग त्यांना शिकवण्यासाठीच तुझा जन्म झाला आहे. संसार सोडलेल्या, विरक्त झालेल्या किंवा केवळ संन्याशांकरताच ही दीक्षा यापुढे मर्यादित राहणार नाही.'

क्रियायोगाचे काही नियम शिथिल करून शामाचरणला अतिशय मधुर शब्दात बाबाजी म्हणाले,

'जरा सुध्दा काळजी करू नकोस. आता तू घरी जा. अधून मधून मी तुला भेटत जाईन.' आपल्या आश्वासक शब्दांनी ते समजावून सांगत होते. त्यानंतर बाजूला हात दाखवून ते म्हणाले, ' तुझ्यासाठी कित्येक दिवस ही माणसं तिष्ठत बसली आहेत. त्यांना आज तू दीक्षा प्रदान कर.' 'गुरुदेव, आपण असताना हे माझ्याकडून दीक्षा कशाला घेतील ?' त्यावर हसत बाबाजी म्हणाले, 'ह्या लोकांचा माझ्याशी काहीही संबंध नाही. त्यांच्याशी तुझाच संबंध आहे. हे तुलाच करावं लागेल.' यानंतर गुरुदेवांनी दीक्षा कशी द्यायची हे समजावून दिलं आणि शामाचरणकडून त्यांना दीक्षा प्रदान केली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

योगिराज लाहिरी महाशयांना स्वत:ला रोज डायरी लिहायची सवय होती. वरील सर्व माहिती त्यांच्या डायरीत मिळाली आहे. त्यांच्या सव्वीस डायऱ्या व त्यांनी लिहिलेली पत्रं संकलित करून त्यांच्या नातवानं श्री सत्यचरण लाहिरींनी पुस्तकरूपानं प्रकाशित केली. तीनशे पानं असलेलं हे पुस्तक मूळ बंगाली भाषेत आहे. त्याचे अनुवादही झाले आहेत. 'पुराणपुरुष योगिराज शामाचरण लाहिरी' असं यथार्थ नाव त्या पुस्तकाचं आहे.

स्वामी भास्करानंद सरस्वती, बालानंद ब्रह्मचारी, नारायणसिंह बहादूर, मोहन ठाकूर, स्वामी युक्तेश्वर गिरी, भट्टाचार्य महाशय यांना आणि लाखो संसारी स्त्री-पुरुषांना लाहिरी महाशयांनी क्रियायोगाची दीक्षा देऊन पावन केलं आहे.

केवलानंद, राम गोपाळ, युक्तेश्वर गिरी, ह्या लाहिरी महाशयांच्या प्रिय शिष्यांना बाबाजींना प्रत्यक्ष भेटण्याचे योग आल्याचे उल्लेख आहेत. ते सांगत की, बाबाजी व लाहिरी महाशय यांच्या दिसण्यात खूपच साम्य आहे. बाबाजी तरुण व लाहिरी वृध्द एवढाच फरक.

२७ नोव्हेंबर १८६८ रोजी राणीखेतला बदली होऊन आलेल्या शामाचरण लाहिरींची १५ जानेवारी १८६९ साली उत्तरप्रदेशात निजोपूर येथे बदली झाली. म्हणजे जवळ जवळ दीड महिना बाबाजींचा पवित्र पावन करणारा महत्त्वपूर्ण सहवास लाहिरींना लाभला आणि त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल होऊन त्यांच्या जीवनाचं सार्थक झालं.

बाबाजी प्रणीत क्रियायोग दृश्य स्वरूपात आपल्यापुढे आला तो याच योगिराज शामाचारण लाहिरी महाशय यांच्यामार्फत.

या पुराणपुरुष योगिराजापुढे नतमस्तक होऊन त्यांना कृतज्ञतेचं अभिवादन करून आपण पुढे जाऊ या.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१२. ।। ज्ञानावतार स्वामी श्री युक्तेश्वर गिरी ।।

योगिराज शामाचरण लाहिरी महाशयांचे लाडके शिष्य श्री. युक्तेश्वर गिरी हे कुशाग्र बुध्दीचे, संशोधक वृत्तीचे, अत्यंत ज्ञानी होते. त्यांच्याकडे 'ज्ञानावतार' म्हणूनच पाहिलं जातं.

जानेवारी महिन्यात १८९४ साली अलाहाबादला कुंभमेळा भरला होता. पू. लाहिरी महाशयांच्या आज्ञेनुसार श्री युक्तेश्वर गिरी कुंभमेळ्यास गेले खरे, पण तिथले साधू त्यांना भिकाऱ्यासारखे वाटले. धर्माच्या नावावर भीक मागणारे रिकामटेकडे वाटले. हे काहीच न आवडल्यामुळे ते जरा नाखुषच होते.

त्याचवेळी युक्तेश्वरजींना एका संन्याशानं बोलावलं म्हणून ते नाराजीनंच त्यांच्याजवळ गेले.

'स्वामीजी' अशी संन्याशानं प्रेमळ हाक मारून त्यांना आलिंगन दिलं. 'मी स्वामी नाही' प्रामाणिकपणे युक्तेश्वरांनी सांगितलं. 'तर मग ईश्वरी संकेतानुसार आताच तुला 'स्वामी' ही पदवी अत्यंत प्रहर्षतेनं मी बहाल करत आहे.' संन्यासी (बाबाजी) म्हणाले.

कुंभमेळ्याबद्दल बाबाजींनी विचारलं असता, आपली खूप निराशा झाल्याचं त्यांनी सांगून टाकलं. पण बाबाजी भेटल्यावर त्यांचा आध्यात्मिक प्रभाव त्यांना आकृष्ट करत होता. एक वेगळी जाणीव अंतरात जागृत होत होती.

दिसायला बाबाजींच्या दुप्पट वयाच्या युक्तेश्वरजींना अत्यंत प्रेमानं बाबाजी म्हणाले, 'बेटा, अशी गल्लत करू नकोस. या पृथ्वीवर चांगल्या-वाईटाची भेसळ झाली आहे. साखर आणि वाळू, तांदूळ आणि खडे यांना एका मोले मोजू नकोस. वाळू अथवा खड्यांना जरा सुध्दा धक्का न लावता सुज्ञपणानं साखर व तांदूळ उचलून घे.' अनेक साधू भरकटलेले असले तरी काही साक्षात्कारी महात्मे असतात की ज्यामुळे कुंभमेळ्यास फार महत्त्व प्राप्त होऊन त्याचं पावित्र्य टिकून रहातं.' बाबाजींची भेट झाल्यामुळे हे सारंच श्री युक्तेश्वरजींना पटलं होतं.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हे 'स्वामी' गीतेवर उत्कृष्ट भाष्य करत असत. त्याचं कौतुक करून बाबाजी त्यांना म्हणाले, 'पाश्चिमात्य जगापासून भौतिक विकासाचं तंत्रज्ञान भारताला मिळवायचं आहे. भारताकडून त्यांना योगविद्या व धर्मशास्त्राचा पाया समजावून घेऊन अध्यात्मिक विद्या शिकायची आहे.

यापुढे पूर्व आणि पश्चिम यांमध्ये सुसंगत विचारानं एकवाक्यता निर्माण होईल.त्यात तुम्हाला भाग घ्यायचा आहे. थोड्या वर्षात एक शिष्य तुमच्याकडे पाठवीन. पाश्चिमात्य देशात योगशिक्षण व क्रियायोगाची दीक्षा देण्यास त्याला तयार करण्याचं काम तुमचं आहे. तिथल्या अनेक जिज्ञासू मुमुक्षू साधकांची हाक माझ्यापर्यंत पोहचत आहे. पुढील काही वर्षांत अमेरिका व युरोपमध्ये अनेक योगी पुरुष तयार होतील.' असं सांगून बाबाजी पुढे म्हणाले,

'ख्रिस्ती धर्म व हिंदू धर्म या दोन्हींत काय साम्य आहे ? कुठली एकवाक्यता आहे ? याविषयी तुम्हाला पुस्तक लिहायचंय. ते पुरं झाल्यावर मी तुम्हाला भेटेन.' 'माझ्या हातून हे कसं होईल ?' जरा भीतभीतच स्वामाजींनी विचारलं असता बाबाजी म्हणाले, 'खरं सांग हे कार्य कोणाचं, करणारा कोण ? परमशक्तीनं माझ्या मुखातून काढलं ना, मग ते होणारच,' असं म्हणून आपला वरदहस्त उंचावून त्यांनी आशीर्वादही दिला.

बाबाजींच्या आशीर्वादानं स्फूर्ती मिळालेल्या स्वामाजींनी धर्मग्रंथाच्या लेखनास सुरवात केली. बायबल व सनातन हिंदू धर्माचा तुलनात्मक अभ्यास त्यांनी सुरू केला. प्रभू येशू ख्रिस्ताची शिकवण, त्याचे बोल, त्याचे अर्थ आणि वेदात काय सांगितलं आहे ? हिंदू धर्माचं मूळ तत्त्व व ते एकच आहे ह्या सर्वांचं स्पष्टीकरण करत अमरगुरुदेव बाबाजींच्या कृपाप्रसादानंच श्री युक्तेश्वरांनी **'दि होली सायन्स' (पवित्र धर्मशास्त्र) हे पुस्तक लिहून काढलं**. योगदा सत्संग सोसायटी, रांची या संस्थेनं पुढे ते प्रकाशित केलं.

दुसऱ्याच दिवशी गंगास्नान करून घाटावरून परतत असता, आतून इच्छा झाल्यानं श्री युक्तेश्वरांनी मागं वळून पाहिलं तर आपल्या काही शिष्यांबरोबर बाबाजी वृक्षाच्या छायेत बसलेले त्यांना दिसले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

'नमस्कार स्वामीजीऽ' बाबाजींच्या मृदू प्रेमळ हाकेनी स्वामाजींना खूप आनंद झाला. 'बाबाजींची भेट ? आपण स्वप्नात तर नाही ना ?' असं मनात येताच, 'पुस्तक पुरं झालं ना ? शब्द दिल्याप्रमाणे ताबडतोब तुमचे आभार मानायला आलो आहे.' हसत हसत बाबाजी म्हणाले.

स्वामीजींच्या अंतरात खूपच खळबळ झाली. बाबाजींच्या चरणी त्यांनी लोटांगण घातलं आणि विनंती केली, 'जवळच माझं घर आहे. आपण सर्वजण माझ्या घरी येऊन मला पावन करावं.' हळूच हसत बाबाजी 'नाही' म्हणाले.

'मग जरा थांबा. मी आपल्यासाठी मिठाई घेऊन येतो,' असं म्हणून, धावत घरी जाऊन, मिठाई घेऊन घाईघाईनेच स्वामीजी घाटावर परत आले. पण वृक्षाखाली कोणी नव्हतं. सगळीकडे शोधाशोध करून काही थांगपत्ता लागला नाही.

'बाबाजी किती कठोरपणे मला टाकून गेले' या व्यथेनं स्वामीजी व्याकूळ झाले. पण त्याहून जास्त नाराज झाले.

थोड्या दिवसांनी श्री युक्तेश्वरजी लाहिरी महाशयांना भेटायला गेले असता ते म्हणाले, 'युक्तेश्वर, ये. आता दारात तुला कोणी दिसलं का ?' 'नाही' म्हणून सांगताच योगिराजांनी युक्तेश्वरांच्या कपाळाला हळुवार स्पर्श केला. त्याबरोबर दारात उभे असलेले बाबाजी त्यांना दिसले.

'रागावलास ?' टक लावून पहात बाबाजींनी विचारलं. 'मी आलो, तुला भेटलो. पण तुझ्या अस्वस्थ मन:स्थितीमुळे आम्ही तिथेच असूनही इथरमध्ये नाहीसे झालो. बेटा, ध्यान करत जा. म्हणजे अंतर्दृष्टी साफ होऊन सूर्यप्रकाशापलीकडचा मी तुला दिसेन.' नाजूक घंटेची किणकिण व्हावी तशा अतिशय मंजुळ स्वरात बाबाजी बोलले आणि प्रकाशातच नाहीसे झाले.

बाबाजी भेटण्यापूर्वीच युक्तेश्वरजींना योगिराज लाहिरी महाशयांकडून दीक्षा मिळाली होती. पुढे काही वर्षांनंतर गयेच्या महंतांकडून त्यांना संन्यास दीक्षा मिळाली.

ज्योतिष व गणित या विषयांत स्वामींचा हातखंडा होता. इंग्रजी, फ्रेंच, बंगाली, हिंदीसह संस्कृत भाषाही त्यांना अवगत होती. चोख व्यवहार व शिस्त त्यांच्या अंगात

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भिनली होती. वैज्ञानिक संशोधनाबरोबर हिंदू धर्माचं सखोल ज्ञान त्यांना होतं. ख्रिस्ती धर्माबद्दल आस्थाही खूप होती.

सर्व जीवांविषयी त्यांच्या अंतरात आपुलकी, प्रेम व जिव्हाळा होता. त्या श्री युक्तेश्वर गिरी स्वामाजींच्या चरणी कृतज्ञभावफुलं वाहून, त्यांना सादर वंदन करून, आपण पुढे जाऊ या.

१३. ।। प्रेमावतार परमहंस योगानंद ।।

अनेक श्रेष्ठ संत महात्म्यांनी भारत भूमीत जन्म घेतला आहे. असे हे संत म्हणजे भारतात जन्माला आलेली अनमोल रत्नंच. **परमहंस योगानंद हे भारताचं वैभव आहे.**

जन्माला येऊन योगानंदांनी आपल्या जन्माचं तर सार्थक केलंच, पण बाबाजी प्रणीत क्रियायोगाची दीक्षा हजारो-लाखोंना दिली. पूर्व आणि पश्चिम देशांत **योगविद्येचा प्रसार करण्यासाठीच त्यांचा जन्म होता.** ती तर बाबाजींची इच्छा होती. बाबाजींनी तसं स्वामाजींना स्पष्टपणे सांगून ठेवलं होतं, 'एका शिष्याला मी तुझ्याकडे पाठवीन. त्यादृष्टीनं त्याला घडवावं.'

लहानपणापासूनच मुकुंदाला त्याच्या गुरूंच्या सहवासाचा लाभ झाला होता. श्री युक्तेश्वर स्वामींनी १९१५ साली त्यांना दीक्षा देऊन त्यांचं नाव 'योगानंद' ठेवलं. पुढे १९३५ साली संन्यास धर्मातील त्याही वरची दीक्षा मिळून त्यांना 'परमहंस' ही पदवी प्राप्त झाली.

योगानंदांच्या भावी कार्यानुसार शिस्त, चिकाटी, पराकाष्ठेची सहनशीलता, तसंच दुसऱ्याला समजून घेणं असे अनेक सद्गुण त्यांच्या अंगी बाणवण्यासाठी श्री युक्तेश्वरजींनी त्यांना योग्य अशी शिकवणही दिली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

'परमेश्वराचा साक्षात्कार मिळवण्याचा निश्चित व शास्त्रशुध्द तंत्राच्या ज्ञानाचा प्रसार करण्याचं कार्य तुझं आहे.' हे योगानंदांना समजावून सांगून श्री युक्तेश्वरजी म्हणाले, 'परमेश्वर म्हणजे मध, संस्था म्हणजे मधाची पोळी. अध्यात्मिक अमृतानं पुरेपूर भरलेली मधाची पोळी ठिकठिकाणी तू उभी कर.'

संपूर्ण भिन्न जीवनपध्दती असलेल्या देशात आपलं कसं होईल याची थोडी काळजी व थोडी हुरहूर योगानंदांना वाटत होती.

अमेरिकेला जाण्यापूर्वी परमेश्वराच्या आशीर्वादासाठी योगानंद प्रार्थनेला बसले. खूप वेळ झाला तरी त्याचा काहीच उपयोग होईना. त्यामुळे त्यांना खूप रडू आलं. ते व्याकुळ झाले. त्यांना वाटलं आता सर्व संपलं. आणि अत्यंत मंजुळ स्वरात बाबाजी योगानंदांना म्हणाले, ' स्वर्गस्थ पित्यानी तुझी प्रार्थना ऐकली म्हणून मी आलो आहे. तुझ्या गुरूंच्या सांगण्याप्रमाणे तू अमेरिकेस जा. भिऊ नकोस. तुझी सर्व काळजी घेतली जाईल.'

एवढं सांगून अतिशय प्रेमानं बाबाजी पुढे म्हणाले, 'पाश्चिमात्य जगाला क्रियायोगाचा संदेश देण्यास व त्या साधनेचा तिकडे प्रसार करण्यास तुझी निवड केली आहे. एकदा कुंभमेळ्यात स्वामीजी भेटले होते. त्याचवेळी तुला त्यांच्याकडे शिक्षणाकरता पाठवीन असं मी त्यांना सांगितलं होतं.'

बाबाजींचं आपल्यावरील प्रेम पाहून, त्यांच्या मुखातील मधुर शब्द ऐकून, आदरयुक्त भक्तिभावानं, सद्गदित अंत:करणानं योगानंदांनी अमर गुरुदेवांपुढे साष्टांग लोटांगण घातलं.

अतिशय प्रेमानं जवळ घेऊन बाबाजी त्यांना म्हणाले, 'ईश्वरी साक्षात्कार करवून घेण्याची ही क्रियायोगाची शास्त्रीय तांत्रिक साधना सर्व देशांना माहीत होईल. त्यायोगे मनुष्यास परमपित्याचं प्रत्यक्ष वरच्या स्तरावर जाऊन दर्शन घडून येईल. तसं झाल्यावर देशादेशात प्रेमाचे संबंध प्रस्थापित होतील.'

त्याबरोबर आणखीही काही गोष्टी सांगून त्यांनी योगानंदांना आश्वासक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आत्मिक समाधान दिलं. पुढे -

पुढे पाश्चिमात्य देशात योगानंदांनी पुष्कळच कार्य केलं. तसंच लेखनही केलं. `Autobiography of a Yogi' ('योगी-कथामृत') हे पुस्तक योगानंदांनी लिहिलं. ते स्वत: महान योगी होते. त्यामुळे त्यांनी लिहिलेल्या पुस्तकाचं महत्त्वही खूपच आहे. त्या पुस्तकातील फक्त एकच वाक्य प.पू. लाहिरी महाशयांनी सांगितलं होतं. **'जेव्हा जेव्हा कोणी बाबाजींचं नाव पूज्य बुध्दीनं घेत असतो, तेव्हा तेव्हा त्या भक्तावर ताबडतोब अनुग्रह होतो.'**

३ मे १९८० साली ह्या पुस्तकातील या एकाच वाक्यानं माझ्यात अंतर्बाह्य बदल होऊन मी बाबाजींच्या कृपेस पात्र ठरले. एवढं सामर्थ्य त्या पुस्तकातील एका वाक्यात आहे. तोपर्यंत मी ह्या एका वाक्याशिवाय त्या पुस्तकातलं काहीही वाचलंच नव्हतं.

आपण हे पुस्तक वाचल्याशिवाय योगानंदांचा पुरेपूर परिचय होणार नाही आणि त्यांच्या कार्याची कल्पनाही येणार नाही. मला मार्गदर्शक ठरलेला सातशे पानांचा हा ग्रंथ वाचकांनी अवश्य वाचावा. त्यात खूपच विस्तृतपणे सर्व माहिती वाचायला मिळेल. या पुस्तकानं व अत्यंत शरण भावनेनं मी थेट बाबाजींशी जोडली गेले आहे. त्याबद्दल मी परमहंस योगानंदांची अत्यंत ऋणी आहे.

संपूर्ण जगात कार्य करण्यासाठी ज्यांची निवड बाबाजींनी केली त्या परमहंस योगानंद चरणी सहर्ष वंदन करून आपण पुढे जाऊ या.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१४. ।। शिवेंद्र कंदाहारी ।।

हृषीकेश येथे एका निर्जन जागी शिवेंद्र कंदाहारी भगवान शिवाची उपासना करत होते. एकदा संध्याकाळी आपल्याच तंद्रित फिरत असता ते लांबवर भरकटत गेले आणि रस्ता चुकले.

रात्रीची वेळ, भयाण जंगल अशा परिस्थितीत मार्ग सापडण्यासाठी भगवान शिवाचा अगदी आर्तपणे धावा करायला शिवेंद्रांनी सुरवात केली. जवळ जवळ अर्ध्या तासानंतर त्या शांत वातावरणात पावलं वाजली म्हणून त्यांनी पाहिलं तर भरपूर उंचीचे, पिळदार शरीराचे, डोळ्यात अपूर्व शांती असलेले, गौरवर्णी, दंड-कमंडलू घेतलेले, खडावा घातलेले, तेज:पुंज संन्यासी त्यांना दिसले.

कोणीतरी सिध्दपुरुष वाटल्यामुळे त्यांच्या चरणी शिवेंद्रांनी लोटांगण घातलं. 'काय ?' खुणेनंच त्यांनी विचारलं असता शिवेंद्र म्हणाले, 'महाराज रस्ता चुकलो आहे. तीन तास झाले शाधतोय. आपण मार्ग दाखवाल का ?' त्याबरोबर तो संन्यासी मोठमोठ्यानं हसू लागला. शिवेंद्र घाबरून गेले.

'बेटा, कोणता रस्ता चुकलास ? मला जीवनाचा एकच रस्ता माहीत आहे. त्यावरून मार्गक्रमण केलं असता मानवाची उन्नती होत जाईल. तोच रस्ता तुला पाहिजे का ?' संन्याशांनी विचारताच मान हलवून त्यांनी होकार दिला.

त्या संन्याशांनी शिवेंद्रला एका दगडावर आपल्या शेजारी जवळच बसवून घेतलं. त्यांच्याबरोबर त्यांनी चार तास मनमोकळी चर्चा केली. तेव्हा त्यांना वाटलं की आपलं अंत:करण व बुध्दी एकाच वेळी शांत झाली. सर्व विश्वाचा अर्थ समजला.

मित्र, शत्रू, सज्जन, दुर्जन कोण ? कर्तबगार कोणास म्हणावं, कसं ओळखावं ? हे समजावून सांगितल्यामुळे माणसातील सज्जनता व दुर्जनता मोजण्याची जणू मोजपट्टीच त्यांना मिळाली.

चार तासांच्या चर्चेनंतर जीवनात अमोल किंमतीचा खजिना प्राप्त करण्याचा दिव्यानंद शिवेंद्रांना त्या दिवशी झाला. अत्यंत प्रेमानं महाराज म्हणाले, 'बेटा, आज

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तुला मी जे सांगितलं ते कधीही विसरू नकोस. तुझ्याकडे येणाऱ्या प्रत्येक सज्जनास याप्रमाणे मानवतेचा मार्ग दाखवून त्यांच्या जीवनात शांती-श्रध्दा-सुख-भरभराट निर्माण करून त्याचं जीवन परिपूर्ण करावं. जितक्या अधिक लोकांपर्यंत हा संदेश जाईल तेवढं उत्तम हे लक्षात ठेव.'

याप्रमाणे कोणीही आचरण करू शकतो.देश, धर्म, जात, पात मानू नकोस. फक्त मानवता हाच एक धर्म मान.' एवढं सांगून ते म्हणाले, 'आता रस्ता चुकणार नाहीस ना ?' प्रेमळपणे पाठीवरून हात फिरवून बाबाजींनी जायला सांगितल्यावर शिवेंद्रांनी संन्याशांना नाव विचारलं असता ते म्हणाले, 'कंदाहारी'.

महाराजांना साधाच रस्ता विचारला असता त्यांनी साऱ्या समस्याच सोडवून टाकल्या. महाराजांचा सहवास, दर्शन, उपदेश यांनी शिवेंद्रजींच्या शरीराचा अणुरेणू दिव्यत्वानं बहरून गेला.

महाराजांनी सांगितलेले विचार अनेकांना समजावून सांगितल्यावर त्यांच्या जीवनात अद्‌भुत परिवर्तन झालं. म्हणून हे सर्व विचार त्यांनी एकत्रित करून 'विश्वगांधार' या ग्रंथाच्या रूपानं प्रगट केले. १५ सप्टेंबर १९८८ साली हे पुस्तक श्री. माधव हरिसंत, पुणे यांनी प्रकाशित केलं.

अजूनही प.पू. कंदाहारी महाराजांचे आदेश शिवेंद्रांना मिळतात. त्याच आदेशाप्रमाणे प.पू. कंदाहारी महाराज म्हणजेच 'बाबाजी' आहेत हे त्यांना समजून आलं.

याच बाबाजींच्या सत्संगातून प्राप्त झालेले 'अमरशब्द' अनेकांच्या अंत:करणात पोहोचवण्याचं कार्य श्री. शिवेंद्र कंदाहारी यांनी केलं आहे. त्यांच्या चरणी अभिवादन करून आपण पुढे जाता जाता साधनेच्या दृष्टीनं महत्त्वाच्या अशा काही अनुभूती व त्यांचे अर्थ आता मी सांगणार आहे. यातूनच बाबाजींची सांगण्या-शिकवण्याची पध्दत आपल्याला समजणार आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१५. ।। उत्पत्ति-स्थिति-लय ।।

एकदा काय झालं माहीत आहे ? अशीच मी बसले असता इंद्रधनुष्यासारखे रंग दिसायला लागले. अनेक सुंदर रंगांची जणू उधळण झाली होती. एकमेकात मिसळलेले ते रंग नयन मनोहर दिसत होते. सगळीकडे सुरेख रंगाच्या विविध छटा आणि मधोमध उभी मी. माझ्याभोवती चक्राकार फिरत फिरत ते निळसर होत माझ्यातच मिसळून गेले आणि माझ्यातून पिवळसर तेजाचे असंख्य किरण बाहेर पडताना मी स्पष्ट पहात होते, जणू काही मीच एक स्वयंप्रकाशी तेजस्वी गोळा असून साऱ्या सृष्टीला प्रकाशरूप ऊर्जा पाठवून त्या विश्वाचं मीच पोषण करत आहे असं मला वाटत होतं. मी माझ्या अनुभूतीशी एवढी काही एकरूप होऊन गेले की मला निराळं अस्तित्वच राहिलं नाही.

असा काही वेळ गेला असेल. नंतर मला कळमळू लागलं, गरगरू लागलं, उलटी होत आहे असं वाटून कसंतरी होत होतं. काय होत आहे हे समजेना. उठू लागले तर उठताही येईना. मग बसले होते तशीच मी आडवी झाले मात्र - एका प्रचंड लोंढ्याबरोबर मी भरकटत पुढे जात होते, गटांगळ्या खात भोवऱ्यात गरगरत होते. सगळीकडे पाणीच पाणी होतं. जीवसृष्टीचं नामोनिशाण दिसत नव्हतं. भयानक उसळणारं पाणी आणि काहीसं अस्तित्व जाणवणारी मी. प्रलयंकारी प्रलयात विरघळून जात माझं अस्तित्व नाहीसं होताना बघून मी खूप घाबरले. सर्व शक्ती पणाला लावून काहीतरी झटकू पहात होते. दूर जाऊ इच्छित होते तो तो मी त्यात खोल खोल बुडत असल्याचं जाणवून कशापासून तरी सुटका करण्याचा प्रयत्न करत असतानाच एकदम जाणीव होऊन मी जागृत झाले.

अवघ्या चार पाच मिनिटांचा तो अनुभव असेल. मी चटकन उठले. त्या प्रसंगातून बाहेर यायला मला वेळ लागला. बऱ्याच वेळानंतर मी स्वत:ला सावरलं. त्यानंतर दोन तीन दिवस ध्यानाला बसलेच नाही. एवढी त्या प्रलयाची धास्ती वाटत होती. पण ती माझी चूक होती.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आता सर्व ठीक आहे तर पुन्हा बसून बघू, असं म्हणून बाबाजींची प्रार्थना करून ध्यानाला बसले असता हसून म्हणतात कसं 'ब्रह्मा-विष्णु-महेश' 'उत्पत्ति-स्थिति-लय' त्यांच्या हास्यानं मी सुखावून गेले. अनुभूतीचा अर्थ कळून खूपच शांत झाले.

सर्वच प्राणिमात्रांच्या शरीरात 'सत्त्व-रज-तम' या त्रिगुणांचा अविरत खेळ चालू असतो. 'जीव' या तीन गुणांच्या अधीन असतो. ह्या तीन गुणांच्या तीन देवता आहेत. **उत्पत्ती** - रजोगुणाची देवता ब्रह्मा आहे. **स्थिती** - सत्त्वगुणाची देवता विष्णू आहे. **लय** - तमोगुणाची देवता शंकर आहे.

हे तीन गुण शरीरात संचार करत असतात. आपल्या देहामध्ये मणिपूर चक्राच्या म्हणजे नाभीच्या खालच्या बाजूला तमोगुण, नाभीपासून कंठापर्यंत रजोगुण व कंठापासून आज्ञाचक्रापर्यंत सत्त्वगुण वास करून असतात. त्यांच्यावर गुणातीत परब्रह्माचा वास असतो.

''ऊर्ध्वं गच्छान्ति सत्त्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसा: ।
जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसा: ।। गीता १४.१८

त्रिगुणातील ज्या गुणासमवेत देहात जीव रहातो, त्याच ठिकाणी त्या गुणावर मनही लुब्ध होतं. याप्रमाणे तमोगुणाकडून सत्त्वगुणाकडे आणि सत्त्वगुणाकडून तमोगुणाकडे जीवाची जा-ये चालूच असते. इथेच आपल्याला आपण सांभाळायचं असतं.

साधनेनं आणि भगवंताच्या नामानं आपल्याला या त्रिगुणांच्या पलीकडे जायचं आहे. याच गुणातीत अवस्थेत निर्गुण, निराकार परमात्म्याचा वास असतो. हे ठिकाण शरीरात सहस्रार चक्राच्या ठिकाणी असतं. योगविद्या, प्राणायाम व भगवंताचं नाम आपल्याला इथपर्यंत पोहोचवतं.

या स्थितीत स्थिर होऊन परमात्म्याशी वा परब्रह्माशी जोडलं जाणं हेच अत्यंत महत्त्वाचं आहे. आपल्याला हेच करायचं आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

याचप्रमाणे 'जे पिंडी ते ब्रह्मांडी' असंच आहे. अगदी याच तत्त्वावर हे विश्व उभारलेलं आहे.

सत्त्वगुण-आकाश, रजोगुण-पृथ्वी, तमोगुण-पाताल. याच त्रिगुण तत्त्वावर सृष्टी अहर्निश कार्यशील असते. संपूर्ण सृष्टीचे व सर्व प्राणिमात्रांचं जीवन हे पूर्णपणे गतिशील आहे. अहर्निश बदलणारं तत्त्व प्रत्येक अणुरेणूत कार्यरत असतं. नाहीसं होणारं आहे म्हणून नश्वर आहे. या नश्वरतेत वावरणारं किंवा अस्तित्वात असणारं 'चैतन्य' म्हणजेच 'परब्रह्म' या शक्तीचं, या चैतन्याचं 'असणं' हे अबाधित नित्य सत्य आहे. हे तत्त्व मुळात स्थिर आहे. याचा त्रिगुणाशी संयोग झाला की ते गतिशील होतं.

या त्रिगुणाबरोबर आपलं मन व विचार अखंड फिरत असतात. हे फिरणं थांबवायचं असतं. मनाला एका नामाशी जोडून नामामार्फत त्या परमात्म्यात मिसळता येतं. तसंच प्राणायामानं, योगविद्येनंही स्थिरता प्राप्त करून त्या निर्गुण निराकार महाशक्तीत मिसळता येतं आणि -

स्वानंदाचा अनुभव घेता येतो, मग हा आनंद परमानंदात मिसळून जातो. इथे पोहोचलेल्या जीवाला - आत्म्याला कोणतंही बंधन बध्द करतच नाही. हाच आनंद सगळीकडे भरभरून असतो.

'जगी भरला दित्यानंद । यथाशक्ती लुटू आनंद ।'

या नित्यानंदाला जाणून, ओळखून, अनुभवून ज्यानं त्यानं आपल्या कुवतीनुसार हा आनंद लुटायला हवा.

आपल्यातच आत-बाहेर असलेला 'आनंद' सोडून सुखदु:खाशी धावाधावी, पकडापकडी खेळायची नसते. तर त्याकडे आपण नुसतं पहायचं असतं आणि पुढे जायचं असतं, एवढंच लक्षात ठेवणं गरजेचं आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१६. ।। मायातीत हो ।।

माझ्याजवळ अत्यंत महत्त्वाचे काही कागद होते. कुठल्याही परिस्थितीत मला ते सांभाळायचे होते. तोच ते कागद हिसकावण्यासाठी माझ्यामागे दोन माणसं लागली. भरभर चालत मी पुढे जाऊ लागले. त्याहून जोरात चालत ते दोघे माझ्या अगदी जवळ येऊन पोहोचले. हे पाहून घाबरून मी पळत सुटले. पळता पळता एका जुन्या घरापाशी आले. तिथे एक बंद खोली मला दिसली. कसलाही विचार न करता आत जाऊन मी दरवाजा घट्ट बंद केला. दोन-चार कड्या होत्या त्याही लावून घेतल्या.

जुन्या दाराला एक छिद्र होतं. त्यातून बाहेर पाहिलं तर ते दोघेही बाहेरच्या पायरीवर बसलेले दिसले. मनातून मी चांगलीच घाबरले होते. तशातच खोलीकडे मी निरखून पाहिलं. खोलीला एकही खिडकी नव्हती. दारही एकच होतं. ते मीच बंद केल्यामुळे आतल्या बाजूला जरासा अंधारच होता. एका जुन्या पलंगाशिवाय आत काहीच नव्हतं. जुनी अंधारी कुंद खोली होती ती.

धावून धावून दमल्यामुळे आणि घाबरल्यामुळे पलंगाच्या टोकाशी जराशीच मी विसावले. हातात कागदाचं बेंडोळं घट्ट धरून ठेवलं होतं. असाच काही वेळ गेला. बाहेर कसलीच हालचाल नव्हती. माझी भीतीही थोडी कमी झाली. आता मी माझे कागद वाचवू शकेन असा एक ओझरता विचार मनात आला.

ज्या क्षणी मनात विचार आला, त्याच क्षणी कोपऱ्यातून एक भला मोठा नाग फुत्कारत पुढे आला. माझ्या दिशेनं तो जोरात पुढे येत होता. अधून मधून फणा काढून दंश करण्याच्या प्रयत्नात तो होता. आता तर माझी भीतीनं गाळणच उडाली.काय करावं ते सुचत नव्हतं. पण प्रतिक्षिप्त क्रियेप्रमाणे स्वत:ला वाचवण्याचा प्रयत्न करत मी वेड्यासारखी त्या खोलीत इकडून तिकडे धावत सुटले. असा बराच वेळ गेला. नागाची व माझी शर्यत लागल्याप्रमाणे मी पुढे व तो मागे, कधी जमिनीवरून तर कधी पलंगावरून धावणं चालूच होतं.

एका क्षणी माझ्या असमर्थतेची जाणीव झाली. माझी कशावरच सत्ता

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नाही. मी काहीच करू शकत नाही. माझ्या असहाय्यतेची पूर्ण कल्पना आली. पटलंही आणि खात्री झाली. एकही गोष्ट करण्यास असमर्थ असलेल्या माझ्यातील 'जीवानं' आतून टाहोऽ फोडून 'बाबाजीऽऽ' अशी एकच हाक मारली आणि जिथल्या तिथे उभी राहून मी डोळे घट्ट मिटून घेतले. कुठल्याही क्षणी नाग दंश करेल असं वाटत असताना -

काही क्षणातच मनमोहक सुगंधाबरोबर वाऱ्याची एक मंदशी झुळूक आली आणि मला लपेटून गेली. थकल्या भागल्या शरीराचा शीण नाहीसा झाला. सगळीकडे हलकासा सुगंध पसरला आणि प्रसन्न मनानं मी डोळे उघडले, तर

तर खोली नाही, नाग नाही, ती दोन माणसंही नाहीत. ज्यासाठी मी आटापिटा केला होता ते कागदही माझ्याजवळ नव्हते. सर्वच नाहीसं झालं होतं.

बाबाजींच्या अस्तित्वाचा प्रकाश सभोवार भरून राहिला होता. त्यांच्या आश्वासक हस्तस्पर्शाची जाणीव मला निर्भय करत होती.

भोवतालच्या मायावी नश्वर जगाची ओळख बाबाजी करून देत होते. 'त्यात अडकू नकोस. या जगात भासमान असणाऱ्या सुखदु:खाबरोबर धावू नकोस. मिळालेल्या नरदेहाचं सार्थक कर. मायेच्या पलीकडील त्या शक्तीची जाणीव करून घे. मायेत असलेल्या त्याच शक्तीला ओळखून घे, समजून घे आणि साक्षीरूप रहा,' बाबाजींचे मंजुळ मधुर स्वर मला नुसतं सांगत नव्हते तर ते स्वर मला घडवत होते.

मायेच्या पसाऱ्यातच राहून मायातीत होण्यासाठी बाबाजींनी ही अनुभूती दिली. मायेची ओळख करून देत माझ्यातील जीवाला मायातीत करणाऱ्या त्या बाबाजींच्या चरणकमली मी नतमस्तक झाले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१७. ।। स्मर्तृगामी बाबाजी ।।

एकदा रात्री मला स्वप्न पडलं. अतिशय अवघड अशा कडेकपारीतून मी व अन्य दोन व्यक्ती (कोण ते स्मरत नाही) फिरत होतो. कुठे जात होतो माहीत नव्हतं. कशासाठी जात होतो तेही मला कळलं नव्हतं. पण फिरत होतो. फिरण्यातच बराच वेळ गेला. एका कपारीच्या आडोशाला थोडीशी विश्रांती घेण्यासाठी आम्ही थांबलो. एक दोन दीर्घ श्वासच घेतले असतील तेवढ्यात -

तेवढ्यात प्रचंड स्फोटासारखे आवाज होऊन, उत्पात झाल्यासारखा डोंगर कापून काढावा असा अर्धा भाग उध्वस्त होऊन खाली पडला. तो काही मातीचा डोंगर नव्हता की माती घरंगळून, वाहून तो नाहीसा व्हावा. हा डोंगर म्हणजे काळ्या कातळाच्या दगडांचा भक्कम असा एकसंध असल्यासारखा भला मोठा पर्वतच होता.

क्षणापूर्वी आम्ही जिथे होतो तो सर्व भाग तुटून कोसळला होता. आम्ही जर तिथेच असतो तर देहाचा कणही दृष्टीस पडला नसता अशी अवस्था होती.

घडलेल्या घटनेनं भेदरलेले आम्ही तिघेजण सुन्न झालो. आधी काय झालं ते कळलंच नाही. जेव्हा समजलं तेव्हा थरकापच उडाला. त्या दोघांची तर बोबडीच वळली. आम्ही हातानं एकमेकांना घट्ट धरून ठेवलं.

त्यातच प्रचंड वाऱ्याचा झोतही होता. सहज आम्ही त्यात उडून गेलो असतो. पण चार-सहा फुटाच्या कपारीचा आडोसा असल्यामुळे, जोरदार आवाज करत घोंघावत वारा विरुध्द दिशेनं वहात असल्यामुळे आम्ही तग धरून उभे होतो.

होत्याचं नव्हतं होऊन खाली उतरण्याचा एकही मार्ग शिल्लक राहिला नव्हता. आता भगवंताचा धावा करण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. वाचलोच तर त्याच्याच इच्छेनं अन्यथा परिणाम काय होणार ते समोरच वाढून ठेवलेलं होतं.

बरोबरच्या दोन्ही व्यक्तींचा धीर सुटला होता. आता ते ओरडू, रडूही लागले. मी त्यांना शांत करत होते. 'स्मरण करताच हजर होणाऱ्या परमात्म्याला बोलवा' असं सांगितलं. पण स्वत:ची स्थिरता आणि शांती बिघडलेल्या त्यांना तेही जमत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नव्हतं.

मोठ्या कष्टानं व सावधानतेनं हालचाल करत त्या दोघांच्या मध्ये उभी राहून दोघांचे हात मी घट्ट धरले. स्फुरण रूपानं अंतरात जोरात नाम चालू झालं. त्याचा उपयोग झाला बहुधा, कारण आरडा-ओरडा थांबवून ते जरासे शांत झाल्यामुळे मलाही स्थिरता प्राप्त झाली. बाबाजींना हाक मारायची आठवण झाली. ''बाबाजीऽऽ बाबाजीऽऽ बाबाजीऽऽ'' अगदी आर्तपणे तीन हाका मारून मी शांतपणे उभी राहिले.

काही क्षणच गेले असतील. आकाशाच्या पार्श्वभूमीवर एक प्रकाशझोत आमच्याच दिशेनं आला. जसजसा तो जवळ येऊ लागला, तसतशी त्याची प्रखरता वाढू लागली. डोळे दिपून गेले. ते तेज आम्ही पाहू शकलो नाही. आपोआप डोळे बंद झाले आणि -

आणि पायाखाली मऊशार ओल्या गवताचा स्पर्श झाला. इतका वेळ कातळाचा खडबडीतपणा पायाला बोचत होता, आता गवताचा मृदुमुलायम स्पर्श हवाहवासा वाटू लागला. कानांना गडबड गोंधळ ऐकू आला म्हणून डोळे उघडले तर आम्ही नदीकिनारी निसर्गसुंदर आल्हाददायक वातावरणात उभे होतो.

कडेकपारीतून आमची उचलबांगडी करून प्रसन्न वातावरणात बाबाजींनी आम्हाला लीलया आणून सोडलं आणि मी जागी झाले.

जागी झाले आणि लक्षात आलं की स्वप्नात सुध्दा मी बाबाजींनाच हाक मारली. म्हणजेच माझ्या ध्यानी-मनी-स्वप्नीही बाबाजी अखंड वास करून होते.

काही वेळा काय होतं की आपल्या अडीअडचणीत आपण भगवंताला हाक मारतो. परंतु आपल्याला वाटतं की माझी हाक काय त्याच्यापर्यंत जाणार? या विचारामुळेच आपल्या हाकेत दम नसतो. शिवाय 'मी' हाक मारणारा शिल्लक राहून मारलेली हाक त्याच्यापर्यंत पोहोचत नाही. परंतु -

परंतु, आपल्यातल्या असमर्थपणाची जाणीव झाली व त्यांच्या समर्थपणाची खात्री असली की आपला विश्वास व श्रध्दा अधिक वाढते. मग सारं काही विसरून आपण हाक मारतो तेव्हा ह्या विसरण्यात आपला 'मी, अहं आणि

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अहंकार' यांचंही क्षणभर विस्मरण होतं. हे होणंच अत्यंत महत्त्वाचं असतं.

जिवाशिवाच्या भेटीत हा 'मी'च सर्वात मोठा अडसर असतो. त्यामुळे मी'च्या विस्मरणामुळे मारलेली हाक 'स्मर्तृगामी' अशा म्हणजेच स्मरण करताच हजर होणाऱ्या महात्म्यांना ऐकू येते. तेव्हा सदैव दुसऱ्यांना मदत करण्याचा वसा घेतलेले महापुरुष तत्काळ आपल्याला साहाय्य करण्यासाठी धावून येतात.

याचा जरूर अनुभव घ्यावा.

हाक मारा - प्रयत्न करा - मदत तयारच असते.

१८. ।। स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही ।।

एकदा मी अशीच ध्यानास बसले असताना कानावर शब्द आले 'स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही.' म्हण तर नेहमीचीच वापरातली. साधाच अर्थ असणारी.

एखाद्याला सांगितलेलं काम त्यानं जर केलं नाही व ते आपल्याला करायला भाग पडलं तर आपल्याच मुखातून येणारी ही म्हण. तसंच या म्हणीचा दुसरा अर्थ - माणूस जोपर्यंत जिवंत आहे, तोपर्यंत त्याला स्वर्ग दिसणार नाही. कारण स्वर्ग किंवा नरक हा जीवाला मृत्यूनंतरच मिळतो अशीच आपली समजूत आहे.

पण ध्यानात मी ऐकत होते म्हणजे हा अर्थ नक्कीच नसणार. मग काय अर्थ असेल ? अध्यात्मिक दृष्ट्या ह्याला काय अर्थ असेल ? ह्या म्हणीतून मला काय शिकायचं असेल ? मनातल्या मनात मी बाबाजींचा फोटो नजरेसमोर आणून त्यांच्या चरणावर मस्तक ठेवलं आणि माझ्या विचारांना एक दिशा मिळाली.

स्वतः म्हणजे 'मी'. हा 'मी' मेला पाहिजे. म्हणजे नाहीसा झाला पाहिजे. सर्व दुःखांचं कारण तर हा 'मी'च आहे ना ? ह्या 'मी'नं बध्द झालेला जीव फक्त स्वतःच्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दृष्टीनंच पाहतो, विचार करतो. ह्या 'मी' च्या अहंकारानं पुष्ट झालेला जीव दुसऱ्यांवर आपला हक्क गाजवतो, काही अपेक्षा करतो. त्यात अपयश आलं की आपणच दु:खाला जवळ करतो. त्यामुळे आपल्या जीवनातील आनंद नाहीसा होतो. हे जर व्हायला नको असेल, तर आपल्यातल्या 'स्वत:ला' मारलं पाहिजे. 'मी' संपवला पाहिजे. सर्व दु:खाला कारण असलेला 'मी' मेलाच पाहिजे.

हा 'मी' नाहीसा झाला की तिथे 'तो' येऊन राहतो. 'तो' येऊन राहिला की आपली दृष्टीच बदलते. प्रत्येक गोष्टीला अर्थ प्राप्त होतो. दुसऱ्याची सहसंवेदना कळते, माणूस माणसाजवळ प्रेमानं जाऊ शकतो, विरोध संपतो आणि आपुलकी, जिव्हाळा, प्रेम निर्माण होऊन अंत:करण शुध्द, निर्मळ होतं. हीच आपुलकी, हाच जिव्हाळा, हेच प्रेम भगवंताविषयी निर्माण झालं की अंत:करण विशुध्द प्रेमानं भरून जातं. अंतरात भक्तिप्रेम प्रगटतं. हेच प्रेम अश्रूंच्या रूपानं डोळ्यातून पाझरतं, स्पर्शातून फुलतं. सान्निध्यात येणाऱ्यांवर वात्सल्याचा वर्षाव करतं. तेव्हा भक्तीही सुगंधित होऊन माधुर्यानं अलगद फुलत जाते. आनंदाचा लाभ होऊन पूर्णानंद उदयाला येतो आणि या भूतलावरच आपल्या अवती भवती स्वर्ग निर्माण होतो.

म्हणजेच याचि देही याचि डोळा इथेच स्वर्गसुखाचा आपल्याला लाभ घ्यायचा असेल तर 'स्वत:ला मारलं पाहिजे.' तरच

आपल्या घरात स्वर्ग अवतरेल.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१९. ।। गंगास्नान ।।

बहिरंग साधना आणि अंतरंग साधना असे साधनेचे दोन मुख्य प्रकार आहेत.

पूजापाठ, व्रतवैकल्य, तीर्थयात्रा, गंगास्नान, जपजाप्य, स्तवन, आरती, अतिथीसेवा, साधुसेवा, सामाजिक कार्य या सर्व बहिरंग साधना आहेत. या प्रकारांतील आपल्याला जशी जमेल तशी साधना करत शारीरिक व मानसिक शुध्दी प्राप्त करून आस्ते आस्ते पुढे जायचं असतं. अंतरंग साधना सर्व प्रकारचे लोक करू शकत नाहीत. ईश्वराशी त्यांची ओळख नसते. पण देवदेवतांच्या शक्तींची त्यांना जाणीव असते आणि सर्वसाधारणपणे सर्वांना याच गोष्टी हव्या असतात. त्यासाठी या सर्वेषाम् साधना आपल्या ऋषिमुनींनी, साधुसंतांनी सांगितलेल्या आहेत. तसंच सर्वच संतांनी 'नामाचं' महत्त्व सांगून अखंड नामात रहायला सांगितलं आहे.

जीव उन्नत होऊ लागला की त्याच्या बाह्य साधना कमी होत जाऊन अंतर्गत साधना सुरू होतात. पण योगी हा योगविद्येमार्फत सुरवातीपासूनच प्राणायामाच्या आधारे आंतरिक साधनेला सुरवात करतो तेव्हा मूलाधार चक्र ते सहस्रार चक्रापर्यंतची अंतर्गत प्रक्रिया सुरू होते. ज्यावेळी त्याची महाशक्तीशी अथवा ईश्वराशी ओळख होते तेव्हा भक्ती करून तोही अंतिम ध्येय गाठतो.

याचाच अर्थ दोन्ही साधनांची सांगड घालून केलेली साधना सर्वांच्याच उपयोगाची होते. अखंड आपल्या नामाशी अनुसंधान ठेवून रोज २५-३० मिनिटं ध्यान केल्यास दोन्ही दिशेने उत्कृष्ट प्रगती होऊ शकते.

अनेक लोक तीर्थयात्रा करतात, गंगास्नान करतात. हल्ली तर सुखसोयींमुळे हे फार वाढलं आहे. ऑफिसमधून फिरतीचे पैसे मिळतात तर जाऊन येऊया किंवा अनेकजण जातात तर आपणही जाऊ या किंवा फायदा होईल की नाही माहीत नाही पण सहल तर होईल. तेवढीच मजा असा विचार करून कुलदेवतेच्या दर्शनाला व तीर्थयात्रेला जाणारे लोक आहेत. खरोखर यामुळे या लोकांना आध्यात्मिक लाभ काय होत असेल ?

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कुठल्याही साधनेत मनाच्या एकाग्रतेला जास्त महत्त्व आहे. त्यामुळे कुठल्याही साधनेत मन असेल तरच दृश्य स्वरूपात त्याचा लाभ मिळू शकतो.

उदाहरण घ्यायचं झालं तर गंगास्नानाचं घेऊ या. गंगास्नान ही बहिरंग साधना आहे. सर्व प्रकारचे म्हणजे सत्त्व-रज-तमोगुणाचे लोक गंगास्नान करू शकतात. तेव्हा स्नानामुळे जे स्वास्थ्य मिळतं ते प्रत्येकाला सारखंच मिळतं. त्यातील काही गंगास्तोत्र म्हणतील तर स्वास्थ्याबरोबर थोडीशी भक्तीही होईल. जर कोणी 'जलदेवता गंगेच्या' दर्शनाची अपेक्षा करेल, तर ध्यानानं त्याला तेही प्राप्त होईल. आत्यंतिक दृढ श्रध्दाभावाने अथवा सद्‌गुरूंच्या आज्ञेने जर कोणी गंगास्नान करेल, तर त्याला अतिशय लाभ होऊ शकतो हेही खरंच आहे.

पण जर का तुम्हाला तुमच्या जीवनाचं सार्थक करायचं असेल तर शरीरांतर्गत असलेल्या त्रिवेणीसंगमावरच स्नान केलं पाहिजे. प्रत्येक मनुष्यमात्राच्या शरीरात इडा, पिंगला व सुषुम्ना या तीन मुख्य नाड्या आहेत. इडा म्हणजे गंगा, पिंगला म्हणजे यमुना आणि सुषुम्ना म्हणजे सरस्वती.

इडा भगवती गङ्‌गा पिङ्‌गला यमुना नदी ।
इडापिङ्‌गलयोर्मध्ये सुषुम्ना च सरस्वती ।।
त्रिवेणीसङ्‌गमो यत्र तीर्थराजः स उच्यते ।
तत्र स्नानं प्रकुर्वीत सर्वपापैः प्रमुच्यते ।।

ज्ञानसंकलिनी तंत्र ११ व १२

इडा (गंगा) आणि पिंगला (यमुना) या नाड्यांच्या मध्ये सुषुम्ना नाडी हीच सरस्वती नदी आहे. मूलाधार चक्रापासून सुरवात होऊन आज्ञाचक्रात या तीन नाड्यांचा त्रिवेणी संगम होतो. हेच प्रयाग तीर्थक्षेत्र आहे. याच्यावरच सहस्रारचक्रातून पाझरणाऱ्या अमृतधारात जर कोणी डुबकी मारू शकला तर तो सर्व बंधनापासून मुक्त होऊन परम पदाला पोहोचतो.

ज्ञान, भक्ती व कर्म यांच्या साहाय्याने साधना करत इथे प्रत्येकालाच जायचं आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आंतरिक साधनेने ज्यांना हृदयात स्थिरता प्राप्त होते, त्यांना तीर्थक्षेत्री जाऊन गंगास्नान करण्याची गरज शिल्लक रहात नाही. आंतरिक साधनेसाठी आपल्या बाबाजींनी 'क्रियायोगाचं' तंत्रशास्त्र विकसित केलं आणि योगिराज शामाचरण लाहिरी महाशयांना १८६८ मध्ये स्वत: क्रियायोगाची दीक्षा दिली व पुढे त्यांच्यामार्फत क्रियायोगाचा प्रसार केला.

अंतरातील त्रिवेणीसंगमात मनाने डुबकी मारून, त्यात स्नान करून, जीवन धन्य करून घेण्याचं तंत्रशास्त्र क्रियायोगानं आत्मसात करता येतं.

आता बाबाजी प्रणीत क्रियायोग काय आहे ते पाहू या.

२०. ।। बाबाजी प्रणीत क्रियायोग ।।

अति प्राचीन असलेल्या या योगविद्येचा उल्लेख वेद, उपनिषदं, गीता या सर्वांमध्ये आढळतो. तसंच भगवान पतंजली यांनीही याचा उल्लेख केला आहे.

हा योग भगवान श्रीकृष्णानं आपल्या पूर्वजन्मात सूर्याला सांगितला, सूर्यानं तो मनूला आणि मनूनं तो इक्ष्वाकूला सांगितला.

जनक, व्यास, शुकदेव, पतंजली, येशुख्रिस्त, सेंट जॉन, सेंट पॉल, कबीर, गोरक्षनाथ, बुध्द, तुलसीदास, नानक या सर्वांनी ही योगविद्या आत्मसात केली आणि आत्मा-परमात्म्याचं मीलन घडवून आपल्या जीवनाचं सार्थक केलं.

भगवान श्रीकृष्णाच्या पूर्वीही हा 'अक्षययोग' होता आणि तो आजही आहे. परंतु, जेव्हा धर्माची हानी होते तेव्हा तेव्हा हा अमरयोग लुप्त होतो. त्यावेळीच महामानवाच्या रूपात परत परत अवतार घेऊन युगपुरुष पुन्हा पुन्हा धर्माची

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

स्थापना करतात.

या कलियुगात भगवान श्रीकृष्णासमान असणाऱ्या बाबाजींनी अर्जुनाचं प्रतिनिधित्व करणाऱ्या योगिराज शामाचरण लाहिरी महाशयांमार्फत १८६८ सालानंतर सर्व मनुष्यमात्रांसाठी हा योग सहजसाध्य केला. यालाच बाबाजींनी 'क्रियायोग' असं नाव दिलं आहे.

या साधनेनं योग्याचं मन स्थिर होऊन ईशतत्त्वाशी जोडलं जातं. अज्ञान अंध:कारातून → ज्ञानप्रकाशाकडे नेणारा आपला हा श्वासच (प्राणवायूच) आहे. एका विशिष्ट प्राणायामाच्या क्रियेनं जिवाशिवाचं मीलन घडवून आणता येतं.

हा एक साधा, सरळ, सोपा असा शारीरिक व मानसिक क्रिया अंतर्भूत असलेला योगविद्येचा प्रकार आहे. प्राणायामानं रक्तातील कार्बन डाय ऑक्साईड बाहेर टाकणं व बाहेरील प्राणवायूनं रक्त भरून टाकणं ही एक क्रिया आहे. त्यामुळे नवीन ऊर्जा तयार होऊन सप्तचक्रांतून ती मार्गस्थ होते. त्यावेळी अंतर्गत प्रक्रियेला सुरवात होते.

मन: स्थिरं यस्य विनावलम्बनम् ।
वायु: स्थिरो यस्य विनानिरोधनम् ।।
दृष्टि: स्थिरा यस्य विनावलोकनम् ।
सा एव मुद्रा विचरन्ती खेचरी ।।

ज्ञान संकलिनी तंत्र १४

श्वास घेणं व सोडणं यामधील क्षण स्थिर असतो. शांत बसून तो बघा, पकडा व वाढवा. स्वत: काहीही न करता, आपोआप जेव्हा कुंभक होतो (नाक बंद केल्याशिवाय) तेव्हा बाह्यमुखी गती थांबून अंतर्मुखी गती चालू होते.

जेव्हा बाहेरचा श्वास बाहेर व आतला श्वास आत कार्यशील होतो, तेव्हा इडा-पिंगलांचं मीलन होऊन सुषुम्नेत प्राणवायू प्रवेश करतो. इथेच स्वयंस्वरूप प्रकाश पुरुषोत्तमाचा वास असतो.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

''इडापिंगलांचे होऊनी मीलन । जगदंबा कुंडली चढे वर ।
कुंडलिनी प्राण संयोग होता । हृदयी सुषुम्ना चैतन्ये खेळता ।
अनाहत नाद घोष होता । सत्वर ब्रह्मरंध्र स्वये खुलता ।
सोऽहं भावे करिता कीर्तन । ब्रह्म परब्रह्म तद्रूपची सान ।
स्वये ते स्वरूप होऊनी आपण । पूर्ण तदाकार शाळिग्राम जाण ।
स्वयंप्रकाशात प्रकाशे ते ज्ञान । म्हणती त्यास आत्मज्ञान ।''

शाळिग्राम गाथांबुज ११

(शाळिग्राम गाथांबुज लिहिताना भगवान नित्यानंदांनी हा सर्व भाग अनुभूती देऊन मला समजावून दिला होता.)

या योगविद्येचं शास्त्र नेहमी गुप्त ठेवतात. ते प्रगट करत नाहीत. एकाकडून दुसऱ्याला व दुसऱ्याकडून तिसऱ्याला असं ते योग्य सद्गुरूंच्याच मार्फत पुढे जातं. कारण क्रियायोगाची साधना अत्यंत सूक्ष्म कर्म आहे. ह्याचा अभ्यास वारंवार गुरूंच्या सहवासात राहूनच केला पाहिजे.त्यात अजिबात चूक होऊन चालत नाही. चुकीच्या प्राणायामानं खूप हानी होऊ शकते, हे साधकांनी लक्षात ठेवलं पाहिजे.

क्रियायोगाची दीक्षा 'योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया' व 'सेल्फ रिअलायझेशन फेलोशिप' या संस्थांमार्फत अधिकृतपणे दिली जाते.

Yogada Satsang Society of India, Paramahansa Yogananda Path, Ranchi - 834 001, Jharkhand, India. Tel. (0651) 2460071 / 2460074 / 2461578. www.yssofindia.org.

जिज्ञासू वाचकांनी याचा जरूर लाभ घ्यावा.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

२१. ।। अतिशुध्द व पवित्र असाच तुला देईन ।।

योगिराज लाहिरी महाशय, स्वामी युक्तेश्वरजी, परमहंस योगानंद व शिवेंद्र कंदाहारी यांच्या जीवनात या सर्वांना बाबाजी देहधारी भेटलेले आहेत. काही वेळा बाबाजी स्वत:च्या इच्छेनं त्यांना भेटले. काही वेळा अत्यंत तळमळीनी मारलेल्या हाकेने, भक्तासाठी धाव घेणारे बाबाजी तत्काळ प्रगट झाले आहेत.

मला मात्र बाबाजी कधीच देहधारी भेटलेले नाहीत. अगदी सुरवातीपासून आजपर्यंत ते मला प्रकाशरूपच भेटलेले आहेत. ठराविक प्रकारचा प्रकाश दिसला की त्यांच्या अस्तित्वाची मला जाणीव होते. काही वेळा अंत:स्फूर्तीनं ते प्रेरणा देतात किंवा काही वेळा दृश्यही दाखवतात. बऱ्याच वेळा अत्यंत मृदू आवाजात ते बोललेले या कानांना ऐकू येतं. सुरांची तार छेडल्यासारखे, मधुर झंकारात काही वेळा त्यांचे शब्द प्रगट होतात. कधी डोळ्यांना वाचायला मिळतात. तर कधी कानांना ऐकू येतात.

प्रकाशरूप बाबाजींच्या अस्तित्वाची जाणीव माझ्या अवतीभवती मला जाणवते. त्यावेळी मी एका वेगळ्याच अवस्थेत असते. जणू काही आमचं विश्वच निराळं असतं.

अशा प्रकारे बाबाजी मला सांभाळत होते, मार्गस्थ करत होते तरी देहधारी माणसाला देहधारी मार्गदर्शकाची आवश्यकता असते. ही आपल्या मनाची गरज आहे. कारण पदोपदी शंका येतात, अडीअडचणी येतात, त्यावेळी आपल्याला आधाराची खरी आवश्यकता असते. संकेत रूपानं मार्गदर्शन झालं तरी त्याचा योग्य अर्थ कळून त्यातून पुढील अवस्थेवर जाण्यासाठी कोणाच्या तरी साहाय्याची अत्यंत जरूरी असते.

मग माझं कोण असेल ? मी बाबाजींना म्हणाले, 'बाबाजी माझं श्रध्दास्थान स्त्री असावी.' कारणं अनेक असतील किंवा पूर्वग्रहदूषित म्हणूनही असेल, पण माझं ते अज्ञान होतं. ते स्वत: बाबाजींनीच दूर केलं.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

स्त्री व पुरुष भिन्न का ? प्रत्येकाचे गुण काय ? हे मला समजावून सांगून, स्त्री व पुरुष या दोघांमध्ये वास करणारा 'आत्मा' महत्त्वाचा, 'जीव' महत्त्वाचा. त्याकडे बघण्याची निखालस दृष्टी बाबाजींनी मला दिली. पण समाजात वागताना स्त्री-पुरुष भेदाप्रमाणे वागणं गरजेचं आहे हे सांगून त्यांनी दोघांमध्ये असलेल्या विशेष गुणांचा भाग मला समजावून सांगितला.

स्त्रीमध्ये नवनिर्मितीची कूस, वात्सल्य, माया, समर्पण करण्याची ताकद आणि अफाट सहनशीलता असून त्यामुळेच कुटुंबसंस्था तारली जाते. पुरुषांमध्ये पराक्रम, हिंमत, पुढाकार, काहीही करण्याची तयारी असल्यामुळेच खरं तर कुटुंबाचं कर्तेपण पुरुषाकडे आलं. पुरुषाचे हे गुण पाहूनच ऋषिमुनींनी कुटुंबसंस्था उत्तम चालावी म्हणून कर्तेपण पुरुषाला दिलं. स्त्री आई होऊन स्वतःच्या खांद्यावर संपूर्ण कुटुंबाचा पूर्ण डोलारा सांभाळते. अशी ताकद तिच्यात असते.

स्त्री व पुरुष यांच्या मीलनातून संतती निर्माण होते. तिचा सांभाळ करून उत्कृष्ट मानवरूपात ती प्रभुसन्मुख व्हावी हा ऋषिमुनींचा मूळ हेतू होता.

पण त्या दोघांमध्ये असणाऱ्या गुणांचा 'अहंकार' उत्पन्न होऊन, पुरुष स्वतःला कर्ता समजून स्त्रीची पायमल्ली करू लागला. दबलेल्या, दुखावलेल्या स्त्रीनं समान हक्काचा दावा केला आणि कुटुंब संस्थेला तडा गेला.

खरं तर पती व पत्नी ही संसार रथाची दोन चाकं. आपापल्या गुणांच्या आधारे, दुसऱ्याचे दुर्गुण दूर करून, प्रत्येकानं आपला सहभाग प्रेमपूर्वक स्वीकारला तरच संसार फुलतो. काही गोष्टींची तडजोड करावीच लागते. कारण मुळात आपणच अपूर्ण आहोत. दोघांनी एकत्र येऊन पूर्णत्व प्राप्त करायचं असतं. परंतु बऱ्याच वेळा 'तू तू मैं मैं' असंच होताना दिसतं.

हा झाला सर्वसाधारण भाग. परंतु, जीव उन्नत होऊ लागला की स्त्री व पुरुष ह्यांच्यात असणाऱ्या विशेष गुणांचं एकत्रीकरण होऊन उत्तम व्यक्ती तयार होते. संतांच्या अंगी दोन्ही गुण ओतप्रोत भरलेले असतात. म्हणून सद्‌गुरूंना 'माउली' म्हणतात ते पुरुष असले तरी.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

स्त्री-पुरुषांच्या स्वभाव गुणांचं अति विशाल स्वरूप संतांच्या ठायी वास करून असतं. हे संत परम श्रेष्ठ पवित्र असतात. स्त्री-पुरुषांचे आणखीही काही भाग सांगून बाबाजी मला म्हणाले, 'काळजी करू नकोस. ज्या व्यक्तीचं अंत:करण अति शुध्द व पवित्र असेल अशीच व्यक्ती मी तुला देईन.'

२२. ।। शाळिग्रामचा केशव तुझा आहे ।।

अखिल मानवजातीच्या उध्दारासाठी अखंड कार्यरत असलेल्या बाबाजींची परंपरागत साधना तर क्रियायोगाची. पण मला मात्र बाबाजींनी क्रियायोगाची दीक्षा दिलेली नाही किंवा कोणाकडून घ्यायलाही सांगितली नाही. याबद्दल मी एक दिवस बाबाजींना विचारलं, 'बाबाजी, असं का हो ?'

आपल्या कृपाकटाक्षानं बाबाजींनी माझ्याकडे पाहिलं, हसले आणि गोड शब्दांत मला समजावून सांगू लागले, 'जीवानं शिवापर्यंत पोहोचण्याचे अनेक मार्ग आहेत. आत्म्यानं परमात्मा होण्याच्या तंत्रशास्त्राचे सुध्दा शास्त्रशुध्द अनेक प्रकार आहेत. पूजापाठ, व्रतवैकल्य, तीर्थयात्रा, जपजाप्य, स्तवन, आरती, ध्यानधारणा, अतिथिसेवा, साधुसेवा, सामाजिक कार्य अशा विविध प्रकारच्या उपासनेनं जीवाला उन्नत होत, पुढे जायचं असतं. प्रत्येकाचा मार्ग हा ऋणानुबंधानं ठरलेला असतो. पण तुझ्या बाबतीत माझी योजना काही निराळीच आहे.

खरं सांगायचं तर पूर्वजन्मात तू योगविद्या आत्मसात केलेली आहेस. म्हणूनच तुला जरी माहीत नसलं, तरी तुझ्यात वास करणाऱ्या जीवाला ते तंत्र पूर्णपणे अवगत असल्यामुळे तू जडदेहातून ज्योतिरूपानं बाहेर पडू शकलीस.'

'आता मी काय सांगतो ते नीट ऐक' असं म्हणून बाबजी मला शांतपणे समजावून देऊ लागले, 'ध्यानधारणेनं मन एकाग्र होऊन ग्रहणशक्ती वाढते.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

योगविद्येनं, प्राणायामानं योगी आपली कुंडलिनी शक्ती जागृत करतो. मूलाधार चक्र ते सहस्त्रार चक्रापर्यंत योग्याचा प्रवास होतो. भोवतालच्या परिस्थितीत अलिप्त राहून योग्यास स्थितप्रज्ञाची अवस्था प्राप्त होते. पण काही वेळा जीवनात रुक्षता येते हं.

एकांतात स्थिर आसनात घेतलेलं नाम व ध्यान ह्यात फारसा फरक नाही. योगी - 'श्वासावर' लक्ष केंद्रित करून उच्च पदाला पोहोचतो तर भक्त 'नामावर' लक्ष केंद्रित करून नामरूप भगवंतच होतो. त्याला जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी परमात्माच दिसतो. अशा भक्ताच्या हृदयात भक्तिप्रेमामुळे अखंड प्रेमाचा झरा झुळझुळ वहात असतो.'

काही वेळ थांबून बाबाजी पुढे म्हणाले, ' हे बघ, संसारात राहून कुशलतेनं मोक्ष प्राप्त करून घेता येतो. ध्यान आणि नाम या दोन्ही गोष्टी एकत्रित आल्या तर त्यांचे सुपरिणाम अधिक चांगले होतात. यामुळे संसारावर प्रेम करूनही अलिप्त रहाता येतं. ही अवस्था शब्दात सांगता येणार नाही. पण या दोन्ही गोष्टी आत्मसात करून एकाच वेळी अतिशय प्रेमानं व अंतरात अलिप्त राहून आपल्याला सांसारिक जीवन यशस्वी करता येतं. आपल्या रोजच्या प्रेमसंबंधावर सर्व जीवन अवलंबून असतं. हे ज्यांना जमतं अशाच व्यक्ती जीवनात व परमार्थात यशस्वी होतात.

संसारातील सर्व सुखांचा स्वीकार करून त्यातच आनंदानं राहून अध्यात्मात आपलं अंतिम ध्येय गाठणं खूपच अवघड आहे.

तुझ्याप्रमाणे प्रतिकूल परिस्थितीत सामान्यपणे राहून सुध्दा खूप पुढे जाता येतं. हे सर्वांना प्रोत्साहित करणारं तुझं जीवन अनेकांना परमार्थाच्या वाटेनं सहजपणे घेऊन जाईल. ही माझी पूर्वनियोजित योजना आहे.'

बाबाजी आज खूपच सांगत होते. एवढं त्यांनी अजूनपर्यंत कधी सांगितलं नव्हतं. अजूनही त्यांना बोलायचं होतं. ते म्हणाले, 'भक्त कसा असावा हे दाखवण्यासाठीच श्री दयानंद शाळिग्राम स्वामींचा जन्म आहे. वो मेरा लाडला बेटा है।' (बाबाजी कुठल्याही भाषेत बोलत असत. माझ्याशी मराठीतच बोलत, पण

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

खुषीत असले की एखादं वाक्य हिंदीत बोलत). अशा शाळिग्रामाच्या कंठातील ताईत असलेला 'केशव' तुझा आहे. अत्यंत कठीण परिस्थितीत सुध्दा केशवची शाळिग्रामावरील अढळ श्रध्दा कणभरही कमी झाली नाही आणि त्याची स्थिरता कधीच बिघडली नाही. असा केशव शाळिग्रामाचा प्राणप्रिय भक्त आहे. या दोघांचा तुझ्याशी ऋणानुबंध असल्यामुळे भक्तियोग आत्मसात करण्यासाठी तुला केशवकडे (श्री. अप्पा आपटे यांचेकडे) मीच पाठवले आहे.' आपलं प्रदीर्घ संभाषण संपवून मला पूर्णपणे संशयरहित करून बाबाजींनी शुभाशीर्वाद दिले.

बाबाजींच्या कृपेनं त्यांच्याच इच्छेत माझी इच्छा मिसळून त्यांच्या पवित्र चरणी मी नतमस्तक झाले.

माझ्या आध्यात्मिक प्रगतीसाठी बाबाजींनी मला 'केशव' कडे पाठवलं. त्या केशवनं शाळिग्राम स्वामींना कसं आपलंसं केलं ते आता पाहू या.

२३. ।। तुला मंजूर ते मला मंजूर ।।

सर्वसंचारेश्वर महायोगावतारी बाबाजींनी मला अप्पांकडे (केशवकडे) पाठवलं. हे अप्पा कोण हे समजण्यासाठी मी श्री शाळिग्राम स्वामींची प्रार्थना केली. 'ज्या प्रेमाच्या बळावर अप्पांनी तुला आपलंसं केलं ते ओळखायला, जाणायला या दृष्टीचा व बुध्दीचा काही उपयोग नाही तर त्यांचं स्वस्वरूप ओळखण्याची मला दृष्टी दे.'

माझ्या प्रार्थनेला यश आलं. राखेनं भरलेल्या विस्तवावर फुंकर मारताच राख उडून आतील धगधगीत विस्तव जसा दिसतो, तसं मला अप्पांचं अंत:स्वरूप दिसलं. सावळ्या तनूच्या अप्पांचं लखलखीत अंत:करण दिसलं. त्यांना बघण्यासाठी शाळिग्राम स्वामींनी मला दृष्टी दिली.

संसारात राहून, सर्वस्व शाळिग्राम-चरणी अर्पण करून 'तुला मंजूर ते मला मंजूर' ह्याप्रमाणे राहून जीवांना प्रभुसन्मुख करण्याचं कार्य अप्पा करत आहेत.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

साधनेला सुरवात झाली तेव्हा मला निर्गुण उपासना आवडे. ध्यानधारणा आवडे. ह्या विषयात मी अंतर्मुख होते ते अप्पांनी मला बहिर्मुख केलं. या जगाकडे, या सृष्टीकडे बघण्याचा एक नवा दृष्टिकोन मला अप्पांनी दिला आणि निरर्थक वाटणऱ्या गोष्टीतला सार्थ अर्थ कळू लागला. ह्यानंतर जीवनातील प्रत्येक क्षणाचं सार्थक होऊन माझं पाऊल पुढेच पडू लागलं.

दशग्रंथी ब्राह्मणाच्या घरात जन्माला आलेले अप्पा मूळचे क्रांतिकारक होते. स्वातंत्र्यवीर सावरकर हे त्यांचं दैवत. केवळ त्यांच्या आज्ञेमुळे ती. अप्पा अध्यात्मात शिरले. त्यानंतर कोपरीचे महाराज, उपेंद्रानंद स्वामी, पाचलेगावकर महाराज, गुळवणी महाराज, दत्तमहाराज कवीश्वर अशा अनेक थोर सत्पुरुषांच्या सहवासात अप्पांची अध्यात्मातील वाटचाल सुरू झाली. कसून व्यायाम करणं, तबला, गायन ह्या प्राविण्याबरोबरच ते उपासना करू लागले.

निश्चयी मनाच्या अप्पांनी अनेक उपासना अत्यंत कडकडीत राहून केल्या. त्यानंतर वयाच्या चाळिशीच्या आसपास अप्पांची व शाळिग्राम स्वामींची भेट झाली आणि अप्पांना आपला आत्माराम गवसला. हृदयात शाळिग्राम स्वामींची स्थापना करून अप्पा आपला प्रत्येक श्वास त्यांच्यासाठी जगू लागले.

गरिबीचे चटके आणि पैश्याअभावी होणारे हाल लहानपणापासून सोसत असून सुध्दा 'शाळिग्रामाशिवाय मला काहीही नको' हे वाक्य अप्पांनी हृदयात कोरून ठेवलं होतं. कितीही प्रतिकूल परिस्थिती, संकटं आली तरी या भावनेला कधी धक्का लागला नाही. चिरंतन, अक्षय शाळिग्रामाचं रूप त्यांनी नुसतं हृदयात साठवून ठेवलं नव्हतं, तर त्यांचा 'आत्माराम' त्यांचं हृदयच झाला होता. एकमेकांना समजून घेणारे, जीवाला जीव देणारे दोघे एकत्र आले होते, एकमेकांचे झाले होते. शाळिग्रामाचा आनंद अप्पांसाठी परमानंद होता.

शाळिग्रामाला अप्पा 'देव' म्हणत. देवावर अपार माया करून देवाला प्रेमानं जिंकून घेणारे, आपलेसे करणारे अप्पा शाळिग्रामाच्या गळ्यातील ताईतच झाले होते. शाळिग्रामाच्या प्रेमानं सुगंधित झालेले ते दिवस म्हणजे अप्पांच्या आध्यात्मिक उन्नतीची परमसीमा होती. 'शाळिग्रामचा केशव' या नित्यानंदांच्या स्वमुखातील

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

शब्दानं त्यावर रत्नजडित सुवर्णकळस चढवला होता.

आपलं सर्वस्व शाळिग्रामचरणी समर्पित करून 'जे तुला मंजूर ते मला मंजूर' असं अप्पा जे वागले तेच त्यांच्या आध्यात्मिक उन्नतीचं रहस्य आहे. आपल्या सर्व इच्छांना तिलांजली देऊन, शाळिग्राम स्वामींच्या संकल्पात आपला संकल्प मिसळून टाकणाऱ्या अप्पांना हृदयाशी धरून शाळिग्रामांनी अप्पांवर प्रेमाचा वर्षाव केला.

प. पू. दयानंद शाळिग्राम स्वामी व प. पू. नित्यानंद स्वामी यांनी देह धारण करून लोकोध्दाराचं आपलं कार्य समाधिस्थ होऊन संपवलं असलं तरी आपल्या मूळ स्थितीत राहून जगदोध्दाराचं त्यांचं कार्य अखंड, अव्याहत चालूच आहे, चालूच राहील.

दोन्ही देवांनी समाधी घेतल्यावर अप्पांच्या मुखात जणू सरस्वतीनंच वास केला आहे. आपले स्वानुभवाचे बोल बोलताना व देवाचं गुणगान गाताना अप्पांची रसवंती बहरतच गेली. पण म्हणून अप्पांनी कधी भाषणं दिली नाहीत की प्रवचनं केली नाहीत. एखाद्या व्यक्तीच्या मध्ये जर एखादा विशेष गुण दिसला, जिज्ञासा दिसली तर अप्पा आपणहून त्या व्यक्तीकडे जातात, तिला प्रेमानी आपलंसं करतात, तिला जगाकडे बघण्याचा नवा दृष्टिकोन देतात, त्या व्यक्तीच्या घरच्या नातेवाईकांनाही प्रेमानी जिंकून आपलंसं करतात, तिचे नातलग सुध्दा मग अप्पांचेच होऊन जातात. त्यांच्या सुखदु:खांशी अप्पा एकरूप होतात. त्यांच्यासाठी पडेल ते काम करून त्यांना प्रभुसन्मुख करतात. हे करत असताना त्यांनी स्वत:कडे कायमच लघुत्व घेतलं, त्यांचीच सेवा केली.

असं करताना आपलं सर्वस्व द्यायला मागेपुढे न पाहणारे अप्पा सर्वांवर एवढं प्रेम करत असतात की प्रत्येकालाच ते **'आपले अप्पा'** आहेत असंच वाटतं. ते प्रत्येकावरच खूप प्रेम करतात. कारण अप्पा समोरच्या व्यक्तीला न पाहता त्यात वास करणाऱ्या जीवाकडे पहात असतात. त्या जीवाला शिवाची जोड कशी मिळेल हे बघत असताना, स्वत: मात्र अखंड शाळिग्रामाचा ध्यास घेतलेले अप्पा आता त्याचंच प्रभुकार्य करत आहेत, त्यासाठीच झटत आहेत.

'ॐ केशवाय नम: ' व **' केशवाई '** या पुस्तकांत त्यांची अधिक माहिती

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वाचायला मिळेल.

अप्पांच्या प्रेमाच्या सावलीतच माझं सर्व कुटुंब शांती, समाधानाचा अनुभव घेतं. कुठल्याही प्रसंगाला सामोरं जाण्यासाठी अप्पांच्या हाताचा मऊशार स्पर्श आम्हाला कणखर आधार देतो. कारण त्या हातातून खऱ्या प्रेमाबरोबरच अखंड नामाचा स्रोत वहात असतो.

अशा अप्पांचा 'आत्माराम' असलेला शाळिग्राम अप्पांसाठी प्रत्यक्ष 'देवच' होता. या शाळिग्रामास **'वो मेरा लाडला बेटा है'** असं बाबाजी म्हणत असत.

श्री दयानंद शाळिग्राम स्वामींनी असं काय केलं की ते बाबाजींचे लाडके झाले ते आता पाहू या.

(कै. ती. अप्पांना २७ ऑगस्ट २००३ रोजी देवाज्ञा झाली.)

२४. ।। लाडला बेटा शाळिग्राम स्वामी ।।

बाबाजींचे वडील परंगीपेटई या गावातील देवळात मुख्य पुरोहित होते. त्यामुळे पूजाअर्चा, वेदपठण, अध्यात्मसाधना हे त्यांच्या घराण्यात पिढीजात होतं. या विद्वत्तेचा वारसा बाबाजींना मिळाला होता.

लहान वयातच बाबाजींनी वेद, उपनिषदं, रामायण, महाभारत, गीता या ग्रंथांचा सखोल अभ्यास केला होता. त्यात 'गीता' त्यांना फारच आवडे.

सर्व प्राणिमात्रांना आपल्यात सामावून घेणारी ही गीता सर्व जीवांचं कल्याण करणारी आहे. या गीतेत परमेश्वरप्राप्तीसाठी, जिवाशिवाच्या भेटीसाठी ज्ञानयोग, भक्तियोग व कर्मयोगाबरोबरच योगविद्या हाही अत्यंत महत्त्वाचा भाग सांगून - कुठल्याही प्रकारे तुम्हाला सहज सोपं वाटेल त्या आधारे साधना करत 'आत्म्यानं परमात्मा कसं व्हावं' याचं यथार्थ मार्गदर्शन भगवान श्रीकृष्णानं केलं आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भगवान श्रीकृष्णाच्या स्वमुखातून स्रवलेली ही गीता म्हणजे कल्याणकारी मोक्षदायी ज्ञानगंगाच आहे.

या गीतेतील प्रत्येक अंगाच्या सखोल अभ्यासानं व प्रत्यक्ष आचरणानं परिपूर्ण झालेला शाळिग्राम स्वत: पुरुषोत्तम झाला. शाळिग्राम गाथांबुजात नित्यानंद म्हणतात,

"तो माझा प्राणसखा । दावील तुम्हा आत्मसुखा ।
गीतेमधले तत्त्वज्ञान । स्वये दावीले आचरून ।।
ज्ञानगर्भयुक्त गुण । घ्यावे तुम्ही पारखून ।"

शाळिग्राम गाथांबुज - ४

नुसत्या कर्मकांडात न अडकता मानवता, कृतज्ञता, नम्रता, सहसंवेदना, प्रेम, भक्ती या आधारे जीवानं उन्नत व्हावं. देव- भक्त नातं कसं असावं, नराचा नारायण कसा होतो हे शाळिग्राम स्वामींनी प्रत्यक्ष आपल्या आचरणातून दाखवून दिलं आहे.

शाळिग्राम गाथांबुज लिखाणाच्या वेळी भगवान नित्यानंदांनी मला स्वत: सांगितलं आहे की वस्तुत: ते व शाळिग्राम एकच आहेत. कोणीही लहान मोठं नाही. अज्ञ जड जीवांचा कळवळा आल्यामुळे शाळिग्रामानं मला प्रेमाची विनवणी केली, "नित्यानंद नावानं अवतरून तुम्ही जन-उध्दाराचं कार्य करावं. तुम्ही नित्यानंद देव व मी तुमचा भक्त दयानंद होऊन जगदोध्दारानं भूमातेचं नंदनवन करू या. निर्गुणातून सगुण साकार होण्यासाठी मला प्रेमळ आण शाळिग्रामानं घातली. म्हणूनच मी नित्यानंद नावानं अवतरलो." हे त्रिवार सत्य आहे.

भगवान नित्यानंद म्हणतात, 'मीच कृष्ण होऊन अर्जुनाला गीता सांगितली. तेव्हा त्यातील ज्ञान हे काही अवस्थेपर्यंत पोहोचलेल्या मुमुक्षू लोकांसाठीच होतं. त्यामुळे सामान्य जनांपासून हे ज्ञान दूरच राहिलं होतं. मीच ज्ञानेश्वरांचा अवतार घेतला आणि गीतेतील ते तत्त्वज्ञान अत्यंत सोप्या भाषेत सामान्य लोकांसाठी सांगितलं आहे. त्यावेळी सत्‌चिदानंद बाबा होऊन शाळिग्रामानंच माझा सांभाळ केला. त्याच वेळी ज्ञानेश्वरी लिहिण्याचं काम त्यानं केलं.'

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तर ही सोपी ज्ञानेश्वरीही कोणाला समजत नाही म्हणून गीतेतील तत्त्वांचं तंतोतंत आचरण करून - शाळिग्रामाने नराचा नारायण कसा होतो, देव व भक्त नातं कसं असावं, सामान्य जीव साधना करायला लागल्यावर त्यानं काय करावं, अडचणी काय आहेत, सिध्दी कशा मिळतात, त्यातून बाजूला कसं व्हायचं, भगवंताशी नातं कसं जोडायचं, भक्ती कशी करायची, अंतकाळी काय होतं ? हे सर्व त्यांनी आपल्या वर्तनातून दाखवून दिलं आहे. 'आपुले वर्तन हेचि ज्ञानपीठ' असंच त्यांचं आचरण होतं.

'जय योगी राया जय जय जय सद्गुरुराया' ही नित्यानंदांची आरती शाळिग्राम स्वामींनी रचली आहे. त्यात बाबाजींच्या क्रियायोगाच्या सर्व अवस्थांचंच वर्णन आहे. म्हणजेच नित्यानंद व शाळिग्राम यांनी हा क्रियायोग आत्मसात केलेला होता असंच वाटतं.

'शाळिग्राम स्वामीकृत नित्यानंद आरती'

जय योगी राया जय जय जय सद्गुरुराया ।
नित्यानंदानामे बहातो हृदयी विवराया । बहातो हृदयी विवराया ।।धृ.।।
कमलावरती कमल ते ब्रह्मकमळ निरंजन निर्वास निर्मळ आसनाचे स्थळ ।
निर्मळ आसनाचे स्थळ । प्राची सन्मुख लक्षुनी खेचरी चारोऽलन्म ।
अमरादिक सुरवर जेथे बुध्दिमतीचा मेळ । जेथे बुध्दिमतीचा मेळ ।।१।। जय योगी

त्रिखंड शिखरावरती वाहे त्रिवेणीचा ओघ । वाहे त्रिवेणीचा ओघ ।
उफराटे पाणी चाले कुंडलिनी संयोग । शेषफणा दृष्टी एकवीस स्वर्गा उमग ।
एकवीस स्वर्गा उमग । ब्रह्मादिक आवरोनी अंगे अवघे उद्योग ।। २ ।। जय योगी

कार्तिक वद्य आमावस्या कृष्ण पक्ष । आवस कृष्ण पक्ष ।
माहुलग्रामी तुमचे चरणी भक्तांचे लक्ष । तेथे शाळिग्राम स्वामी वहातो तन मन ।
स्वामी वहातो तन मन । तेथील भक्तांना आता तू दावी सन्मार्ग ।।३।। जय योगी

सर्व प्रतिकूल परिस्थितीला सामोरं जाऊन अध्यात्म मार्गानं चालणं खूप कठीण आहे. म्हणून **'सर्व भार माझ्यावर टाकून तुम्ही निर्धास्तपणे पुढे चला'** असं शाळिग्राम स्वामी सांगतात.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

'सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज' हेच त्यांनी आपल्या सद्वर्तनातून दाखवून दिलं.

प. पू. नित्यानंदांनी सांगितलेल्या प्रसादवाणीमुळेच सर्व साधकांसाठी 'शाळिग्राम गाथांबुज' ही पोथी तयार झाली. ही पोथी जीवांना अत्यंत तारक आहे. शाळिग्राम स्वामींशी कुठलंही नातं जोडलं तरी ते आपल्याला श्रेयसाप्रतच नेतात. रोजचं धकाधकीचं जीवन जगताना साधना करणं कठीण जातं. म्हणून शाळिग्राम स्वामींनी स्वमुखानं सांगितलं आहे -

"आपापली कर्तव्यकर्मं करा आणि पंधरा दिवसांतून एकदा नित्यानंद दर्शनासाठी या. देह धारण केला की देहधर्म आलाच. तो कोणाला चुकलेला नाही. ह्या भूतलावर जन्माला घालून ज्या मातापित्यांनी आपला सांभाळ केला त्यांचे ऋण कधीही विसरू नका. त्यांच्या वृध्दापकाळात भलंबुरं विसरून त्यांची सेवा करा. आपल्या मुलांचा यथायोग्य सांभाळ करून त्यांना यशस्वी नागरिक बनवा. ऐदी, स्वार्थी न बनवता घेण्याआधी देण्यास शिकवा. आपल्या वर्तनातून हा आदर्श मुलांसमोर ठेवा. आजारी माणसाला सदैव मदत करा. दुसऱ्याची अडचण ओळखून त्याला साहाय्यभूत व्हा. हे निष्कामपणे केलंत तर ती सेवा माझ्यापर्यंत येईल. हा निष्काम कर्मयोग आहे. कुठलीही अपेक्षा न ठेवता केवळ कर्तव्यकर्म करूनही ह्या योगाच्या बलावर जीव परमस्थितीला पोहोचू शकतो. याउलट दुसऱ्यांना मनस्ताप देऊन केलेली साधना फलास येत नाही.

कर्मठ होऊ नका. प्रेमानं जग जिंका. सर्व दानांत समाधानाचं दान श्रेष्ठ असतं. अन्नदान करा."

अन्नानं आत्मा संतुष्ट होतो. हा जड देह अन्नावरच पोसला जात असल्यामुळे प्रत्येक प्राणिमात्राला अन्न हे मिळालंच पाहिजे - हा नित्यानंद स्वामींचा कटाक्ष होता. गणेशपुरी येथे आजही बालभोजनाच्या निमित्तानं अखंड, अव्याहत अन्नदान होत असतं. या अन्नदानानं अनेक प्रकारचे दोष नाहीसे होत असतात. हे पक्कं लक्षात ठेवून, आपल्या ऐपतीप्रमाणे, वेळोवेळी अन्नदान करत रहावं. पोट भरून तृप्त झालेल्या आत्म्यांना समाधान देऊन त्यांचे आशीर्वाद मिळवावेत.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

या शाळिग्राम स्वामींचं समाधिमंदिर गणेशपुरीला आहे आणि चेंबूरजवळ 'माहुलगाव' येथे त्यांचा आश्रम आहे. कुर्ला (पू.) स्टेशनबाहेरून माहुलगावापर्यंत बस जाते. माहुल आश्रम फोन नं. -९१ २२ २५५४०८६२. आश्रमाची वेळ: सकाळी ८ ते १२, संध्याकाळी ४ ते ८

आपलं जीवन सुसह्य होण्यासाठी, तसंच आध्यात्मिक उन्नत अवस्थेत येणारे अडथळे दूर होण्यासाठी या खालील ठराविक दिवशी नित्यानंद-दर्शन घेणाऱ्यांना शाळिग्राम स्वामींचे पूर्ण आशीर्वाद आहेत.

१) **नारळी पौर्णिमा** - या दिवशी नित्यानंदांच्या ठायी पंचमहाभूतं आपणहून प्रगट होतात. ज्या पंचमहाभूतांनी ही सृष्टी व आपलं शरीर तयार झालं, ते सुरळीत चालण्यासाठी, शरीरस्वास्थ्य व मन:स्वास्थ्य निकोप रहाण्यासाठी या दिवसाच्या दर्शनाची आवश्यकता आहे.

२) **भाद्रपद महिन्यातील शुध्द अष्टमी** - या अष्टमीला 'योगाष्टमी' म्हणतात. या दिवशी साऱ्या योगांचं आकर्षण करून भगवान नित्यानंद बसलेले असतात. ह्या दिवसाच्या दर्शनानं अध्यात्म मार्गात येणाऱ्या अडचणी दूर होऊन साधक मार्गस्थ होतो. म्हणून साधकांना या दिवसाच्या दर्शनाची नितांत गरज आहे.

३) **नरक चतुर्दशी** - जीवन जगण्यासाठी संसारसाधनं तसंच पैसा यांची गरज असते. या दिवशी भगवान नित्यानंदांचं दर्शन घेणाऱ्यांना या गोष्टी सहज सुरळीत साध्य होतील. संसारी लोकांनी सुबत्ता व भरभराट यासाठी नित्यानंदांचं दर्शन जरूर घ्यावं.

४) **३० नोव्हेंबर** - माहुल येथे या दिवशी नित्यानंद - जयंती साजरी होते. या दिवशी नित्यानंदांची अव्यक्त अशी जी शक्ती आहे त्या शक्तीनं, पूर्ण वैभवानं संपूर्ण दिवस नित्यानंद स्वामी प्रगट रूपात असतात. ते प्रेमळ, अमृत दृष्टीनं सर्व भक्तांना पहातात, त्यांच्यावर कृपा करतात. हा दिवस सर्वश्रेष्ठ आहे. कारण या दिवशी नित्यानंद अत्यंत प्रमुदित असतात. ते शाळिग्राम-भक्तांवर कृपेचा वर्षाव करतात.

ह्या चार दिवशी नित्यानंदांचं दर्शन घेणाऱ्यांना शाळिग्राम स्वामींचे पूर्ण आशीर्वाद आहेत. असं त्यांनी स्वत:च सांगितलं आहे. सर्व साधकांनी याचा अवश्य लाभ घ्यावा.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गीतेतील तत्त्वांचं तंतोतंत आचरण करून, नराचा नारायण झालेल्या शाळिग्राम स्वामींनी लोक कल्याणासाठी आपलं संपूर्ण जीवन व्यतीत करून १९६१ साली गणेशपुरी येथे भगवान नित्यानंदांच्या चरणांजवळ समाधी घेतली. नित्यानंदांच्या आज्ञेनं यापुढे पाचशे वर्षं ते आपलं जन-उध्दाराचं कार्य चालूच ठेवणार आहेत.

अशा श्री दयानंद शाळिग्राम स्वामींविषयी बाबाजी गौरवोद्‌गार काढतात,

'वो मेरा लाडला बेटा है'.

२५. ।। नाना देही देव एक विराजे ।।

या शाळिग्राम स्वामींनी माझी दृष्टी आणि माझं अंतःकरण विशाल केलं. बाबाजी, शाळिग्राम स्वामी व केशव या सर्वांच्यात मला एकच तत्त्व व एकच तेज दिसत असतं. या सर्वांप्रती माझी निष्ठा, श्रध्दा, भक्ती ही सारखीच आहे. खरं सांगायचं तर 'स्वामी दिसती वेगळाले । परि ते अंतरी मिळाले ।'

अशा प्रकारे त्यांना पाहिल्यामुळे, जाणल्यामुळे की काय **सर्व महात्म्यांविषयी माझ्या मनात समभाव आहे.** श्री दयानंद शाळिग्राम स्वामींनी माझं अंतःकरणच 'विशुध्द' केलं आहे. भगवान नित्यानंदांनी माझ्या हातून 'शाळिग्राम गाथांबुज' लिहून घेतलं, त्यावेळी ते म्हणतात -

'शाळिग्रामाप्रती तुज अति प्रीति । म्हणोनि ही गाथा दिली तुज हाती ।
तेणे नित्यानंद प्रसन्न मी चित्ती । देखोनिया तव विशुध्द ती वृत्ती ।'

विज्ञानाच्या पलीकडे असणारा अनमोल, गूढ, नित्य, सत्य, शाश्वत ज्ञानाचा खजिना गाथांबुजाच्या निमित्तानं भगवान नित्यानंदांनी माझ्यासमोर प्रगट केला तेव्हा काही ज्ञानकण मी वेचले. त्यावेळी माझ्या लक्षात आलं की **माझ्या ज्ञानापेक्षा माझ्या अज्ञानाचं पारडं किती जड आहे.** हे समजताच सदा, सर्वकाळ सर्वव्यापक परमात्म्याचं माझ्या अंतर्मनातील स्वरूप अधिक भव्य, दिव्य झालं.

हे ज्यांनी केलं त्या नित्यानंदांविषयी थोडंसं सांगून मी पुढे जाणार आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

२६. ।। सर्व काही पूर्वनियोजित ।।

आपल्याला वाटतं की काही घटना या योगायोगानं घडत असतात. पण नाही. ''प्रत्येक घटना ही पूर्वनियोजितच असते,'' असं बाबाजी म्हणतात.

ते म्हणतात की, 'एका विशिष्ट अवस्थेला पोहोचलेले आम्ही सर्वजण एकच आहोत. या ईशकार्यात आम्ही सर्वजण अत्यंत प्रेमानं भाग घेतो. एखाद्या जीवाची उन्नत अवस्था होते, प्रगती होते, तेव्हा आम्हाला खूप आनंद होतो. आम्ही सर्वजण आपापली कामं वाटून घेतो.

ठराविक जागी, ठराविक ठिकाणी, काही विशिष्ट व्यक्तींच्या द्वारा त्या ईशशक्तीचं कार्य अखंड चालू असतं. त्यामुळे आम्हा सर्वांमध्ये सुसंवाद असतो. काही विशिष्ट वेळी, आम्ही आमच्या दिव्य शरीरानं वा जड देहानं प्रगट होऊन पुढील योजनांची आखणी करतो.' असं बाबाजींनी मला एकदा सांगितलं होतं.

आपल्या या पुस्तकातील 'अमर गुरुदेव बाबाजी' या भागात राम गोपालनंही हा स्वानुभव स्वत: घेतलेला होता. त्याला पुष्टी मिळाली ती केशवच्या सांगण्यानं.

गणेशपुरीचे श्री नित्यानंद स्वामी क्वचित प्रसंगी उत्तररात्री गरम पाण्याच्या भीमकुंडावर जाऊन बसत. त्यावेळी काही महात्मे आपल्या दिव्य शरीरानं तिथे प्रगट होत. काही वेळा विचारविनिमय करून, बोलून नंतर निघून जात. याच महात्म्यांच्या कृपेनं क्वचित प्रसंगी एखाद्याला त्यांच्या दिव्य दर्शनाचा लाभ होई.

ज्यांना असा लाभ झाला होता त्या भाग्यवंतांत केशव होता. तसंच आणखीही काही लोकांनी अशाच स्वरूपाचा गणेशपुरीस अनुभव घेतला होता. त्यांनी ते केशवजवळ सांगितलं होतं.

या भगवान नित्यानंदांविषयी थोडी माहिती सांगून मी पुढे जाणार आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

२७. ।। भगवान नित्यानंद ।।

अखंड स्वानंदात मग्न असणारे जे महात्मे आहेत ते सामान्य जनांपासून दूर असतात. ते केवळ परमात्म्याच्या इच्छेनं अथवा भक्ताच्या प्रेमाखातर तुमच्या आमच्यात येऊन जगदोध्दाराचं कार्य करतात.

भवतापानं पोळलेल्या, भवरोगानं ग्रासलेल्या, भवदु:खानं कष्टी झालेल्या अज्ञ, जड जीवांचा कळवळा येऊन एका निजभक्ताच्या शाळिग्राम स्वामींच्या विनंतीवरून 'जो स्वयमेव तोच झाला' असा एक महात्मा आपल्या परम भाग्यानं भूतलावर अवतरला तेच हे गणेशपुरीचे नित्यानंद महाराज.

अखंड स्वानंदात मग्न असणारे नित्यानंद सदा भ्रमंतीच करत. त्यांची आपोआप घडणारी प्रत्येक कृती जीवाच्या कल्याणासाठीच असायची. त्यांच्या अद्भुत लीलांनी केरळवासी अचंबित होत. त्यांच्या सान्निध्यात, भक्तीत रंगून जात. त्यांच्या जीवाला भगवान नित्यानंदांची ओढ लागे आणि भगवान नित्यानंद दुसरीकडे निघून जात. पूर्वायुष्यात भ्रमंती केल्यावर मात्र त्यांनी स्थिर होण्याचं ठरवलं.

पुरातन काळी जिथे देवदेवता, ऋषिमुनी यांच्यासारख्या महात्म्यांनी वास केला होता अशा वज्रेश्वरी क्षेत्राच्या परिसरात, भीमेश्वराच्या सान्निध्यात भगवान नित्यानंदांचे चरणकमल स्थिरावले आणि ती पवित्र भूमी अधिक पावन झाली. लोकहिताचं व्रत घेतलेल्या नित्यानंदांनी आपलं संपूर्ण उर्वरित जीवन जंगलाचं मंगल करण्यात घालवलं. आरोग्यधाम, रस्ते, शाळा, धर्मशाळा, कुंडं, देवळं बांधून लोकांची सोय केली. ''भीमकुंडात स्नान करून दर्शनाला या आणि प्रसाद घ्या'' असं भगवान नित्यानंद लोकांना सांगत असत.

प्रत्येक प्राणिमात्राला १२ वाजता अन्न मिळालं पाहिजे असा नित्यानंद स्वामींचा कटाक्ष होता. पोट भरल्याशिवाय कोणी काही करू शकत नाही हे जाणून त्यांनी अन्नदानाचं पवित्र कार्य सुरू केलं. व्याधि-उपाधी, भवरोगासारखे अनेक दोष अन्नदानानं जातात. अन्नदानासारख्या महापुण्यानं जीवाला समाधान मिळतं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हे जाणून बालभोजन, साधुभोजन यांसारख्या अनेक सोयी त्यांनी केल्या.

लहान मुलांची अत्यंत आवड असणाऱ्या नित्यानंदांनी बालभोजन सुरू केलं व बालबुध्दी सुसंस्कारित केली. भक्तमंडळी त्यांना रामकृष्ण, दत्त, अनंत, गुरुदेव, बाबा, महाराज म्हणत असत. ज्याचा जसा भाव असे त्याला ते तसेच दिसत. त्यांच्या नुसत्या दर्शनानं लोकांची दु:खं दूर होत. त्यांच्या वात्सल्यपूर्ण दृष्टीनं जीवाला शांती, समाधान मिळत असे. काहीही न बोलता ते भक्तांच्या शंकांचं निरसन करत असत. भक्तांना अडीअडचणीतून मुक्त करून ते त्यांना उन्नत करत. त्यांना श्रेयसाप्रत नेत आणि भक्तिरसात रंगवून टाकत.

अप्राप्त असे भगवान नित्यानंद आपल्या परम भाग्यानं आणि अनंत जन्मांच्या पुण्याईनं आपल्याला प्राप्त झाले आहेत. त्यांचं नामच आपल्याला तारक आहे. **'हरे नित्यानंद पावन नित्यानंद' या महामंत्राचा जप केल्यास जीव नि:संशय दु:खमुक्त होतो.** गणेशपुरी येथील नित्यानंदांचं समाधिस्थान हे सुखशांतीचं घर असून जीवाचं माहेर आहे. नित्यानंदांच्या निजध्यासानं, त्यांच्या कृपाप्रसादानं जिवाशिवाची भेट होऊन जीवाला परमोच्च स्थिती प्राप्त होते. तुमच्या आमच्यात वावरणाऱ्या नित्यानंदांना समजणं कठीण, समजून ओळखणं महाकठीण आणि ओळखून आकलन होणं कर्मकठीण. मनाच्या आणि बुध्दीच्या समजुतीपलीकडे असणाऱ्या अगाध आणि गहन अशा भगवान नित्यानंदांना शाळिग्राम स्वामी पूर्ण जाणत होते. प. पू. शाळिग्राम स्वामींच्या परम कृपेनं स्फुरणरूप जो प्रसाद मिळाला त्यातूनच **'नित्यानंद स्तवनांबुज'** ही पोथी सर्व भक्तांसाठी तयार झाली.

ह्या परमपूज्य शाळिग्रामांच्याच आशीर्वादानं मला नित्यानंदांचं दर्शन झालं.

१ ऑक्टोबर १९८५ या दिवशी रात्री उशीरा झोपून सुध्दा मला पहाटेच जाग आली. भिंतीला उशी लावून तिला टेकून मी स्वस्थ बसले होते. हृदयात 'नित्यानंद' हा जप चालू होता. अगदी सहजपणे. हळूहळू त्या नामाचा प्रकाश माझ्या अंतरात पडू लागला. थोड्या वेळानं तो बाहेर पडून संपूर्ण खोलीभर लख्ख प्रकाश पसरला. ज्योतीच्या पिवळसर रंगासारखा. नंतर आजूबाजूचं सर्वच नाहीसं होऊन हाच प्रकाश अधिक प्रखरतेनं दूरवर पसरला. त्या प्रकाशातच असंख्य हिऱ्यांचं तेज

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

एकवटल्यासारखा लखलखीत पांढरा शुभ्र प्रकाश दिसत होता. त्या प्रकाशाचा झोत माझ्यासमोर चक्राकार गतीनं जोरात फिरत होता, सुदर्शन चक्राप्रमाणे.

ते सर्व तेज एकवटून मला त्यात नित्यानंद दिसू लागले. अगदी सगुण, साकार असं ते भव्य, दिव्य रूप दूरवर प्रगट झालेलं मी पाहिलं. एका नाजूक प्रकाशरेखेनं ते व मी जोडले गेलो होतो. नित्यानंद आपल्या स्वानंदात मग्न होते. अत्यंत प्रसन्न चित्तानं शाळिग्राम स्वामी नित्यानंदपूजन करत होते.

तन-मन-ध्यान 'नित्यानंदमय' करून अतिशय नम्रतेनं शाळिग्राम स्वामींनी साष्टांग नमस्कार घातला. अशी ही देव-भक्तांची जोडी माझ्या हृदयात चिरकाल प्रकाशू दे. माझे सर्व विषय, विकार त्या प्रकाशात विरून गेले. त्यावेळी मधुररस जिव्हेवर पाझरताना जाणवत होता. त्याच्या आगळ्यावेगळ्या स्वादात तृप्तता होती.

एकाएकी नित्यानंद उठून माझ्याजवळ आले. त्यांनी माझा हात धरून मला दोन-तीन ठिकाणं दाखवून गणेशपुरी येथील नित्यानंद-समाधिमंदिराच्या मागच्या बाजूला आणलं. तिथं मागच्या बाजूनं आम्ही तळघरात गेलो. एखाद्या देवतेचं यंत्र असावं तशी तिथं सुरेख रांगोळी काढली होती. बाजूला पूजा केलेली शंकराची काळीभोर पिंडी होती. आपल्यातच मश्गुल झाल्याप्रमाणे मी तिथं बराच वेळ बसले होते.

शाळिग्राम व नित्यानंद यांच्या दर्शनाचा साक्षात अनुभव अनुभवताना काय होत होतं ते कसं सांगू ? एवढं सांगता येईल की शाळिग्राम व नित्यानंदांच्या अमृत दृष्टीच्या संरक्षक कवचात मी नित्य तृप्त आहे.

प. पू. नित्यानंदांचा कृपाप्रसाद आपणा सर्वांना मिळावा हीच भगवान नित्यानंदांच्या पदकमली आर्त प्रार्थना आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

२८. ।। प्रसन्नतेचा प्रसाद लुटावा ।।

कालचीच म्हणजे ८ नोव्हेंबर २००१ या दिवशीची ही घटना. रात्री झोपच येत नव्हती. बराच वेळ या कुशीवरून त्या कुशीवर चाललं होतं. तब्येतही साधारणच होती. दोन दिवस बरं नव्हतं. अशक्तपणामुळे डोळे मिटले की जरा बरं वाटायचं म्हणून मी अलगद डोळे मिटून घेतले. दोनच मिनिटांत माझ्यासमोर एक दृश्य साकार झालं.

संध्याकाळची वेळ आहे आणि अंगणात उभी असलेली मी माझ्यातच दंग आहे. माझं कुठेच लक्ष नव्हतं. वातावरण जरा उदास वाटत असलं तरी अंतरात प्रसन्नता होती. इतक्यात -

इतक्यात माझ्यासमोर दोन्ही बाजूनं साधारण १०-१० फुटांवर दोन नारळाची झाडं उन्मळून पडली. दचकून मी घाबरले. वादळ नाहीच, पण वारा सुध्दा वहात नव्हता. तरीही नारळ लगडलेली दोन पूर्ण उंचीची नारळाची झाडं अचानक मुळासकट जमिनीवर आडवी पडलेली पाहून मी दोन पावलं मागे सरकले.

एवढ्यात बाबाजींचा तो चिरपरिचित प्रकाश माझ्या सभोवार पसरला. त्या प्रकाशानं मला चारी बाजूंनी लपेटून टाकलं. तोच प्रकाश माझ्या दोन्ही हातांवर जरासाच स्थिरावला आणि मला काही समजण्यापूर्वीच, माझ्याही नकळत मी पुढे झाले. दोन हातांनी ती दोन नारळाची झाडं अगदी सहजपणे मी पूर्ववत उभी केली. त्या झाडांच्या खोडांवरून मायेनं हात फिरवताना त्या वृक्षांकडे मी प्रेमळ नजरेनं पहात होते. हातांच्या ओंजळीनं त्यांच्या बुंध्यांशी प्रेमोदक घालत असतानाच ते दोन नारळाचे वृक्ष डोलू लागले. जणू काही भगवत्‌नामाच्या तालावर ते आनंदानं तल्लीन होऊन डोलत आहेत असं मला वाटत असताना बाबाजींचे मृदू, मुलायम शब्द कानावर आले.

''सांसारिक तापानं उध्वस्त झालेली व्यक्ती जर तुझ्याकडे आली, तर तुझ्या अंतरातील भगवत्‌नामाचं तिच्या हृदयात प्रेमानं बीजारापण कर. प्रसन्नतेचा प्रसाद लुटून तिला योग्य मार्ग दाखव.''

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बाबाजींच्या बोलण्यातला अर्थ समजला. पण माझ्यातील असमर्थपणाची पूर्ण जाणीव मला असल्यामुळे संभ्रमावस्थेतच माझ्या मुखातून 'बाबाजीऽऽ' अशी एकच हाक आली.

माझी अवस्था जाणून बाबाजी हळूच हसले आणि अत्यंत मंजुळ, गोड स्वरात मला आधार देत पुढे सांगू लागले, ''काळजी करू नकोस. तुला कुठेही जायची गरज नाही. सर्व काही आपोआप होईल.'' असं म्हणून तेजस्वी ज्योत असलेला एक दीप त्यांनी माझ्या हातात दिला आणि म्हणाले, 'ज्ञान आणि भक्ती झाली. आता प्रत्यक्ष कर्मयोग आचरायची वेळ आली आहे. तिन्हींचा संगम झाल्याशिवाय पूर्णत्व प्राप्त होत नाही. याच दीपाच्या प्रकाशानं परमात्म्यापर्यंत पाहोचण्याचा राजमार्ग दाखवून आता निष्काम कर्मयोग तुला आचरायचा आहे.'

बाबाजींच्या अस्तित्वाच्या प्रकाशात माझ्यावर प्रेमाचा वर्षाव होत होता. तो चिरपरिचित प्रकाश मला अंतर्बाह्य व्यापून उरला आणि माझ्यावर असलेल्या बाबाजींच्या उदंड प्रेमानं मला समर्थ बनवलं. त्या सामर्थ्यशाली युगपुरुष बाबाजींच्या चरणी माझे कोटी कोटी प्रणाम !

२९. ।। पुस्तक लिहिण्यास कारण ।।

अगदी मनापासून सांगते की काहीतरी लिहावं म्हणून मी कधी लिहीत नाही. उत्तम लेखक होणं हे माझं ध्येय नाही. लिखाणातून कीर्ती, पैसा, प्रसिध्दी मिळावी असा अंतरात पुसटसा विचारही नाही. या कुठल्याही हेतूशिवाय मी लिहायला घेतलं त्याला कारण एकच - बाबाजींनी केलेली स्पष्ट आज्ञा.

बाबाजींचीच आज्ञा शिरसावंद्य मानून मी अत्यंत अवघड असं हे लिखाण करायचं ठरवलं. अवघड अशासाठी की प्रसिध्दीपराङ्मुख असलेले हे बाबाजी प्रगटपणे कुठे वावरलेले नसताना, कोणालाही त्यांची विशेष माहिती नसताना,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आजपर्यंत एकांतात अठराशे पेक्षा जास्त वर्षं वावरलेल्या बाबाजींना मी ओळखू कशी, जाणू कशी आणि त्यांच्याबद्दल लिहू तरी काय ? तरीही हे अवघड शिवधनुष्य पेलण्याचं काम मी सुरू केलं. याचं कारण बाबाजींवर असलेली पूर्ण श्रध्दा. त्यांची इच्छा म्हणजे हे होणारच अशी खात्री. तसंच, हे महात्मे एखादं काम जेव्हा एखाद्यावर सोपवतात, तेव्हा त्यासाठी आवश्यक असलेली सर्व साधनं आणि सामर्थ्यही तेच देतात. आतापर्यंतच्या अनुभवानं असा दृढ विश्वास निर्माण झाला आहे. त्याची लगेचच प्रचीती आली ती म्हणजे मागितल्याशिवाय मला मिळालेली माहिती.

अध्यात्मातला माझा भाऊ डॉ. सागर यानं 'पुराणपुरुष योगिराज शामाचरण लाहिरी' हे हिंदी पुस्तक मला आणून दिलं. हे दुर्मिळ पुस्तक तो कोणालाही देत नाही. याच सुमारास नाशिकची श्रीमती सीमा देशमुख हिनं मला अत्यंत प्रेमानं 'योगी कथामृत' हे पुस्तक सप्रेम भेट दिलं. माझे पती श्री. शशी कुंटे यांचे मित्र श्री. अरविंद निंबाळकर यांनीही मला 'विश्वगांधार' हे पुस्तक आपणहून आणून दिलं. माझा मोठा भाऊ श्री. अनिल मोडक याचा सहकारी श्री. दीपक आंचन यानंही मला बाबाजी व त्यांचे शिष्य यांचे फोटो व काही माहिती पाठवली.

अतिशय महत्त्वाचं म्हणजे एक दिवस 'स्नेहा' असे स्पष्ट शब्द कानावर आले. लिहीत असल्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करून मी पुढे लिहीत राहिले. 'स्नेहा' दुसऱ्यांदा कानावर शब्द आले. क्षणभर थांबून मी विचार केला. बाबाजींचा संकेत मला समजला नाही. पण स्नेहा धारपची व माझी येऊरला केवळ पाच-दहा मिनिटं ओझरती भेट झाली होती.

योगायोगानं माझ्याजवळ तिचा नंबर होता. नोकरी करत असिल्यामुळे ती फोनवर भेटणार नाही याची खात्री होती. तरीही नंबर फिरवला. तो स्नेहाच्या सासऱ्यांनी ती. दादा धारप यांनी घेतला. खरं म्हणजे जुजबी बोलून फोन बंद झाला असता. परंतु माझं 'अनुभूतिमाला' हे पुस्तक त्यांनी वाचल्यामुळे त्यांच्याशी बोलणं पुढं चालू राहिलं. त्यांनी आस्थेनं माझी विचारपूस केली. तेव्हा सहजपणे मी बाबाजींवर पुस्तक लिहीत असल्याचं बोलले. खरं तर अशा गोष्टी बोलणं माझा स्वभावच नाही.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्यावर ते म्हणाले, 'बाबाजी नावाचं एक पुस्तक माझ्याकडे आहे. तुम्हाला हवं असेल, तर मी ते देईन. कोणाला तरी पाठवा.' मी 'बरं' म्हणाले. रात्री सौ. स्नेहाला फोन केला. तिनं मलाच घरी यायचा आग्रह केला. हळुवार गोड बोलणाऱ्या या स्नेहाचा आवाज व स्वभाव खरंच स्नेहपूर्ण आहे.

दुसऱ्या दिवशी हे व मी स्नेहाच्या घरी गेलो. अचानक आलेल्या मुसळधार पावसानं थोडीशी त्रेधातिरपीट उडाली. आम्हाला त्रास नको, शोधाशोध करायला लागू नये म्हणून ही स्नेहा दहा मिनिटं पावसात उभी राहून आमची वाट बघत होती. आम्ही तिच्या घरी गेलो.

पूर्णपणे अनोळखी असलेली ही मंडळी पाच मिनिटातच मला आपली वाटायला लागली. अत्यंत प्रेमानं व आपुलकीनं त्यांनी आमचं स्वागत केलं. संकष्टी चतुर्थी असल्यामुळे माझा उपास असला तर याचाही विचार करून सौ. स्नेहानं छानशी चविष्ट खिचडी केली होती. तिचा स्वाद घेत गप्पा झाल्या. बाबाजींचं पुस्तक आणि लाहिरी महाशयांच्या डायरीवरून उतरवून घेतलेली, अनेक वर्षं जपलेली (दादांना एका सत्पुरुषानं दिलेली) एक डायरी ती. दादांनी मला उपयोगी पडेल म्हणून प्रेमानं दिली. सौ. स्नेहाच्या सासुबाईंनीही त्यांनी लिहिलेली दोन पुस्तकं मला सप्रेम भेट दिली.

सौ.स्नेहा व त्यांचे पती श्री. सतीश धारप आम्हाला सोडायला दादरहून ठाण्याला आले. आपुलकी व सादर प्रेमानं आणि मधला दुवा बाबाजी असल्यामुळे ते सर्वच जण मला खूप जवळचे वाटले. नक्कीच आमचा ऋणानुबंध आहे.

काही अनुकूल व काही प्रतिकूल परिस्थितीत सुध्दा अत्यंत आनंदानी राहणाऱ्या या चार पिढ्या आणि त्यातही महत्त्वाचं म्हणजे त्यांच्यात असलेला सुसंवाद पाहून खूप आनंद झाला.

माझं लिखाण माझ्या अनुभूतींवर आधारित असतं. मग हे सर्व बाबाजींनी का केलं असा विचार करता, त्यांनी दिलेल्या पुस्तकात बाबाजींच्या बालपणाची व त्यांच्या गुरूंची माहिती मिळाली. ती मला समजावी अशी बाबाजींचीच इच्छा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

असणार. आता पुस्तक रूपानं प्रगटपणे कार्य करण्याचा त्यांचा मानस असावा असं वाटतं.

इंग्रजीचं ज्ञान यथातथाच असणाऱ्या मला 'बाबाजी' हे इंग्रजी भाषेतील पुस्तक समजणं जरा काय खूपच अवघड. यावेळी ठाण्यातील डॉ. श्रीराम भातखंडे यांनी मला मोलाची मदत केली.

श्री. धारप व त्यांचं कुटुंबीय आणि सौ. व श्री. भातखंडे यांच्यावर बाबाजींची कृपा आहेच. त्या सर्वांना त्यांच्या कृपेची प्रचीती यावी, त्याचा अनुभव यावा यासाठी महायोगावतारी बाबाजींच्या चरणी विनम्र प्रार्थना करून आपण पुढे जाऊ या.

३०. ।। पुस्तकाचं महत्त्व ।।

प्राचीन काळी सर्व प्रकारच्या विद्या एकाकडून दुसऱ्याला म्हणजे गुरूंकडून शिष्यांना अशा तऱ्हेनं सर्व विद्या जतन केल्या जात व पिढ्यानपिढ्या टिकून रहात. परंतु काही वेळा योग्य व्यक्ती न भेटल्यास या विद्या खंडित होण्याचा संभव असतो.

धर्माची हानी होते तेव्हा या विद्यांचा लय होतो. त्या लुप्त होतात. अशा वेळी महामानवाच्या रूपात युगपुरुष जन्म घेतो व परत धर्माची स्थापना करतो.

अशाच प्रकारे, काही कारणानं लुप्त झालेला 'अक्षय योग' बाबाजींनी शोधून काढला. त्यात योग्य ते फेरबदल करून तो नियमबध्द, सुटसुटीत करून प्राणायामाच्या चार प्रकारांत त्या योगविद्येची त्यांनी आखणी केली आणि त्याला नाव दिलं 'क्रियायोग'.

आद्य शंकराचार्य - (७८८-८२०), कबीर - (१४०७-१५१८), लाहिरी महाशय - (१८२८-१८९५), स्वामी युक्तेश्वरगिरी - (१८५५-१९३६), परमहंस योगानंद - (१८९३-१९५२), नीळकंठन् - (१९०१ -ते पुढे.) अशा योगी पुरुषांना व अन्य अनेकांना क्रियायोगाची दीक्षा मिळून पुढे त्याचा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रसार झाला.

पुढील काळात ही विद्या लुप्त होऊ नये, अनेकांना त्याचं मार्गदर्शन सहजसुलभ होऊन सर्वांना त्याचा फायदा व्हावा, या सर्व गोष्टी पुस्तक रूपानं पिढ्यानपिढ्या पुढे जाव्यात याच हेतूनं बाबाजींनी पुस्तकं लिहून घेतली आहेत.

योगिराज शामाचरण लाहिरी महाशय स्वत: डायऱ्या लिहून ठेवत. त्यांचे अनुभव त्यांनी आपल्या २६ वर्षांच्या २६ डायऱ्यांत लिहून ठेवले. ते पुढे 'पुराणपुरुष योगिराज शामाचरण लाहिरी' या पुस्तकाच्या रूपानं प्रकाशित झाले.

तसंच, बाबाजींनी स्वामी युक्तेश्वरजींनाही बायबल व सनातन हिंदू धर्माचा तुलनात्मक अभ्यास करून पुस्तक लिहायला सांगितलं. त्याप्रमाणे स्वामी युक्तेश्वरगिरी यांनी 'The Holi Science' (पवित्र धर्मशास्त्र) हे पुस्तक लिहिलंही.

पाश्चिमात्य देशात योगविद्येचा प्रसार करताना या पुस्तकांचा परमहंस योगानंदांना खूप उपयोग झाला. पुढे या योगानंदांनी 'Autobiography of a Yogi' (योगीकथामृत) हे पुस्तक लिहून त्यांचे स्वानुभव लिहून ठेवले. त्याचं मार्गदर्शन आज अनेकांना होत आहे. त्याचा फायदा अनेक साधक घेत आहेत.

'विश्वगांधार' या पुस्तकात शिवेंद्र कंदाहारींनी बाबाजींचेच विचार पुस्तक रूपानं प्रसिध्द केले आहेत. मलाही बाबाजींनी हे पुस्तक लिहायची आज्ञा केली. त्या अर्थी पुस्तक रूपानं 'बाबाजी', 'बाबाजींचा विचार', 'बाबाजींची शिकवण' अनेक लोकांपर्यंत जावी अशीच त्यांची इच्छा असणार. अनेकांनी या पुस्तकांच्या आधारे आपली उन्नत अवस्था करून घ्यावी असंच त्यांना वाटत असणार.

या विषयी मला बाबाजींनी फारच छान माहिती दिली.

संशोधक - संशोधनानं माहिती शोधून पुस्तक रूपानं संग्रहीत करतो.

पंडित - संग्रहीत माहितीच्या अभ्यासानं लोकांपुढे माहिती कथन करतो.

विद्वान - शाब्दिक सत्यज्ञान प्रगट करतो. पण त्याला अनुभूती नसते. तो विद्यादानाचं पवित्र कार्य करतो.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तसंच गुरूंवर जर शिष्यानं पुस्तक लिहिलं तर ते मार्गदर्शक होतं. परंतु, प्रत्यक्ष योग्यानं आपल्या अनुभूतींच्या आधारे लिहिलेलं पुस्तक वाचकांना आध्यात्मिक सामर्थ्य देऊन मार्गस्थ करतं. हे अनुभूतींचं सामर्थ्य असतं. त्यामुळे अनुभव घेणाऱ्यानं स्वत: लिहिण्यास फार महत्त्व आहे. ज्यामुळे प्रत्यक्ष ज्योतीनं ज्योत प्रकाशित होते.

हे सर्व खरंच असलं तरी प्रत्यक्ष प्रयत्न हा ज्याचा त्यालाच कसून करावा लागतो हं ! ग्रंथांतून, पुस्तकांतून भरपूर तत्त्वज्ञान लिहिलेलं असतं. त्यांचा अभ्यास करून सामान्य लोक पंडित होतात. पण हे तत्त्वज्ञान आचरणात आणल्यास जीवाचा शिवच होतो हं !

सर्व धर्मांच्या १०० व्या अधिवेशनाच्या वेळी २०५३ साली बाबाजी जाहीररीत्या प्रगट होणार आहेत. ('बाबाजी' पान ७७ - लेखक श्री. मार्शल गोविंदन् या पुस्तकात ही माहिती आहे.) त्याच्या पूर्वतयारीला या पुस्तकाद्वारे हातभार लागेल असं वाटतं.

कर्ते करविते बाबाजीच आहेत. सद्भावनेनं आपलं काम करून आपण आनंदानी नामात असावं. एवढंच मी करत असते.

३१. ।। कौस्तुभ एवढेच वाचकही प्रिय ।।

'अनुभूतिमाला' हे माझ्या आध्यात्मिक अनुभूतींवर लिहिलेलं पुस्तक आणि 'तुला मंजूर ते मला मंजूर' याप्रमाणे वागून दयानंद शाळिग्रामांना आपलंसं करणाऱ्या माझ्या केशववर लिहिलेलं 'ॐ केशवाय नम:' हे पुस्तक - ही दोन्ही पुस्तकं माझ्याकडून कौस्तुभसाठीच लिहिली गेली. त्याच्या आधिभौतिक व आध्यात्मिक प्रगतीनं त्याच्यावर खूष होऊन त्याला मार्गदर्शक होतील अशी साधी सोपी पुस्तकं माझ्या हातून लिहिली गेली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

या पुस्तकात आपल्या रोजच्या जीवनात येणाऱ्या अडीअडचणींना तोंड देऊन जीवनात यशस्वी कसं व्हावं हेच सांगितलं आहे. तसंच कुठल्याही अवस्थेत असलेल्या साधकानं आपली पारमार्थिक उन्नत अवस्था कशी करून घ्यावी याचंही मार्गर्शन आहे.

तसंच आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक अशा त्रिविध तापातून पार होण्यासाठी 'शाळिग्राम गाथांबुज' व 'नित्यानंद स्तवनांबुज' या दोन पोथ्या माझ्याकडून लिहिल्या गेल्या आहेत. त्या सर्वच जणांसाठी फलदायी, यशदायी आहेत. ज्ञान, भक्ती व कर्माचरणानं आपण खूप उच्च अवस्थेला पोहोचू शकतो. हे सर्व या पोथ्यांमधून सहज प्राप्त होईल असा या पोथ्यांना महात्म्यांचा वरदहस्त प्राप्त होऊन त्या सिध्दच झाल्या आहेत.

सहज सोपी असणारी ही चार पुस्तकं सर्वांसाठीही आणि आध्यात्मिक अवस्थेत साधकाला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणारी आहेत.

मला कित्येकांचे फोन आले. ते म्हणतात, ''कौस्तुभच्या जागी आम्ही आमचंच नाव घालून पुस्तकं वाचतो, तेव्हा असं वाटतं की तुम्ही समोर बसून सर्व समजावून सांगत बोलत आहात.

वाचकहो, खरं सांगू ? माझ्या कौस्तुभएवढेच तुम्हीही मला प्रिय आहात. तुम्ही सर्वजण माझेच आहात. ही पुस्तकं आपल्यासाठी, हो, अगदी माझ्यासाठी सुध्दा आहेत. वेळोवेळी त्यांचा मलाही उपयोग होतो.

परंतु, हे बाबाजींवर लिहिलेलं पुस्तक एका ठराविक अवस्थेपर्यंत पोहोचलेल्या साधकांसाठीच आहे. जीवाच्या अंतर्गत साधनेला मार्गदर्शक होईल असा या पुस्तकातील विषय अनेकांना समजायला जरा अवघड आहे. तरीही ते पूर्ण वाचावं. आपल्याला समजो वा न समजो, भगवंत आपल्यावर कृपाप्रसादाचा वर्षाव अखंड करतच असतो.त्याकडे जरा डोळसपणे बघावं.

कौस्तुभ, या पुस्तकानं बाबाजींची तुला ओळख व्हावी अशी माझी इच्छा आहे. बाबाजी काय करतात, त्यांना काय आवडतं, त्यांची कृपा कशी संपादन

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

करावी, त्यांची शिकवण काय आहे वगैरे भाग आता आपण समजावून घेऊ या.

कौस्तुभ, खरंच सांगते अरे ! मी कोणी खूप मोठी नाही हं ! अगदी साधीसुधी चार जणींसारखीच तुझी आई सुध्दा एक सर्वसाधारण स्त्री आहे. पण महात्म्यांच्या आशीर्वादानं व आपल्या प्रयत्नानं एका निश्चित स्थळी आपण कसं पोहोचू शकतो हेच मला सांगायचं आहे.

भोवतालच्या प्रतिकूल परिस्थितीत सुध्दा खंबीरपणे उभं राहून, दु:खाला सामोरं जाऊन, आनंदानं स्वत: जगत, दुसऱ्यालाही आनंदानं जगायला कशी मदत करता येते - हे आता तुला मी समजावून सांगणार आहे.

यापुढील भाग लक्षपूर्वक वाच. आपल्या बाबाजींना प्रिय होण्यासाठी कसं असावं, त्यांना आपलंसं करण्यासाठी आचरण कसं असावं हे आता आपण पाहू या हं !

३२. ।। इच्छिताती देव स्वर्गीचे सकल मिळो एक वेळ नरदेह ।।

मला नेहमी प्रश्न पडत असे म्हणून एकदा धीर करून मी बाबाजींची प्रार्थना केली. इतक्या मोठ्या अफाट विश्वातील तुमचं कार्य चालतं तरी कसं ? कौस्तुभ, त्यावेळी त्यांनी जे सांगितलं त्याचा मथितार्थ असा -

ही संपूर्ण सृष्टी व सर्व प्राणिमात्र एका महाशक्तीच्या आधारे कार्यशील - गतिशील असतात. या कार्यात ती महाशक्ती प्रत्यक्ष भाग घेत नाही. परंतु, तिच्या अस्तित्वाशिवाय कार्य घडतच नाही. अत्यंत सुसूत्रतेनं, नियमबध्द काटेकोरपणे हे सृष्टिचक्र फिरत असतं. या शक्तीला जाणण्यासाठी मानव जन्माची आवश्यकता आहे. केवळ मनुष्य जन्मातच जिवाशिवाची भेट घडवून आणता येते. म्हणून, सर्व देवदेवता सुध्दा मनुष्य देह प्राप्त व्हावा अशी इच्छा करतात.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गीतेचं रहस्य जाणण्यासाठी देहाच्या आतच प्रवेश करायला हवा.

इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते - गीता १३.१

धर्म आणि कर्म या दोन्ही क्रिया आपल्या या देहरूपी क्षेत्राच्या आधारानेच करता येतात. या शरीराशिवाय धर्म आणि कर्म करणंच शक्य नाही. श्रीकृष्णानं स्वमुखानं सांगितलेली गीता भारताचा प्राण आहे. या गीतेत विज्ञानयोग व अध्यात्मयोग सांगितला आहे. गीतारहस्य जाणून, समजून मनुष्यजन्माचं सार्थक करता येतं.

गीता नुसती पाठ करून उपयोग नाही. गीतेतील गूढ अर्थ समजून घेऊन साधना करायची गरज आहे. कौस्तुभ, प. पू. शाळिग्राम स्वामींच्या आशीर्वादानं तुला हे अर्थ समजले आहेत याचा आम्हाला खूप आनंद आहे. हे बघ -

कौरव म्हणजे प्रवृत्ती आणि पांडव म्हणजे निवृत्ती. या दोघांत म्हणजे या दोन वृत्तींमध्ये अनंत काळापासून युध्द चालू असून ते आपल्या या देहातच अखंड चालू असतं.

आपला हा देह म्हणजे एक रथ आहे. देहात वास करणारा जीव म्हणजे अर्जुन. षड्रिपूंचे सहा घोडे रथाला जुंपलेले आहेत. हे केव्हाही उधळतील म्हणून त्यांचे लगाम श्रीकृष्णाच्या हातात देणं म्हणजेच सदसद्विवेकी मनाच्या - बुध्दीच्या आधारे त्यांना लगाम घालून मनावर विजय मिळवायचा आहे. हे मन आपल्या श्रध्दास्थानाच्या चरणी समर्पित करून जिवाशिवाचं ऐक्य गाठायचं आहे.

''निर्गुण निराकार असे जे अव्यक्त । सगुण साकार तेचि होय व्यक्त ।
नांदे जीवाठायी परमात्मा अंश । प्रत्यगात्मा म्हणती त्यास परब्रह्मवंश ।
अहंकारासवे खेळे तो जीवात्मा । अध्यात्म ते ओळख तू परमात्मा ।
जीवन विकासार्थ घडे जे कर्म । उन्नत करा जीव हाची गीताधर्म ।''

शाळिग्राम गाथांबुज २२

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

३३. ।। नम्रता ।।

एकदा लाहिरी महाशय एका कुंभमेळ्यास गेले असताना अनेक साधु बैराग्यांमध्ये फिरत होते. त्यावेळी त्यांना एक ढोंगी बैरागी दिसला. तिथेच त्या संन्याश्यापुढे गुडघे टेकून स्वत: बाबाजी त्याला नमस्कार करत असताना लाहिरी महाशयांनी पाहिलं. त्याबरोबर, 'गुरुजी, आपण इथे काय करत आहात ?' बाबाजींना त्यांनी आश्चर्यानं विचारलं.

त्यावर स्मितहास्य करत हळुवारपणे बाबाजी म्हणाले, 'मी या संन्याश्याचे पाय धुतोय. नंतर त्याची भांडीही घासणार आहे.' उच्च नीच असा भेदभाव करू नये असं ते आपल्या वर्तनातून लाहिरींना शिकवत होते. पुढे बाबाजी म्हणाले, ''सर्वात मोठा गुण म्हणजे 'नम्रता'. ज्ञानी व अज्ञानी अशा दोन्ही प्रकारच्या लोकांची सेवा करून हा गुण मी अंगी बाणवण्याचा प्रयत्न करत आहे. 'नम्रता' हा गुण परमेश्वराला अतिशय प्रिय आहे.'' म्हणूनच वारंवार बाबाजींचं एकच सांगणं आहे की नम्रता कधीही सोडू नये.

३४. ।। कृतज्ञता आणि मानवता ।।

'आत्म्याचं परमात्मा होणं' हेच ध्येय ठेवून त्याप्रमाणे कसून प्रयत्न करणाऱ्यांना मदत करण्यासाठी बाबाजी सदैव तत्पर असतात.

'कृतज्ञता' हा एक महान दिव्य गुण आहे. या एकाच गुणामुळे माणसाची उन्नती घडून येते. परमात्म्याबरोबरच माणसानं माणसाबरोबर सुध्दा कृतज्ञ भावनेनं आचरण करावं असंच बाबाजींना वाटतं. कौस्तुभ, कृतज्ञ भाव मनी धारण करणारे लोक बाबाजींना फार आवडतात. अखिल मानव जातीच्या उध्दारासाठी सतत कार्यरत असलेले बाबाजी 'मानवता' हा एकच धर्म मानतात. माणसांनी निर्माण केलेला जातिभेद त्यांना अजिबात मान्य नाही, पसंत नाही.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

संपूर्ण जग हीच मानवाची जन्मभूमी आहे. सर्वांच्या शरीरात वहाणारं रक्त एकाच लाल रंगाचं असतं. त्याची जात एकच असल्यामुळे विशाल अंत:करणानी विश्वबंधुत्व मान्य करावं असं बाबाजींचं सर्वांना सांगणं आहे.

३५. ।। आपलं कर्माचरण ।।

प्रत्येक व्यक्ती आपल्या आचरणातून दाखवत असते की माझ्याशीही तुम्ही असंच वागा. जो ज्याच्याशी जसा वागतो, त्याला दुसऱ्यांकडून त्याप्रमाणेच वागणूक मिळत असते. आपल्या वागण्यातून हीन-दीन-लाचार स्वभावाची आपली ओळख आपणच दुसऱ्यांना करून देत असतो. दुसऱ्यांना कस्पटासमान लेखणारे हवेच्या एकाच झोक्यानं स्वत:च कस्पट होऊन जातात.

म्हणून सांगते हं, दुसऱ्यानं आपल्याशी जसं वागावं असं आपल्याला वाटतं ना, त्याच्याशी आधी तसंच वागायला आपल्याला शिकायचं आहे.

ज्यांच्या आचरणात पावित्र्य आणि वाणीत सत्य असतं, त्याच्यावरच भगवंताची कृपा होते. या महाशक्तीच्या कृपेशिवाय वा इच्छेशिवाय काहीच घडत नाही. या शक्तीचा स्पर्श आपल्या आत्म्याला झाल्यास आपण पूर्ण जागृत होतो.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

३६. ।। स्वत:ला ओळखा ।।

कौस्तुभ, आत्मशक्तीची खरी जाणीव असलेला मनुष्य कधीही संभ्रमावस्थेत नसतो. स्वत:ला तो पूर्णपणे ओळखत असतो. पण त्याहून महत्त्वाचं म्हणजे अशी माणसं दुसऱ्यांनाही ओळखून असतात. त्यामुळे हीच माणसं जीवनात यशस्वी होतात.

जो स्वत:ला ओळखत नाही तो जाणीव (ज्ञान) नसतानाही ती आहे असं इतरांना भासवत आपलं अज्ञानच वारंवार प्रगट करतो आणि आपणहून आपली ओळख दुसऱ्यांना करून देऊन आयुष्यभर स्वत: सामान्यच जीवन जगतो.

कौस्तुभ, म्हणून आपण सर्वप्रथम स्वत:लाच ओळखायला शिकू या हं !

३७. ।। आरपार बघा ।।

बऱ्याच वेळा असं होतं की समोरचा माणूस कसा आहे हे आपल्याला समजत नाही. त्यामुळे त्याच्याशी कसं वागावं हेही आपल्याला कळत नाही. अशी बऱ्याच जणांची अवस्था असते. म्हणून सांगते कौस्तुभ,

आपली दृष्टी नेहमी स्वच्छ व व्यापक असावी. समोरचं आरपार बघण्याचं कसब आत्मसात करावं. समोरच्या व्यक्तीच्या विचारांचं प्रतिबिंब आपल्या मनात पडण्यासाठी आपलं मन शुध्द, निर्मळ असावं. तसंच ते पूर्वग्रहदूषित अजिबात नसावं. म्हणजे समोर येणारी व्यक्ती आपल्यापासून काहीही लपवून ठेवू शकत नाही आणि तोंडानं ती बोलली अगर बोलली नाही तरी आपण तिला स्पष्टपणे वाचू शकतो, पाहू शकतो.

अरे, त्यामुळेच, त्या व्यक्तीशी कसं वागावं हेही आपण ठरवू शकतो हो ना !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

३८. ।। अंतःकरण स्थिर ठेवा ।।

संत महात्मे वेळोवेळी अनेकांना संकेतरूपानं मार्गदर्शन करतात. पण काहीजणच हा संकेत ग्रहण करू शकतात. कौस्तुभ, तुला जर त्यांचे संकेत समजावेत असं वाटत असेल, तर तुला काय केलं पाहिजे ते सांगते हं !

अरे, आपल्या 'अनुभूतिमाला' या पुस्तकातील ९ व १० या भागांत सांगितल्याप्रमाणे माझं काय झालं ? माझी मानसिक, वैचारिक अवस्था पूर्ण बिघडल्यामुळे बाबाजींचे संकेत मला ग्रहण करता आले नाहीत. त्यावेळी बाबाजींनी डॉ. सागरच्या मार्फत मला संदेश पाठवून, 'तू योग्य तेच करत आहेस, त्यासाठी माझे दोन्ही वरदहस्त तुझ्या मस्तकावर आहेत. तू कुठल्याही प्रकारे काळजी करू नकोस.' असा मला निरोप दिला.

हे बघ, बाबाजींसारख्या महात्म्यांचा संदेश मिळण्यासाठी चित्ताची एकाग्रता हवी. अंतरात स्थिरता हवी. मनात शांती हवी. बुध्दीतील विचारांचा फाफटपसारा आणि कल्पनेच्या भराऱ्या थांबवायला हव्यात. आपलं मन स्वच्छ, निर्मळ, स्थिर झालं की ते आरश्यासारखं लख्ख होतं. मग त्यात सारं काही पहाता येतं.

उदंड नामस्मरणानं हे शक्य होतं, तसंच प्राणायामाच्या सूक्ष्म कर्मानंही ते साध्य होतं.

आपल्याला हळूहळू पण निश्चितपणे हेच करायचं आहे. हे होतं हे नक्कीच. कारण सारे महात्मे यासाठी कष्ट घ्यायला तत्पर असतात. करुणामय, दयासागर असणारे ते आपल्याला साहाय्यभूत होतातच. पण बरेच वेळा आपलेच प्रयत्न कमी पडतात. आपण इथे स्वतःला सांभाळू या, फिरून प्रयत्न करत राहू आणि अंतरात स्थिरता धारण करायला शिकू या हं !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

३९. ।। अन्यायाला प्रतिकार केलाच पाहिजे ।।

बाबाजींनी एकदा मला सांगितलं, 'हे बघ. ज्यावेळी एखादी व्यक्ती साधना करू लागते, तेव्हा तिची सहनशीलता वाढते. असे संत, महात्मे सहनशील, शांत व दुसऱ्याकरता झिजणारे असतात. भोवतालचे स्वार्थी लोक याचाच गैरफायदा घेतात. तपश्चर्येनं वीरवृत्ती कमी होऊन सत्त्वगुण वाढतो. त्यामुळे हे संत महात्मे दुसऱ्याचे दोष पाहूनही शांत वृत्ती धारण करून रहातात.'

थोडं थांबून बाबाजींनी पुढे सांगितलं, 'अन्यायाला प्रतिकार केलाच पाहिजे. अन्याय करणाऱ्यांप्रमाणे अन्याय सहन करणारेही दोषी असतात. म्हणून प्रसंगी अत्यंत कडक राहून, कणखरपणा दाखवून, प्रसंगानुरूप ज्याची त्याची जागा त्याला वेळीच दाखवून द्यावी म्हणजे पुढे अशा माणसांना गैरफायदा घेता येणार नाही व ती डोईजडही होणार नाहीत.

राष्ट्राच्या उन्नतीसाठी अन्यायाला प्रतिकार करणाऱ्या तेजस्वी व्यक्तींची आज खरी गरज आहे. क्षात्र तेजाने सळसळणारे रक्त ज्यांच्या शरीरात वाहते, त्यांना योग्य मार्गदर्शन लाभले तर हिंदू धर्माची दुरावस्था नाहीशी होऊन उच्च दर्जाचे उज्वल कार्य घडू शकेल. सध्याच्या परिस्थितीत याची नितांत गरज आहे.'

'एका गोष्टीचं मला फार वाईट वाटतं,' असं म्हणून बाबाजी पुढे म्हणाले, 'या जगात अनेक तऱ्हेची माणसं एकत्र येऊन आपापल्या संघटना स्थापन करून मोठमोठाली कार्यं करतात. अनेक प्रकल्प उभारून ते पूर्णत्वाला नेतात. परंतु, सदाचारी, सत्पुरुष, सत्त्वगुणप्रधान लोक एकत्र येऊन संघटना स्थापन करताना दिसत नाहीत. ते जर एकत्र आले तर आश्चर्यकारक महान कार्य होईल.'

कौस्तुभ, क्षात्रतेज, क्षात्रवृत्ती आणि मानवतावादी उदात्त ध्येय असेल, तर सामर्थ्यसंपन्न जीवन जगता येतं हं !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

४०. ।। लक्ष्मीसहित नारायणाची उपासना करावी ।।

भगवंताच्या श्रेष्ठ भक्तांची स्थिती या जगात फारशी समाधानकारक नाही. या गोष्टीचंही बाबाजींना वाईट वाटतं.

खरं तर भक्तांमुळेच भगवंताची ओळख होते. तरीही भक्त नेहमी दरिद्री, कंगाल, असमर्थ, सत्ताहीन असतात असंच सर्वांना वाटतं. पण प्रत्यक्षात तसं अजिबात नसतं. भक्तांचं लक्ष फक्त आपल्या आराध्य दैवतावर, विश्वंभर नारायणाकडेच असतं. बाकी सर्वच बाबतीत उदासीन असलेले हे भक्त आपलं सर्व लक्ष नारायणाच्या चरणकमली ठेवून त्याच्या हृदयातच विराजमान होतात. परंतु, नारायणाकडे लक्ष देताना लक्ष्मी दुर्लक्षिली जाते आणि ती रुसून लांब निघून जाते.

कौस्तुभ, अत्यंत महत्त्वाची गोष्ट सांगते. लक्ष्मीसहित नारायणाची उपासना काही कार्यासाठी आवश्यक असते. म्हणून निर्मल लक्ष्मीचा यथायोग्य आदर सत्कार करून तिला आपल्याच हातावर स्थान द्यावं आणि एक लक्षात ठेवावं की तो हात बुध्दी आणि मन यांच्यावर कधीही जाऊ देऊ नये. आपल्या उपास्य देवतेच्या चरणी बुध्दी वाहून, तिच्या नामातच जर मनाला गुंतवून ठेवलं, तर ही लक्ष्मी आपल्यावर कधीही सत्ता गाजवूच शकणार नाही. उलट भक्तच त्या लक्ष्मीवर सत्ता गाजवून जनहिताचं लोकोपकारक कार्य करून आपल्या नारायणाचंच वैभव तो वाढवेल.

अरे कौस्तुभ, जीवनात पैश्याला फार महत्त्व आहे. पण, केवळ धनामागे फिरणारे अखंड भिकारी रहातात. धनच त्यांना नाचवत असतं. पण, आपल्या इच्छेनुसार धनाचं येणं जाणं जो नियंत्रित करू शकतो तोच सर्वश्रेष्ठ धनवान असतो.

कौस्तुभ, सन्मार्गानं आलेली लक्ष्मी नारायणाचीच दासी असते. ती आपली स्थिरता बिघडवत नाही. पण, कुमार्गानं आलेली अलक्ष्मी अंती विनाश करते. म्हणून, सत्याचरणानं भरपूर संपत्ती मिळवून सत्कार्यासाठी तिचा सदुपयोग कर हं.

जीवनात सामर्थ्य, सत्ता व पैसा यांची अत्यंत गरज आहे. पण, त्यांची गुलामी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

करू नकोस. आपल्या इच्छेप्रमाणे या तिन्हींवर ताबा मिळवून, विजयी होऊन उज्वल यश मिळवता येतं हं !

धर्म आणि सत्याच्या जयासाठी सामर्थ्य, सत्ता व पैसा यांचा सदुपयोग करणारेच अत्यंत थोर महापुरुष असतात. जीवनाचं असं उच्च ध्येय ठरवावं हं !

४१. ।। बाबाजींचं बोलणं मृदुमुलायम ।।

कौस्तुभ, समोरची व्यक्ती सुज्ञ असेल, तर मोकळेपणानं बोलून गैरसमज दूर करावेत. शक्यतो वादविवाद, भांडण, तंटे असे प्रसंगच येऊ देऊ नयेत. क्वचित प्रसंगी अत्यंत कडक भाषेत बोलण्याची नितांत गरज असली तरी असे प्रसंग टाळता आले, तर टाळावेत. गरज भासल्यास सडेतोड उत्तर देऊन आपणच बाजूला व्हावं. मग बोलावं कसं ? सांगू ?

आपल्या बोलण्यात तथ्य असावं आणि वाणीत सामर्थ्य हवं. हळू आवाजात व स्पष्ट उच्चारात केलेला सुसंवाद दोन व्यक्तींमध्ये आपुलकी, प्रेम, जिव्हाळा निर्माण करतो. दुसऱ्याची सहसंवेदना जाणून अत्यंत मृदू भाषेत केलेलं संभाषण हृदयाचा ठाव घेतं.

कौस्तुभ, आपले बाबाजी नेहमीच मंजुळ, मृदुमुलायम व मधुर आवाजात बोलतात. एवढं मधुर की त्यांच्या स्वरातील माधुर्य आपल्याला सुखावून जातं आणि त्यांच्या आश्वासक शब्दांनी आपण निर्भय, समर्थ व प्रसन्न होतो.

१९८० साली बाबाजींच्या स्वमुखातून पहिल्यांदा ऐकलेले काही शब्द 'येणारच आहेस. पण, अजून वेळ आहे.' किती साधं वाक्य आहे ना. पण, जेव्हा ते माझ्या कानांनी ऐकलं, तेव्हा माझ्या हृदयातून शब्द आले,

'सुंदर बोल तो हळूच वदला
नाद मधुर तो कानी ऐकला
हास्याच्या त्या झंकाराने
जगते मी पुनर्जन्माने'

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

४२. ।। प्रेम अंगभूत गुण ।।

'प्रेम द्या, प्रेम घ्या, सगळीकडे प्रेमच पहा,' असं बाबाजी आपल्या सर्वांना सांगतात.

अरे कौस्तुभ, प्रेम ही ना आपल्याला मिळालेली भगवंताची अनमोल देणगी आहे. तिच्या साह्यानं, तिच्या जोरावर आपण माणसांनाच काय पण प्रत्यक्ष भगवंताला सुध्दा जिंकून आपलंसं करू शकतो. निर्मळ, निरागस, निरलस, निरतिशय असं हे 'प्रेम' म्हणजे भगवंताचं एक निखालस रूप आहे. हा एक दिव्य गुण आहे. ज्यांच्या मनात नाम असतं व नामात मन असतं, तिथे समाधान, आनंद व प्रसन्नता आपोआप निर्माण होते. ज्यांना हे साधतं ते संत. सर्वांच्यात व्यापून राहिलेला भगवंत त्यांना दिसतो. तेव्हा प्रत्येकात त्यांना आपलंच प्रतिबिंब पहाता येतं. त्याच वेळी त्यांना प्रेमाचा खरा अर्थ कळू लागतो.

हृदयात निर्माण झालेलं हे प्रेम स्पर्शातून झिरपतं, डोळ्यातून पाझरतं. तेच प्रेम भगवंतावर केलं की त्याचं भक्तीत रूपांतर होतं आणि अपार मायेच्या रूपात प्राणिमात्रांवर बरसत रहातं हं.

"काम क्रोध दूर करा । मोह माया बाजू सारा ।
प्रेमासाठी प्रेम करा । मुखी रामनाम धरा ।
समाधानी ठेवा मन । आनंदात डोलो मन ।
प्रेम अंगभूत गुण । राम मनी मनी राम"

प. पू. पाचलेगावकर महाराज ती. अप्पांना म्हणायचे, 'केशव, तू म्हणजे मूर्तिमंत प्रेम आहेस. कौस्तुभ, आपल्या या अप्पांकडे बघ बरं, सर्वांवर किती प्रेम करतात. त्यांच्यासमोर कोणीही असोत, कोणीही येवोत, समोरच्यांवर प्रेम करून, त्यांच्या सुखदु:खाशी एकरूप होऊन, त्यांच्यासाठी पडेल ते काम करत अप्पा त्यांना प्रभुसन्मुख करत असतात, हो ना ! स्वत:कडे लघुत्व घेऊन दुसऱ्यांना मोठेपण देत त्यांचीच सेवा करतात. असं करताना आपलं सर्वस्व द्यायला मागेपुढे न पहाणारे अप्पा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सर्वांवर एवढं प्रेम करत असतात की प्रत्येकालाच ते आपले अप्पा आहेत असं वाटावं. इतकं ते प्रत्येक व्यक्तीवर प्रेम करत असतात.

कौस्तुभ, त्याचं कारण माहीत आहे का तुला ? माझा केशव, समोरच्या व्यक्तीला न पहाता त्यात वास करणाऱ्या जीवाकडे पहातो. त्या जीवाला शिवाची जोड कशी मिळेल हे बघत असताना स्वत: मात्र अखंड शाळिग्रामाचा ध्यास घेतलेले अप्पा त्यासाठीच झटत असतात.

आपल्या बाबाजींचंही केशववर खूप प्रेम आहे. उगाच का मला ते अप्पांकडे पाठवतील ?

आपणही अप्पांचे हे गुण घ्यायचा प्रयत्न करू या.

४३. ।। पूर्णानंद उदया आला ।।

कौस्तुभ, स्वत:चं सुख स्वत:च शोधावं. दुसऱ्यांवर अवलंबून असणाऱ्या सुखापासून नेहमीच दूर रहावं. तसंच स्वत:च्या फायद्याचाच विचार करणाऱ्या आपमतलबी, स्वार्थी, आपलंच कौतुक करून दुसऱ्यांच्या नको त्या चौकशा करणाऱ्यांची संगत कधीही धरू नये.

भगवंतानं आपल्याला जे दु:ख दिलं ना कौस्तुभ, ते शिकण्यासाठी, अधिक उन्नत होण्यासाठी. अरे ! दु:खामुळेच सुखाचं महत्त्व समजतं.

सुखातही आपल दु:ख आंजारत, गोंजारत दुसऱ्यांपुढे त्याचं प्रदर्शन मांडायला काही जणांना आवडतं. त्या दु:खाला कवटाळून बसण्यातच ते सुखावतात.

परंतु आपल्याला काय करायचं आहे हे तुला माहीत आहे ना कौस्तुभ ? दु:खाला सामोरं जाऊन हसत त्याचा स्वीकार करायचा. सुखात आपण सुखावून त्या सुखाचा आस्वाद घ्यायचा आणि सुखदु:खाच्या पलीकडे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

असलेला आनंद जाणायचा, शोधायचा. 'ब्रह्मानन्दं, नित्यानन्दं पूर्णानन्दं, परमानन्दम्' हे शब्द नुसते लिहायचे, वाचायचे नाहीत, त्याच्या अर्थातही गुरफटायचं नाही. मग काय करायचं ? या अवस्थांमधील जीवाचं अस्तित्व शोधायचं आहे. सदा सर्वकाळ अंतरात वास करणारा, नित्य-सत्य आनंद इथेच सापडेल. इथेच जीवाला आनंद भेटतो आणि जीवच आनंद होऊन जातो.

"आनंदाचा लाभ झाला
पूर्णानंद उदया आला
आत्मानंदी रंगुनी आत्मा
मुक्तपणे तो आज जागला"

असा अनुभव आपल्यात वास करणाऱ्या जीवाला घ्यायचा आहे हं ! हा मिळवण्यासाठी संपूर्ण निष्ठा हवीच. ती कशी ते आता बघू या.

४४. ।। संपूर्ण निष्ठा हवी ।।

महायोगावतारी बाबाजींचं नाव ऐकून एका माणसाला त्यांना भेटण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली. ती इतकी तीव्र होती की त्यानं सर्व सोडून फक्त त्यांचाच शोध सुरू केला. बाबाजी हिमालयात असतात असं समजल्यावरून त्यानं हिमालयात भ्रमंती चालू केली.

'बाबाजींची भेट घेणं' हे एकच उद्दिष्ट असलेला तो माणूस त्याप्रमाणे कसून प्रयत्नही करत होता. परंतु भेट होत नव्हती. सहसा जिथे मनुष्यप्राणी जाऊ शकत नाही अशा निर्जन स्थळी बाबाजी वास करतात असं समजल्यावर त्यानं अत्यंत अवघड जागी शोधाशोध सुरू केली.

तहानभूक विसरलेला तो शरीरानं दुबळा झाला होता. थकल्या भागल्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अवस्थेतच बाबाजींचा ध्यास घेतलेला तो एक अत्यंत अवघड अशी कपार चढून वर आला, तर वरच्या बाजूला शिष्य परिवारासमवेत एक तेज:पुंज व्यक्ती बसलेली त्यानं पाहिली मात्र, धावत जाऊन त्यानं त्यांच्या चरणांवर लोटांगण घातलं अन् म्हणाला, "मी तुम्हाला ओळखलं आहे. आपणच ते बाबाजी आहात. माझा शिष्य म्हणून आपण स्वीकार करा."

बाबाजींकडून त्याला काहीच प्रतिसाद मिळाला नाही. तेव्हा कडेकपारीच्या खालच्या बाजूला बोट करून तो म्हणाला, 'परमतत्त्वाच्या दिव्यत्वाचा मार्ग जाणण्यासाठी मी तुमच्याकडे धाव घेतली आहे. तुम्ही जर मदत करू शकत नसलात, तर ह्या कड्यावरून उडी मारून मी माझं जीवन संपवीन.'

कशाचंही सोयर-सुतक नसल्याप्रमाणे त्याच्याकडे न बघताच बाबाजी म्हणाले, ''तर टाक उडी. आताच्या तुझ्या अवस्थेत तुझा शिष्य म्हणून मी स्वीकार करू शकत नाही, करणार नाही. तू उडी टाकू शकतोस.'' त्यावेळी क्षणाचाही विचार न करता त्यानं स्वत:ला दरीत झोकून दिलं.

करुणेचा सागर असलेल्या बाबाजींचं हे वर्तन पाहून त्यांच्या इतर शिष्यांना आश्चर्य वाटलं. शिष्यांच्या चेहऱ्यावरील प्रश्नचिन्ह पाहून बाबाजींनी त्या माणसाचा देह दरीतून गोळा करून आणण्यासाठी शिष्यांना पाठवलं.

छिन्नविच्छिन्न झालेला त्याचा देह आणून बाबाजींसमोर शिष्यांनी ठेवून दिला. त्या कलेवराला बाबाजींनी हस्तस्पर्श केला तो काय आश्चर्य ! जिवंत होऊन तो उठला आणि आपल्या गुरुदेव बाबाजींच्या चरणी त्यानं लोटांगण घातलं.

अत्यंत प्रेमानं आपल्या नव्या शिष्याकडे पाहून बाबाजी म्हणाले, 'खूप कठीण परीक्षेला तू मोठ्या धैर्यानं तोंड दिलंस. यापुढे 'मृत्यू' तुला स्पर्श करणार नाही .तू अमर झाला आहेस.'

कौस्तुभ, आपले बाबाजी तर महान-थोर आहेतच.पण, इथे त्या शिष्याचं कौतुक आहे. वाटेल त्याला काही बाबाजी आपला म्हणणार नाहीत.

अत्यंत कष्टसाध्य बाबाजींचं दर्शन झाल्यावर सुध्दा त्यांच्या स्वमुखातल्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

शब्दानुसार क्षणाचाही विचार न करता त्यानं तत्काळ उडी टाकली.

कौस्तुभ, हे सोपं नाही. ती काही आत्महत्या नव्हती. ते समर्पण होतं, अगदी पूर्णपणे समर्पण. श्रध्दा, चिकाटी, संपूर्ण निष्ठा यांमुळे तो बाबाजींच्या कृपेला पात्र झाला.

त्या थोर सत्‌शिष्याला सादर वंदन करूनच आपण पुढे जाऊ या.

४५. ।। माझी दृष्टीच बदलून गेली ।।

"अत्यंत कठीण अशा परीक्षेला तू मोठ्या धैर्यानं तोंड दिलंस. यापुढे मृत्यू तुला स्पर्श करणार नाही. तू अमर झालास."

बाबाजींच्या या वाक्यामुळे ओघाओघानं मला आठवण झाली म्हणून सांगते हं ! कौस्तुभ, अरे, आपल्या सर्वांनाच मृत्यूची नेहमीच भीती वाटते. अनेकांना वाटते ना, तशी मलाही वाटायची. परंतु, बाबाजी, नित्यानंद, शाळिग्राम यांच्या आशीर्वादानं व केशवच्या सहवासानं प्रत्येक घटनेकडे बघण्याची माझी दृष्टीच बदलली.

आपल्या सुखदु:खांत सुखापेक्षा दु:खाला सामोरं जायला आपण जर शिकलो तर, आपण अधिक चांगलं घडत जातो असा माझा स्वानुभव आहे. सुखापेक्षा दु:खात आपण भगवंताच्या जास्त जवळ जातो. त्यावेळी कळवळून मारलेली हाक किंवा जीवानं फोडलेला टाहोच परमेश्वराच्या कानावर लवकर जातो. हे मी खात्रीनं सांगू शकते.

याचं कारण म्हणजे सुखात आपली वृत्ती बहिर्मुख झालेली असते. तर दु:खात आपण अंतर्मुख होतो. प्रत्येक सुखदु:खाच्या घटनेतून प्रत्येक वेळी मला नवी शिकवण, नवी दृष्टी मिळून, नवा अर्थ समजत मी घडत गेले. त्यामुळे असेल कदाचित किंवा सृष्टिचक्राची ओळख झाल्यामुळेही असेल, पण, मृत्यूकडे बघण्याची माझी दृष्टीच बदलून गेली. जे अटळ आहे त्याला सामोरं कसं जावं हे सांगूनच मी पुढे जाणार आहे.

पुढील भाग वय वर्षं साठच्या पुढच्या साधकांसाठी आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

४६. ।। परमेश्वराचं स्वरूप ओळखून मृत्यूला समजून घ्या ।।

'मला खूप भीती वाटतेय गं,' असं म्हणून माझ्या सासुबाईंनी माझा हात घट्ट धरला. चौऱ्याऐशी वर्षांच्या सासुबाई गेले अडीच महिने अंथरुणावरच होत्या. अशक्त, क्षीण झालेल्या त्यांच्या अंगात एवढी ताकद कुठून आली कोणास ठाऊक ? पण, अर्धा कप चहा पाजून मी त्यांच्या जवळून उठत असताना त्यांनी धरलेल्या माझ्या हातावर त्यांच्या बोटांचे वळ उठले. कुठून आली त्यांना एवढी शक्ती ? त्यांची भीती बघून उठता उठता मी परत त्यांच्या जवळ बसले. त्यांच्या अंगावरून हात फिरवला. तेव्हा, लहान मूल जसं आईला बिलगतं, तशा अर्धवट उठून त्यांनी आपलं डोकं माझ्या छातीवर ठेवून थरथरत्या हातानं मला घट्ट धरलं.

अध्यात्माची बैठक असल्यामुळे माझं नामस्मरण सुरू झालं. एकीकडे मी त्यांच्या पाठीवर हात फिरवत होते. पाच सात मिनिटांनी त्यांनी माझ्या मांडीवर डोकं ठेवलं. मी तशीच बसून होते. नाम चालूच होतं. त्यांचं थरथरणं थांबलं. मी त्यांच्याकडेच पहात होते. सासू-सून या नात्यांत त्यांच्याबरोबर जवळ जवळ तीस एक वर्षं काढल्यामुळे राग, लोभ असले तरी याक्षणी तो एक जाता जीव म्हणून मी त्यांच्याकडे पहात होते.

आयुष्यभर आपण जे कमावतो ते सर्व सोडून शक्तिहीन अवस्थेत अनोळख्या मार्गावरून प्रवास करायचा म्हणजे भीती वाटणारच. हे प्रत्येकाचंच होत असणार. त्यातून आयुष्यभर केलेल्या भल्या-बुऱ्या कर्मांचा चित्रपट डोळ्यांसमोर असतो. शक्तिहीन, भेदरलेली अशी त्यांची अवस्था पाहून - त्यांच्या कानाजवळ तोंड नेऊन मी म्हणाले, 'कसली भीती वाटतेय तुम्हाला ?' 'कळत नाही गं.' असं म्हणताना त्यांचे डोळे पाण्यानं भरून आले. त्यांना ऐकू कमी येत असल्यामुळे मी त्यांच्या कानाजवळ मोठ्याने बोलू लागले. 'हे बघा, आता तुम्ही गावाला जाणार आहात. जिथे जाणार ते गाव तुम्हाला माहीत नाही. प्रवास खूप मोठा आहे. म्हणून तुम्हाला भीती वाटतेय. पण तुम्ही काळजी करू नका. मी सर्व तयारी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

करीन हं ! त्या गावाला आपल्या ओळखीची माणसं तुम्हाला भेटतील. घाबरायचं कारण नाही. कोणीतरी ओळखीचं भेटेपर्यंत मी तुम्हाला सोबत करीन.' असं मी म्हणताच, त्यांची भीती कमी होऊन जरी त्यांना थोडा धीर आला, तरी त्या माझ्याकडेच बघत राहिल्या. तेव्हा त्यांचा हात हातात घेऊन मी म्हणाले, 'अगदी नक्की. अजिबात काळजी करू नका.' त्यांना खूप बरं वाटलं आणि त्यांनी उशीवर डोकं ठेवलं. आता त्यांचा चेहरा स्वस्थ आणि जरासा शांत दिसत होता.

सासुबाईंच्या जीवाशी मृत्यूनंतरच्या प्रवासासंबंधीच शब्द बदलून मी बोलले होते. ते जीवाला समजलं होतं. सासुबाईंचा जीव समाधानानं शांत झाला. त्यानंतर ४-५ दिवसांतच शांतपणे त्या हे जग सोडून गेल्या.

ज्यावेळी दिवसागणिक आतून क्षीण होऊन शारीरिक त्रासानं व भयानं अगतिक झाल्यामुळे डोळ्यातलं तेजच संपत आलेल्या सासुबाई शेवटचे दिवस जगत होत्या, त्यावेळी माझ्या मुलीची गोंडस मुलगी दिसामासानं माझ्या घरात वाढत होती. उत्साह व कुतूहलाच्या नजरेनं अवतीभवती बागडत सर्वांना सुखावत होती. या दोन्ही घटना मी त्रयस्थपणे बघत होते. **जन्म मरणाच्या घटनेशी बांधलं गेलेलं आपलं आयुष्य म्हणजे एक न उलगडणारं कोडं आहे. माझ्या घरात घडणाऱ्या या दोन्ही घटना मला घडवत होत्या.**

खरं तर जन्माबरोबर जन्माला आलेल्या मृत्यूची सोबत प्रत्येक क्षणी आपल्याला साथ करत असते. मग जो अखंड बरोबर आहे त्याची भीती का बाळगायची ? त्याला का घाबरायचं ? उलट जाणतेपणानं त्याला जाणून, त्याची पुरती ओळख आपणच स्वत:पुरती करून घ्यायला नको का ? मृत्यू काय फक्त नेहमी दुसऱ्यांनाच येत असतो ? नाही. प्रत्येकालाच येतो. तरीही आपल्याला त्याची भीती वाटते आणि जो तो त्याच्यापासून दूर पळून जायला बघतो. ह्या पळापळीच्या खेळात त्यानी आपल्याला पकडण्याआधी आपणच तयारी करून त्याला सामोरं जाऊन भोऽऽ केलं तर ? क्षणभर हसू येईल ना ?

हो, हसू येईल. पण मृत्यूकडे डोळसपणे पाहिलं पाहिजे. ह्या सृष्टीमध्ये असलेली प्रत्येक गोष्ट हरघडी, हरक्षणी बदलत असते. म्हणजे तिचं रूपांतर दुसऱ्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वस्तूत होत असतं. ती नाहीशी होत नाही . तरीही तिच्यात सुसूत्रता असते. आपण कधीच नाहीसे होत नाही. उलट, शक्तिहीन, क्षीण, दयनीय झालेलं शरीर सोडून नवं, पुष्ट, बलशाली, उत्साही शरीर मिळण्यामधली ती एक प्रक्रिया आहे आणि त्यातला थोडासा प्रवास अंधाराचा आहे, नवखा आहे. साथसोबत कोणाची असेल माहीत नसतं. आपण एकटे असतो म्हणून घाबरतो. माझं माझं करून मिळवलेलं सर्व सोडून जगाला कायमचं सोडायचं हेच खरं दु:ख असतं. पण असाहाय्य अवस्थेत लाचार होऊन रडारड करत आलेला मृत्यू म्हणजे रडकथा.

जन्माला येताना एकटेच रडत येतो ना, मग जाताना हसत नको जायला ? मोठा प्रवास आहे हा. त्याची खूप तयारी करावी लागते. 'माझे', 'आपले' हे बंध तुटता तुटत नाहीत. त्यांना प्रयत्नानं, अभ्यासानं सोडण्याची तयारी करावी लागते. वयाच्या साठीपर्यंत भरपूर मिळवून उपभोगलेलं असतं. साठीनंतर आपण जशी आर्थिक सोय करतो ना, अगदी तसंच, मिळवलेलं सहज सोडून, येईल तेव्हा मृत्यूला सामोरं जाण्यासाठी मानसिक तयारी करणं योग्य ठरेल.

व्यवहारात उद्याची सोय करून जगण्यात सुरक्षितता आहे. ते करावंच. त्यानं काही बिघडत नाही. पण बाहेरून सोडण्याला महत्त्व नाही. सर्व अंतरातून सुटायला हवं. कारण मृत्यूचा संबंध अंतरात्म्याशी आहे. मनाचे बध्द करणारे बंध सोडायला हवेत. कुठल्याही भ्रमात राहून चालणार नाही. सर्वकाही आवरतं घ्यायला हवं. वस्तूंचा आणि विचारांचा पसारा वाढवायचा नाही. नाहीतर त्यासाठीच सर्व शक्ती खर्च होते. मानसिक गरजाच कमी करून टाकायला हव्यात आणि हो ! शरीर नीट चालण्यासाठी त्यात सुसूत्रता आणायला हवी. शरीरस्वास्थ्याचा तोल सांभाळला जाईल असंच आचरण करायला हवं. जाणीवपूर्वक आपल्या ज्ञानाचा व पैशाचा उपयोग गरजूंसाठी करून 'निष्काम कर्मयोगाची' सुरवात करायला हवी. अजिबात गाजावाजा न करता आपल्या गरजा कमी करून एकटं रहायला शिकलं पाहिजे.

भूतकाळच्या भुतांना हाकलून लावायला हवं. भविष्यातील कल्पनेच्या भराऱ्यांना लगाम घालून 'वर्तमानकाळ' आनंदानं जगण्याची सवय लावून घेतली पाहिजे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आपल्या आचार, विचार व उच्चारानं जीवनात निर्माण झालेला सावळा गोंधळ अगोदर आवरायला हवा. सत्याचा साक्षात्कार होऊन ईश्वर जाणायचा असेल, तर बारकाईनं या सृष्टीकडे पहायला हवं. निसर्गाशी एकरूप व्हायला हवं. त्यात जे नाविन्य आहे आणि जो उत्साह आहे ना तिथेच ईश्वराचा वास असतो.

हा वास आपल्या अंतरात सुध्दा असतो. अगदी आधीपासूनच आपल्या जवळच जे आपल्यापाशी आहे ते जाणून ओळखणं म्हणजेच खरं 'अध्यात्म'. शांतपणे बसून, आतला कानोसा घेऊन, जाणून ओळखणं ह्याला महत्त्व आहे. पूर्वीचे जीवावर झालेले संस्कार पुसून, स्वच्छ नजरेनं बघायला हवं. काय बघायचं ते आपण ठरवायचं नसतं. काय घडावं हा विचार करायचा नसतो. आपोआप अंतरात क्रांती घडून येते. नीट बघून, समजून घेणं गरजेचं आहे. परमात्म्यानं दिलेल्या शक्तींची जाणीव ठेवून शारीरिक, मानसिक व बौध्दिक या तिन्हींच्या साह्यानं भगवंताशी कृतज्ञ रहायला हवं. सर्व गुणांचा व सामर्थ्याचा विनियोग एकमेकांच्या साहाय्यासाठी, सुसंवादासाठी, शांती, समाधानासाठी केला पाहिजे. आनंद हा स्वत: मिळवून दुसऱ्यांना वाटण्यासाठीच असतो. हाच निसर्गाचा अलिखित नियम आहे. हा साक्षात्कार झाला की आत्मबोधाचा प्रकाश पसरतो. 'परमेश्वराचं स्वरूप ओळखून मृत्यूला जाणणं' हे जर जमलं तर चिंता संपून जाते आणि सत्याचं ज्ञान होतं. मृत्यूचं भय संपून जातं. मग आनंदानं, शांतिपूर्वक या जगाचा ठरल्यावेळी निरोप घेणं शिल्लक उरतं आणि सगळीकडे आनंदाचं साम्राज्य पसरतं. तर मग या 'आनंदाचे डोही' आनंदानं डुबकी घेण्याची तयारी करू या. चला तर मग 'काळ रे काळ, काळानं बांधिला । नको गुंतू मना, तुज रामाशी बांधला ।'

अशा या कळाच्या हातात, आपण हात देऊन त्याच्या बरोबर चालू या. जे मिळवायचं आहे ते मिळवून आपणच या काळाला सोडून अनंताचा काळ जाणण्यासाठी 'गुंफू रामनाम माळ, जाणू अनंताचा काळ'.

म्हणजे मग आनंदाच्या डोहात आनंदानं अलगद तरंगता येईल, अगदी सहजपणे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

४७. ।। अंतरातील खाण खणा ।।

गुह्यात जे गुह्य ज्ञान ते वरिष्ठ । निर्मल निरंजन तेच श्रेष्ठ ।
अंतरात खोल परब्रह्म धन । सद्गुरुकृपे प्रकाशे हे ज्ञान ।।

शाळिग्राम गाथांबुज १९

आपल्या अंतरात अत्यंत खोलवर जीवाबरोबर परब्रह्माचा वास असतो. परंतु, कर्मफळ, संस्कार आणि अहंकार यांनी बध्द झालेल्या जीवाला परमश्रेष्ठ परमात्म्याचं आकलन होत नाही. अंत:करणात शेवटी चित्त असतं व त्याही पलीकडे चिदाकाश असतं. इथे तो शिव जीवाबरोबर अखंड वास करतो. हे सर्वसाधारण लोकांना माहीत नसतं. सद्गुरूंच्या कृपेमुळेच इथे पोहोचण्याचा मार्ग आपल्यासाठी खुला होतो.

सोन्याची, रत्नांची खाण असते ना, पण 'इथे खाण आहे' हे माहीत असणाऱ्याला ती रत्नं व सोनं मिळत नाही. अत्यंत कष्टानं, प्रयत्नपूर्वक ती खाण खणूनच खाणीतील खजिना हस्तगत करावा लागतो. अगदी त्याचप्रमाणे -

अंतरात परमेश्वराचा वास आहे हे कळून तो प्राप्त होत नाही. अंतरातील गुहेतच जिवाबरोबर रहाणाऱ्या शिवाची ओळख होण्यासाठी अत्यंत मेहनतीनं, सूक्ष्म श्वासामार्फत व सद्गुरूंनी दिलेल्या नामामार्फत पिसून-पिसून, खणत-खणत आपल्याला अंतरात प्रवेश करायचा आहे.

खाणीतील दगड-माती बाजूला करून आपण रत्नांचा शोध घेतो ना, तसा अंतरातील गुहेत प्रवेश झाला की श्वासामार्फत व भगवंताच्या नामामार्फत सूक्ष्म कर्म करत - सर्व दोषांचा परिहार करता येतो. जसजसे दोष नाहीसे होतील, तसतशी सद्गुणांची एकेक रत्नं हस्तगत होत जातील. हळूहळू, पण निश्चितपणे आपण आपल्या इच्छित स्थळी पोहोचतो.

त्यावेळी आपल्याच आत शिवस्वरूपात रहाणाऱ्या सद्गुरूंचं दर्शन होतं. या महाशक्तीला जाणलं की बाकीचे इतर विषय वेगळे जाणण्याची आवश्यकता भासत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नाही. कारण प्रत्येक विषयात हेच तत्त्व भरून राहिलं असल्यामुळे ज्ञानाच्या प्रकाशातच आपल्याला सर्व स्वच्छ, स्पष्ट जाणवतं, कळतं, समजतं.

प्राणायामानं, क्रियायोगानं, सोऽहं मंत्रानं अथवा नामजपानं कायिक-वाचिक-मानसिक केलेल्या साधनेनं स्वच्छ, निर्मल झालेलं मन त्रिगुणांच्या पलीकडे वास करणाऱ्या भगवंताला अर्पण केलं की सद्गुणांच्या रत्नांचा खजिनाच आपल्याला सापडतो. रत्नजडित सद्गुणांच्या सिंहासनावर शिवस्वरूप चिन्मयमूर्ती असलेल्या आपल्या सद्गुरूंचं प्रत्यक्ष दर्शन होतं.

४८. ।। आरती सत्‌चित् आनंदाची ।।

सत्-चित्-आनंद स्वरूपात असलेला 'आत्माराम' कुठे वास करतो, कसा असतो, तो कसा प्राप्त होतो ते आणि क्रियायोगानं अंतर्गत काय फरक पडतो तेही पुढील आरतीत सांगितलं आहे. या आरतीत कोणाचंही वेगळं नाव घातलेलं नाही. **परब्रह्मस्वरूप असलेला आपला 'आत्माराम' हाच सद्गुरू आहे.** त्याची ही आरती सर्वांसाठीच आहे हं !

कौस्तुभ, पुढील आरती लक्षपूर्वक वाच व त्याचा अर्थ समजून घे हं !

सत्‌चित् आनंदा आत्मारामा निजकंदा
जय देवा जय ब्रह्मस्वरूपा श्रीसद्गुरुनाथा ।
आरती ओवाळुनी तव चरणी ठेवितसे माथा ।।धृ.।।

चंद्रमंडलांतर्गत निर्मल ब्रह्मरंध्रभुवनी ।
एकवीस स्वर्गावरती आसन साजे कुंजवनी ।।१।।

सहस्रदल पंकजी विराजित गुंफे माझारी ।
अतसि कुसुमसम कांती झळके शुक्लांबरधारी ।।२।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

षट्चक्रांचे देव वंदिले तीर्थाटन झाले ।
द्विदल पंढरपुरी सद्गुरु पाहुनी मन धाले ।।३।।

सत्रूप चिद्रूप आनंदात्मा सज्जन दीनबंधू ।
करुणासागर पूर्ण उजागर तारक भवसिंधू ।।४।।

प्राणापाने सोऽहं सूत्रे कायावाणी मने ।
त्रिगुणताटी प्रसाद अर्पण केलासे सुमने ।।५।।

रत्नजडित सिंहासन लखलख रंगरंग भरिले ।
चिन्मयमूर्ती ध्यान गुरुचे सोज्वळ मनी धरिले ।।६।।

श्रवण पठण या प्रदक्षिणेने गुरुवरदेश्वरला ।
निज ध्यासिता ज्ञानदीपाचा प्रकाश संचरला ।।७।।

अनहतवेणू शंख झांजिरे घागरिया वाजे ।
मृदुंग वीणा टाळ नगारा गगनांबरी गाजे ।।८।।

गीत मंत्रपुष्पांजली वाहू गुरुपद अरविंदा ।
प्रसाद तीर्थासह सेवुनी पावे आनंदा ।। ।।९।।

सत्चित् आनंदा आत्मारामा निजकंदा
जय देवा जय ब्रह्मस्वरूपा श्रीसद्गुरुनाथा ।
आरती ओवाळुनी तव चरणी ठेवितसे माथा ।।

कौस्तभ, आत्मारामाची ही आरती संग्रहित केलेली आहे ती आपल्या अप्पांना प. पू. पाचलेगावकर महाराजांकडे मिळाली व त्यांनी ती लगेच आत्मसात करायला सुरवात केली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

४९. ।। बाबाजींच्या कृपाप्रसादासाठी ।।

कौस्तुभ, आपल्या बाबाजींचा कृपाप्रसाद आपल्याला कसा प्राप्त होईल, ते आता पाहू या.

कृतज्ञता, मानवता, नम्रता, मृदुभाष्य, सदाचार, प्रेमभाव, तेजस्विता हे गुण बाबाजींना आत्यंतिक प्रिय आहेत. आपल्याला हळूहळू हे वाढवायचे आहेत. आपल्याला आपल्याच दृष्टीत आणि वृत्तीत पालट करायचा आहे.

अखिल मानवजातीच्या उध्दारासाठी शतकानुशतके आपला देह बाबाजींनी अजून धारण करून ठेवला आहे तो आपल्याच कल्याणासाठी आहे. आपल्याला मदत करायला सदैव तयार असणाऱ्या बाबाजींना आपण कळवळून अंतरातून साद घालायची आहे.

अरे, आपली हाक बाबाजी ऐकत असतात. आपण एक पाऊल जरी पुढे आलो ना, तर ते दहा पावलं पुढे येऊन आपल्याला जवळ घेतील याची खात्री ठेव. याच विश्वासानं प्रत्येकानं पुढील साधना करावी.

दर सोमवारी रात्री ९ ते १० ही वेळ बाबाजींची संचाराची असते. त्यामुळे त्यांच्याबरोबर आपला संबंध सहज जोडला जाऊ शकतो, जोडला जातो. यावेळी रात्री हातपाय धुवून एका जागी स्थिर बसावं. कुलदेवतेचं स्मरण करून प. पू. बाबाजींचं स्मरण करावं. मन स्थिर झाल्यावर आपल्या श्रध्दास्थानाचं नाम व ध्यान करून प. पू. बाबाजींचं स्मरण करावं. ही साधना बाबाजींनीच सांगितलेली आहे. (शिवेंद्र कंदाहारी यांच्या 'विश्वगांधार' या पुस्तकात पान २७२ वर)

तर, आपल्या उन्नत अवस्थेसाठी यावेळी दहा मिनिटं तरी साधना करावी. म्हणजे बाबाजींच्या कृपेमुळे आपण अधिक वरच्या अवस्थेत सहजपणे जातो हं !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

५०. ।। शत कोटी प्रणाम ।।

मला कधी वाटलंही नव्हतं की मी काही लेखन करीन. लिहिता व बोलता तर मला येतच नाही. ईशप्रेरणेनं ते माझ्याकडून लिहून घेतलं इतकंच.

'आपले बाबाजी, नित्यानंद स्तवनांबुज, शाळिग्राम गाथांबुज, ॐ केशवाय नमः, व अनुभूतिमाला' ही पाच पुस्तकं म्हणजे माझे पंचप्राण आहेत. माझ्या पंचेंद्रियांनी ग्रहण करून, पंचज्ञानेंद्रियांमार्फत अंतःकरणातून जे निघालं, ते साधं सरळ असं कागदावर उतरवून काढलं.

कसलाही अभ्यास मी केलेला नाही आणि कसलंही संशोधन केलेलं नाही. आजपर्यंत जे जे घडलं ते सर्वच बाबाजींच्या कृपाप्रसादामुळे आपोआप घडलेलं आहे.

परमेश्वरानं आमच्या घरात या पाच पुस्तकांच्या रूपानी पंचायतन तयार केलं. त्याचं पंचप्राणांच्या साहाय्यानं पूजन करून मी हे सर्वच बाबाजींच्या पवित्र चरणकमली समर्पित करत आहे.

चिरतरुण, त्रिकालज्ञ, सर्वसंचारेश्वर, महायोगावतारी बाबाजींच्या पवित्रपावन पदकमली माझे व माझ्या केशवचे आणि आपल्या सर्वांचेच शत कोटी प्रणाम !

शत कोटी प्रणाम !
शत कोटी प्रणाम !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

५१. ।। जयजयकार ।।

जयजयकार करू, जयजयकार करू
महायोगावतारी बाबाजींचा जयजयकार करू।। धृ.।।

घराघरातून तव नामाचा, पुकार आता आम्ही करू
जयजयकार तुझाच करता, चरण तुझे रे सदा स्मरू।।१।।

नित्यानंदाच्या दयानंदा, शाळिग्रामाच्या केशवा
प्रभुकार्याचे बांधून कंकण, मुळारंभा नमन करू ।।२।।

अविरत तव कार्यासाठी, तत्पर आम्ही असू सदा
सर्वस्वाचे करुनी मंथन, दंभाची या होळी करू ।।३।।

समाधानी ठेवुनी मना, लुटवू आम्ही आनंदा
तव तत्त्वांची वस्त्रे लेवुन, भक्तांना या हाती धरू।।४।।

वरदहस्त हा तुझा शिरावर, काय उणे मग संसारी
तव प्रेमाची अवीट गोडी, जिवाशिवाची भेट करा।।५।।

ब्राह्ममुहूर्ती शपथ वहाते, साक्ष उगवत्या सूर्याची
पुरवी इतुकी आस मनीची, शपथ तुला रे भक्तांची ।।६।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

५२. ।। आहेत आपुले बाबाजी ।।

आद्य पुरुष हे बाबाजी असता ।
पहा लोचनी हृदयी जपता ।।

लेऊन सद्गुण प्रिय होता ।
सौभाग्याने भाग्य उजळता ।।

बाबाजींचा आशिष मिळता ।
जीवेभावे त्यांसी स्मरता ।।

दिशा दाही तृप्त होता ।
प्रसन्नतेचा प्रसाद मिळता ।।

बावन्न भाग पुस्तक लिहिता ।
सहज लाभले वरदहस्ता ।

माझ्यासाठी, तुमच्यासाठी ।
नाही अपुल्या सर्वांसाठीच ।।

आहेत आपुले बाबाजी ।
आहेत आपुले बाबाजी ।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

।बाबाजी - गायत्री।।

ॐ बाबाजीशाय विद्महे । गुरुदेवाय धीमहि ।
तन्नो शिव: प्रचोदयात् ॐ

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ॐ राम

ॐ ओंकार रूप सगुण ईश्वर

बा बाबाजी अपुले महान थोर

बा बाबाजी असती दयाळू फार

जा जीवांवर माया असे ती अपार

ज जयजयकारी त्यांचा करूया झंकार

य यती महायोगी देतील वर

बा बाबाजी आपुल्या जीवाचा आधार

बा बाबाजी असती कृपेचा सागर

जी जीवाचा सहज करिती उध्दार

- सौ. उज्वल कुंटे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

।। बाबाजी स्तवन ।।

लेखिका - श्रीमती सीमा देशमुख

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बाबाजी स्तवन

परमउदारा दयासागरा परब्रह्म जगदीशा
नश्वर जगतामध्ये ईश्वरा तूच आमची आशा ।।१।।

तुझेच ठायी लय विश्वाचा पालक सृष्टी रचयिता
अनंत रूपे तूच विचरशी, तू कर्मे तू कर्ता ।।२।।

चराचराचा जीवनदाता कालचक्र नियंता
विश्वमोहिनी माया फिटुनी दर्शन दे मज आता ।।३।।

गाऊ कसा तव अगाध महिमा दुबळी माझी वाचा
अज्ञानतमी भ्रमतो आहे गुलाम मी षड्रिपुचा ।।४।।

स्वार्थ साधण्या, सौख्य लाभण्या श्रमली सदैव काया
दु:खच केवळ पदरी उरले जगणे ठरले वाया ।।५।।

कळून चुकले कुणी न अंती, खरा एक परमात्मा
परमात्म्याच्या भेटीसाठी तळमळतो मम आत्मा ।।६।।

जिवाशिवाची भेट घडोनी सार्थक हो नरजन्म
हीच विनंती तुला समर्था, नाही मागणे अन्य ।।७।।

नमन गणेशा मंगलमूर्ती नमन शारदा ज्ञानदायिनी
कुलस्वामिनी आई भवानी प्रणाम भावे आपुल्या चरण ।।८।।

भक्तवत्सला करुणामयी, जी असून जीवन्मुक्त
अज्ञ जिवांच्या उध्दारास्तव जीवदशेला प्राप्त ।।९।।

अलिप्त जैसी कमळ जळातील, शुध्द हृदय अति निर्मल
भावे वंदन गुरूमाउली, महायोगिनी उज्ज्वल ।।१०।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

महायोगी श्री श्री बाबाजी, शतशतकोटी वंदन
स्तवन रुपाने नित्य बरसु दे तव आशिष कृपाघन ।।११।।

हृदयाकाशी सदैव राहो आपुली चिन्मय मूर्ती
चरित्रगान प्रसाद याचिते गावयास द्या स्फूर्ती ।।१२।।

पतित जनांच्या उध्दारास्तव होउनी तारणहार
संतरूपे भगवंत घेतसे युगेयुगे अवतार ।।१३।।

अध्यात्माचा जिथे वारसा मोक्ष जिथे पुरुषार्थ
पृथ्वीतलावर पवित्र ऐसी मायभूमी भारत ।।१४।।

दक्षिण भारती सुजलाम् सुफलाम् तामिळनाडू प्रांत
कावेरीतीरी परंगी पेटई ग्राम वसतसे तेथ ।।१५।।

या गावातील शिवालयातील पुरोहित मुख्य
नेमे पूजा कुळाचार करी वेदपठण नित्य ।१६।।।

ख्यातनाम विद्वान ब्राह्मण नंबुद्री उच्च
जीवनसाथी त्यांची साध्वी उदार प्रेममय ।।१७।।

सुजन उभयतांपोटी जन्मले श्री श्री बाबाजी
साल दोनशे तीन नोव्हेंबरतील तीस रोजी ।।१८।।

उत्सव मुरूगन देवाजीचा दिवाळी दिवसांत
तामिळनाडूमध्ये साजरा होतो थाटात ।।१९।।

रोहिणी नक्षत्रे शुभसमयी अवतरले बाळ
सुलक्षणी बाळास ठेविले नागराज नाव ।।२०।।

विकसु लागले बालक जैसा शुक्ल पक्षीचा शशी
अतर्क्य लीला दैवाची परि कुणा कळावी कशी ।।२१।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

शिवालयातील नटराजाच्या उत्सवास गावी
पंचक्रोशीतील भक्तजनांची गर्दी अमित झाली ।।२२।।

बलुचिस्थानचा अधम पापी कुणी आलासे तेथ
संधी साधुन बालक त्याने केले अपहृत ।।२३।।

कलकत्त्याला बाबाजींचा केलासे विक्रय
विकले ज्या तो मालक होता उदार सहृदय ।।२४।।

सत्वर त्याने बाबाजींना केले बंधनमुक्त
विद्वानांचा एक भेटला त्यास संघ संन्यस्त ।।२५।।

अनेक तीर्थे अनेक गावे सवे भ्रमण मग केली
गीता वेद ग्रंथ अभ्यासे ख्याती बहु झाली ।।२६।।

आत्मा ब्रह्म गहन विषयांवर लीलया करिती निरूपण
समस्त जन आश्चर्य मानिती बालक ज्ञानी पाहून ।।२७।।

ध्येय तयांचे परि ज्ञानापलिकडले अंतिम सत्य
ध्येय प्राप्तीस्तव गुरू लाभण्या हृदय तळमळे नित्य ।।२८।।

भ्रमंतीमाजी श्री बाबाजी कातिर्ग्रामी गेले
तेथ तयांना श्री बोगनथर सिध्द गुरू भेटले ।।२९।।

सहा मास गुरुमार्गदर्शने, केली योगसाधना
तेणे 'तत्त्वमसि' याची होय हृदयी स्थापना ।।३०।।

भगवन् कार्तिकेय स्वामींचे समाधीत हो दर्शन
चैतन्ये चैतन्य मिळाले विलोकिता श्री मुरूगन ।।३१।।

गुरुआज्ञे आले तामिळनाडूतील पोथिगईस
अगस्ति मुनीची मिळण्या दीक्षा बसले घोर तपास ।।३२।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

करीत याचना क्रिया कुंडलिनी प्राणायामा शिकण्या
निसर्गताप शरीरभोगांची बाळगली ना तमा ॥३३॥

बाबाजींचे शरीर सुकूनी कोसळण्याप्रत आले
तरीही मृत्युभय त्यागुन प्रेमे नाम स्मरत राहिल ॥३४॥

अखेर हृदय द्रवुन अवतरले अगस्ति मुनी साक्षात
अगम्य योगरहस्य जाहले कृपे तयांच्या ज्ञात ॥३५॥

क्रिया कुंडलिनी योगसाधना कठीण अति अनुसरण्या
कथिले अगस्ति मुनिने त्यांसी बदरीनाथ जावया ॥३६॥

बदरीनाथला योगसाधना केली अठरा मास
आणि घेतली सौरभ समाधी वय सोळावे वर्ष ॥३७॥

उन्नत पूर्णपदाला गेले समाधिस्थ बाबाजी
दिव्य तेज सोन्यासम लाभुन देह होय अविनाशा ॥३८॥

शब्द राखला बहिणीचा अन् देह त्यागिला नाही
जीवांच्या कल्याणा करिती अविरत कार्य आजही ॥३९॥

जेव्हा जेव्हा पूज्य बुध्दिने स्मरता कोणी नाव
त्या भक्तावर तत्क्षणी होई बाबाजींचा अनुग्रह ॥४०॥

कथिले ऐसे 'योगी-कथामृती' लाहिरी महाशयांनी
सत्य वाक्य हे अनुभवले अन् माझ्या गुरुदेवांनी ॥४१॥

चला आपणही शरण जाऊ या श्री श्री बाबाजींना
कृपा लाभण्या, अनुग्रह होण्या करू प्रार्थना त्यांना ॥४२॥

चला घेऊ या नाम करू या प्रेम प्राणिमात्रांवर
नामे होईल तृप्ती, हृदयी प्रसन्नतेचा संचर ॥४३॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

राखू वाणी सत्य, मृदू अन् जाणू सहसंवेदन
आत्म्याचे परमात्मा होण्या पवित्र ठेवू आचरण ।।४४।।

सद्गुण बाणू अंगी आपुल्या कृतज्ञता, नम्रता
बध्द मनाचे बंध तोडण्या करू प्रयत्ना आता ।।४५।।

कर्म करू निष्काम समर्पित अविचल ठेवू श्रध्दा
शोधू अंतरी वसणाऱ्या त्या नित्य सत्य आनंदा ।।४६।।

नऊ ते दहा वेळेमध्ये सोमवारी रात्रीस
नित्य स्मरावे स्थिर मनाने श्री श्री बाबाजींस ।।४७।।

बाबाजींचा यावेळी संचार होई सर्वत्र
साधनयोगे सहजी होऊ कृपेस आपण पात्र ।।४८।।

या हो, या हो, सत्वर या हो अमर योगी बाबाजी
कृपाकटाक्षे अनुग्रह देउन धन्य करा मज आजा ।।४९।।

तन मन बुध्दी दृढ विश्वासे तव चरणी अर्पियले
चरित्रमहिमा अपुला गाता पाप ताप हरपले ।।५०।।

हाता धरुनी तुम्हीच चालवा भक्तिपथावर आम्हा
अनन्य भावे साद घालता श्री श्री बाबाजी तुम्हा ।।५१।।

बावन्न श्लोकी स्तवन लिहूनी चरणी ठेविला माथा
मधुर स्वराने अखंड गाऊ श्री बाबाजींची गाथा ।।५२।।

।। इति श्री बाबाजी-स्तवन समाप्त ।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हे परमात्मा बाबाजी

हे करुणाकर हे विश्वंभर हे परमात्मा बाबाजी
पतित पावन हे मनभावन हे सर्वेश्वर बाबाजी
हे शिवशंकर योगिमहेश्वर हे प्रतिपालक बाबाजी
हे जगदीशा पूर्णपरेशा हे भगवंता बाबाजी
हे सुखकारक हे भवहारक हे वरदायक बाबाजी
हे भयहर्ता सर्वनियंता हे आत्मस्थित बाबाजी
हे संजीवन हे मृत्युंजय हे चिरयौवन बाबाजी
हे अघनाशक हे उध्दारक उज्ज्वलस्वरूप बाबाजी
स्मरता अनुग्रह तत्क्षण देई असे परमगुरू बाबाजी
जय जय जय जय सदैव गावो हे माझे मन बाबाजी
चला पुकारू सारे आपण आहेत आपले बाबाजी

- श्रीमती सीमा देशमुख

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लेखिकेची अन्य प्रकाशित पुस्तके

- नित्यानंद स्तवनांबुज
- शाळिग्राम गाथांबुज
- केशव गीतांबुज
- अनुभूतिमाला
- ॐ केशवाय नमः
- आपले बाबाजी
- केशवाई
- असाध्य ते साध्य
- शाळिग्राम माहात्म्य
- आत्मा ते परमात्मा
- Our Babaji
- ऐक सांगते मर्म यातले
- अपने बाबाजी (हिंदी)
- अरूपाचं रूप
- Essence of Spirituality

पुस्तके मिळण्याचे ठिकाण

सौ. उज्वल शशीकांत कुंटे

बी- ११०३, रौनक टॉवर, बाजीप्रभु देशपांडे रोड,

नौपाडा ठाणे (प.) ४००६०२

फोन नं. (९१ २२) २५४० ५६ ३७

सौ. प्रिया कौस्तुभ कुंटे ९१ ९६१९००९८८२

(सकाळी : १० ते १२)

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



प्रेमळ भावे बाबाजी हसती।
मृदुमुलायम शब्द बोलती।
विश्वास देउनी समर्थ करती।
सहज जीवास तारून नेती।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi